CMYK

सोलापूर

# तरुण भारत


न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३४३ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि आपल्या डोक्यावरचं कर्ज फेडणं ही त्या व्यक्तीची नैतिक जबाबदारी आहे. जर आई-बाप त्यांच्या डोक्यावरचं कर्ज त्यांच्या हयातीत फेडू शकले नाहीत, तर त्यांच्या मुलानं ते फेडलं पाहिजे. आपल्या परंपरेत माणूस तीन ऋण घेऊन जन्माला येतो असं मानलं आहे. देव ऋण, पितृ ऋण आणि ऋषी ऋण. याचाच अर्थ असा की, व्यक्ती समाजाला काही देण्यासाठी जन्मत असतो. म्हणूनच माणसाने समाजाला काही ना काही दिलं पाहिजे. समाजासाठी काहीतरी केलं पाहिजे.

**- लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# ‘एन. ए.’ परवानगीची अट रद्द

- **बांधकाम नकाशा मंजुरीलाच ‘अकृषक’ परवानगीचा दर्जा**
- **जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र मंजुरीची गरज संपली**

**सर्वसामान्यांना दिलासा**

◆ **मुंबई, ११ फेब्रुवारी**

राज्यात कृषी जमिनीचे अकृषक (एन.ए.) रूपांतर करताना आवश्यक असलेली स्वतंत्र ‘एन.ए.’ परवानगीची अट शासनाने रद्द केली आहे. आता नगररचना विभाग अथवा संबंधित नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा मंजुरी हीच ‘अकृषक परवानगी’ म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र ‘एन.ए.’ परवानगी किंवा सनद घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून त्याबाबतचा राजपत्र अधिसूचना जारी करण्यात आली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. तसेच वार्षिक अकृषक कर देखील रद्द करण्यात आला आहे. या निर्णयामुळे अनावश्यक प्रशासकीय टप्पे कमी होऊन वेळ आणि खर्चाची बचत होणार आहे. प्रक्रियेत पारदर्शकता वाढून नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.



### नागरिकांची दिरंगाई थांबणार

यापूर्वी बांधकाम नकाशा मंजुरीनंतर नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांकडे अकृषक परवानगीसाठी पुन्हा अर्ज करावा लागत होता. नव्या नियमांनुसार, जर जमिनीचा वापर विकास आराखड्यानुसार अनुज्ञेय असेल, तर नियोजन प्राधिकरणाची बांधकाम परवानगीच अंतिम मानली जाईल. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र मंजुरीची गरज संपुष्टात आली आहे. ■

### बँक कर्जासाठी सनदेची अट रद्द

कर्जप्रकरणांत अनेक बँका अकृषक सनद सादर करण्याची अट घालत असत. शासनाने स्पष्ट केले आहे की, नियोजन प्राधिकरणाची बांधकाम मंजुरी मिळाल्यानंतर बँकांनी स्वतंत्र एन.ए. सनदेचा आग्रह धरू नये. याबाबतचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित बँकांना कळवावेत, असेही आदेश देण्यात आले आहेत. ■

### थकित करातून दिलासा

सुधारणेच्या अंमलबजावणीपर्यंतचा थकित अकृषक कर वसूल न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, २००१ पूर्वी किंवा त्यानंतर बिनशेती झालेल्या जमिनींच्या मालकांनी या शासन निर्णयापासून एका वर्षाच्या आत विहित दराने एकरकमी अधिमूल्य भरावे लागणार आहे. ■

### दर पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १००० चौ.मी. पर्यंत बाजारमूल्याच्या | ०.१०% |
| १००१ ते ४००० चौ.मी. बाजारमूल्याच्या | ०.२५% |
| ४००० चौ.मी. पेक्षा जास्त बाजारमूल्याच्या | ०.५०% |

**ऑनलाइन प्रक्रिया आणि ७/१२ फेरफार**

बांधकाम परवानगीसाठी बीपीएमएस किंवा ऑटोडीसीआर प्रणालीद्वारे ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. परवानगी मिळताच महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीतून ७/१२ उताऱ्यावर आपोआप फेरफार नोंदवला जाईल. तथापि, ‘भोगवटादार वर्ग-२’ जमिनींच्या दर्जात केवळ परवानगीमुळे बदल होणार नाही; त्यासाठी आवश्यक नजराणा शुल्क भरावे लागेल.

**वार्षिक कराऐवजी एकरकमी अधिमूल्य**

दरवर्षी आकारला जाणारा अकृषक कर रद्द करून त्याऐवजी जमिनीच्या बाजारमूल्यानुसार टप्प्याटप्प्याने एकरकमी ‘रुपांतरण अधिमूल्य’ आकारले जाईल. ◀*(तभा वृत्तसेवा)*

# राहुल गांधींना आरोप करण्याची सवय

## हरदीपसिंग पुरी यांचा पलटवार

### एपस्टीन फाईलबाबतचे आरोप फेटाळले



◆ **नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

एपस्टीन फाईलमध्ये नाव असल्याबाबत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत केलेले आरोप पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी बुधवारी स्पष्ट शब्दात फेटाळून लावले.

भाजपा मुख्यालयात आयोजित पत्रपरिषदेत पुरी म्हणाले की, राहुल गांधींना खोडसाळ आणि निराधार आरोप करण्याची सवय आहे. अमेरिकेतील बदनाम उद्योगपती जेफरी एपस्टीन यांना मी काही वेळेला भारतीय प्रतिनिधीमंडळाचा सदस्य म्हणून भेटलो होतो, तसेच त्यानंतर त्यांना फक्त एक ईमेल पाठवला होता, असे स्पष्ट करत पुरी म्हणाले की, एपस्टीनसोबत माझ्या झालेल्या भेटीचा या आरोपांशी कोणताही संबंध नाही. त्याचा जो काही भूतकाळ आहे, त्यातील घटनाक्रमाशी माझा दुरान्वायानेही काही संबंध नाही.

त्यावेळी माझा संपर्क लिंक्डईनचे सहसंस्थापक रीड हॉफमेन यांच्याशी प्रामुख्याने होता, आणि मी त्यांना भारतात येण्याचे निमंत्रण दिले होते, असे स्पष्ट करत पुरी म्हणाले की, हॉफमेन यांच्या माध्यमातून माझी एपस्टीनसोबत मेक इन इंडियाबाबत चर्चा झाली होती. एपस्टीन काय करतो, यात माझी काही रुची नव्हती, त्यांच्यादृष्टीने मी योग्य व्यक्ती नव्हतो. एपस्टीनने मला दुतोंडी म्हटले होते, हे सर्व ईमेल राहुल गांधी यांनी वाचले पाहिजे.

एपस्टीनचे जे ३ दशलक्ष इमेल आहेत, त्यात माझ्या नावाचा उल्लेख फक्त तीनचारवेळा आहे. माझ्यावर जे आरोप केले जात आहेत, त्याच्याशी माझा दूरदूरपर्यंत काही सबंध नाही, असे ते म्हणाले.

देशात दोन प्रकारचे नेते असतात, एक म्हणजे जे रात्रंदिवस काम करत देशाला विकासाच्या मार्गावर नेता आणि दुसरे म्हणजे ज्यांचे आचरण बालिश आणि खोडसाळपणाचे असते. राहुल गांधी अशा दुसऱ्या गटातील नेते आहे, जे पुराव्याशिवाय निराधार आणि खोडसाळ आरोप करत असतात, असे पुरी यांनी म्हटले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

### कोणताही माईचा लाल देश विकू शकत नाही : किरेन रिजिजू



अमेरिकेसोबत व्यापार करार करतांना मोदी सरकारने देश विकल्याचा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत केला होता, हा आरोप ठामपणे फेटाळून लावतांना कोणी माई का लाल नाही, जो देश विकू शकेल वा खरेदी करु शकेल, असे सणसणीत प्रत्युत्तर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिले. ■

## महत्त्वाचे

### देशभरात आज बँक संप

**नवी दिल्ली :** देशभरात उद्या, म्हणजेच १२ फेब्रुवारी रोजी, सर्व बँकेचे कर्मचारी संपावर असतील. देशातील मोठ्या बँक संघटना, ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशन, ऑल इंडिया बँक ऑफिसर्स असोसिएशन आणि बँक एम्प्लॉईज फेडरेशन ऑफ इंडिया यांनी उद्या संपाची घोषणा केली आहे. संपाच्या पार्श्वभूमीवर, स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) ने ग्राहकांना कळवले आहे की १२ फेब्रुवारी रोजी संपामुळे बँकिंग सेवांवर परिणाम होऊ शकतो. एसबीआय व्यतिरिक्त, आयडीबीआय बँकेलाही युनियनकडून संपाची नोटीस मिळाली आहे. तथापि, आरबीआय किंवा इतर बँकांनी या दिवशी सुट्टी जाहीर केलेली नाही, परंतु कर्मचाऱ्यांच्या संपात सहभागामुळे शाखांमधील कामकाजावर परिणाम होईल. ■

### ४४ वर्षांनंतर मुंबई मनपावर भाजपचा झेंडा

**मुंबई :** आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेवर तब्बल ४४ वर्षांनंतर भाजपचा महापौर विराजमान झाला आहे. भाजपच्या रितू तावडे यांची महापौरपदी, तर शिवसेनेचे संजय घाडी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली. बुधवारी त्यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. या ऐतिहासिक क्षणाला मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. महायुतीच्या नगरसेवकांनी पदभार स्वीकृतीपूर्वी हुतात्म्यांना अभिवादन केले.

# राज्य विद्यापीठांतील प्राध्यापक भरतीस नवे ६०:२०:२० सूत्र लागू

## निवड प्रक्रियेचे ऑडीओ-व्हिडीओ रेकॉर्डिंग बंधनकारक

### सहायक प्राध्यापकांसाठी निकष

सहाय्यक प्राध्यापक पदासाठी शैक्षणिक गुणवत्ता, अध्यापन अनुभव आणि संशोधन कामगिरी या घटकांवर गुणांकन होणार आहे.

- **पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील गुण, एम.फिल./पीएच.डी., तसेच नेट/सेट/जेआरएफ पात्रता यांसाठी कमाल ४६ गुण**
- **मान्यताप्राप्त अध्यापन किंवा पोस्ट-डॉक्टोरल अनुभवासाठी दरवर्षी १ गुण, कमाल ६ गुण**
- **पीअर-रिव्ह्यू संशोधन लेख, पुस्तके, पेटंट, कॉपीराइट, पुरस्कार आदींसाठी कमाल ८ गुण**

या सर्वांचा एकत्रित ६० टक्के वजन अंतिम गुणांकनात समाविष्ट राहील. ■

### १०० गुणांचे स्पष्ट मूल्यांकन सूत्र

नव्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या निवडीसाठी एकूण १०० गुणांचे ६०:२०:२० असे सूत्र निश्चित करण्यात आले आहे.

- **६० टक्के गुण - शैक्षणिक व संशोधन कामगिरी**
- **२० टक्के गुण - अध्यापन कौशल्य चाचणी (मॉक टीचिंग)**
- **२० टक्के गुण - मुलाखत**

या तिन्ही घटकांच्या एकत्रित गुणांवर अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. व्यक्तिनिष्ठ निर्णयांना मर्यादा घालून अधिक वस्तुनिष्ठ निवड प्रक्रिया राबविण्याचा शासनाचा उद्देश आहे. ■

◆ **मुंबई, ११ फेब्रुवारी**

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील प्राध्यापक भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि गुणवत्ताधारित करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सुधारित कार्यपद्धती जाहीर केली आहे. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार ६ ऑक्टोबर २०२५ रोजी नितश्चित केलेली पद्धत रद्द करण्यात आली असून, नव्या निकषांनुसार पुढील सर्व भरती प्रक्रिया राबविणे बंधनकारक करण्यात आले आहे. सध्या सुरू असलेल्या भरती प्रक्रियांनाही हीच प्रणाली लागू राहणार आहे. राज्यपाल तथा कुलपती कार्यालयाच्या सूचनांचा विचार करून हे बदल करण्यात आल्याचे शासन निर्णयात नमूद आहे.

**वरिष्ठ पदांसाठी संशोधनाला प्राधान्य**

सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदांसाठी संशोधन, नवोपक्रम आणि शैक्षणिक नेतृत्वाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. संशोधन प्रकाशने, पुस्तकलेखन, बौद्धिक संपदा, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार, एमओओसी अभ्यासक्रम विकास, पीएच.डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तसेच उद्योग-सरकारी प्रकल्पांतून निधी उभारणी यांसारख्या घटकांवर गुणांकन होणार आहे.

**मॉक टीचिंग अनिवार्य**

शॉर्टलिस्ट उमेदवारांसाठी अध्यापन कौशल्याची स्वतंत्र चाचणी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. निवड समितीसमोर प्रत्यक्ष वर्गस्थितीत विषय सादर करण्याची मॉक टीचिंग’ पद्धत वापरली जाईल. विषय मांडणी, अध्यापन पद्धती, आधुनिक साधनांचा वापर, भाषिक कौशल्य आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन या बाबींचे मूल्यांकन होईल. या घटकाला २० टक्के वजन देण्यात आले आहे.

**मुलाखतीसाठी किमान पात्रता**


मुलाखतीत विषयाचे सखोल ज्ञान, तर्कशक्ती, संशोधन आराखडा, अध्यापन दृष्टी आणि नव्या

### ‘विमान अपघाताची सीबीआय चौकशी करा’

**नवी दिल्ली :** अजितदादा पवार यांच्या विमानाला झालेला अपघात हा अपघात नसून घातपात असल्याच्या आपल्या आरोपाचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी आज पुनरुच्चार केला. तसेच या अपघाताची सीबीआय आणि अन्य संस्थांनी चौकशी करण्याची मागणी केली. ■

# धर्मभास्कर सद्गुरुदास महाराज निवर्तले

## आध्यात्मिक, ऐतिहासिक क्षेत्रांतील देदीप्यमान पर्वाचा अस्त



◆ **नागपूर, ११ फेब्रुवारी**

धर्मभास्कर सद्गुरुदास महाराज, उपाख्य शिवकथाकार विजयराव देशमुख यांचे आज सायंकाळी ७ वाजून ५ मिनिटांनी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्यावर विवेका रुग्णालयात उपचार सुरू होते. मृत्युसमयी ते ८४ वर्षांचे होते. छत्रपती सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक आणि गुरुमंदिर परिवाराचा आधारस्तंभ म्हणून ओळखले जाणाऱ्या महाराजांच्या निधनाने आध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रांत मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

ते गुरुमंदिर, जयप्रकाशनगर येथे राहत होते. ते मूळचे अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील वाडेगाव येथील रहिवासी होते. त्यांचा जन्म २८ जानेवारी १९४२ रोजी झाला होता. गुरुवार, १२ फेब्रुवारी रोजी

“ श्री सद्गुरुदास महाराजांच्या अचानक जाण्याचा धक्का हा अतिशय पीडादायक आणि मनामध्ये काळजी उत्पन्न करणारा आहे. विदर्भ-महाराष्ट्रामध्ये शिवकथाकार म्हणून आणि नंतर आध्यात्मिक साधक म्हणून समाजामध्ये न्याय, नीती, धार्मिकता आणि राष्ट्रभक्ती जागरूक ठेवण्यासाठी प्रबोधनाचे काम त्यांनी केले. प्रसन्न आणि सरळ स्वभावाने प्रत्येक गोष्टीची बुद्धिनिष्ठ, तर्कनिष्ठ चिकित्सा आणि त्याची सूक्ष्म अनुभूती, याच्या आधारावर त्यांनी अनेकांना कठीण काळातसुद्धा सन्मार्गी लागण्याची दीक्षा दिली. त्यांच्या प्रतीतीवान आणि विद्यावान अशा प्रकारच्या सान्निध्याला आम्ही मुकलो आहोत. त्यांच्या स्मृतीला माझी वैयक्तिक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करतो.

**- डॉ. मोहनजी भागवत**, सरसंघचालक, रा. स्व. संघ

# एसटी बस व पिकअपची धडक; एकाचा जागीच मृत्यू



## मंगळवेढा-पंढरपूर मार्गावर झाला अपघात; बस चालकाविरुध्द गुन्हा



**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा,दि. ११ फेबुवारी**

मंगळवेढा-पंढरपूर मार्गावर पेट्रोल पंपानजीक एका वाहनास ओव्हरटेक करताना समोरून आलेल्या पिकअपला एसटी बसने जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात पिकअप चालकाचा जागीच मृत्यू झाला तर अन्य एक जण गंभीर जखमी झाला. अविनाश बिराप्पा पुजारी (वय २४, रा.लोणीकंद जि.पुणे) असे मृत्यू झालेल्याचे तर अरूणकुमार सुरेश पाटील (रा.सातलगाव जि.विजापूर) असे जखमीचे नाव आहे.

याबाबत मंगळवेढा पोलीसात एस.टी. बसचालक अशोक पाटील (रा.निंबोणी) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, दि.११ रोजी सकाळी ७.१५ वाजता यातील फिर्यादी अरुणकुमार सुरेश पाटील (रा.सातलगाव जि.विजापूर) हे व मयत पिकअप चालक अविनाश पुजारी हे दोघे त्यांच्या ताब्यातील पिकअप (एम.एच.१२ एस.एक्स.७३२८) मधून मंगळवेढा ते पंढरपूरकडे जात असताना खवतोडे पेट्रोप पंपासमोर आल्यावर समोरुन येणारी एस.टी.बस (एम.एच.१४ बी.टी.४४२७) चालक तथा आरोपी अशोक पाटील याने त्याच्या ताब्यातील एस.टी. बस हयगयीने अविचाराने रोडच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन समोरील चारचाकी वाहनास ओव्हरटेक करुन समोरुन येणाऱ्या पिकअपला जोराची धडक दिली.


त्यात पिकअप चालकास उजव्या दंडास, छातीस, दोन्ही पायास गंभीर जखमी करुन त्याचे मृत्यूस कारणीभूत होवून त्याचबरोबर फिर्यादी अरुणकुमार पाटील याचा उजवा खांदा फ्रॅक्चर करुन तोंडास नाकास जखमी करुन स्वत: एस.टी.चालक त्याच्या उजव्या कानास जखमी होवून दोन्ही वाहनाच्या नुकसानीस कारणीभूत झाला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या अपघाताचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान मागील दोन आठवड्यापुर्वीच घटनास्थळापासून एक कि.मी.अंतरावर पंढरपूरहून विठठलाचे दर्शन घेवून ठाण्याकडे जाणाऱ्या महिला भावीकांच्या गाडीचा अपघात होवून त्यामध्ये चार भावीकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर पुन्हा याच परिसरात आज भीषण अपघात होवून एकाचा मृत्यू झाला आहे. या अपघाताचे वृत्त समजताच परिसरातील नागरिकांनी घटानास्थळी धाव घेतली. महिला पोलीस उपनिरीक्षक डॉ.आरती कनीरे यांनी तात्काळ दाखल होवून ॲब्युलन्स बोलावून जखमींना दवाखान्यात दाखल केले. तसेच अपघातस्थळी मोठी गर्दी जमल्याने महामार्गावर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्याने गर्दी हटवून वाहतूक सुरळीत केली. आज बारावीची परीक्षा असल्यामुळे ग्रामीण भागातून मंगळवेढ्याकडे परीक्षेसाठी विद्यार्थी बसमधून येत होते. यामधील काही विद्यार्थी किरकोळ जखमी झाल्याचेही समजते.

# वेस्ट इंडिजचा विजय; इंग्लंडला ३० धावांनी हरवले

- **गुडाकेश मोतीने ३ विकेट घेतल्या**
- **रदरफोर्डच्या नाबाद ७६ धावा**

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ११ फेब्रुवारी-**

वेस्ट इंडिजने टी-२० विश्वचषकात सलग दुसरा विजय मिळवला आहे. ग्रुप सी सामन्यात त्यांनी इंग्लंडचा ३० धावांनी पराभव केला. बुधवारी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर १९७



धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडने १८.५ षटकात १६६ धावांवर सर्वबाद झाला.

सॅम करनने नाबाद ४३ धावा केल्या. जेकब बेथेलने ३३ धावा, सॉल्टने ३० धावा केल्या. मोतीने ३ बळी घेतले. रोस्टन चेसने दोन बळी घेतले. अकील हुसेन आणि रोमारियो शेफर्डने प्रत्येकी एक बळी घेतला. नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजने ६ विकेट्स गमावून १९६ धावा केल्या. रुदरफोर्डने ७ षटकार मारत ७६ धावा केल्या. रशीदने २ बळी घेतले.





CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### २४ लाख आयकर परतावे प्रलंबित

**मुंबई** : ४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत एकूण ८.८० कोटी रिटर्न दाखल करण्यात आले होते. यापैकी सुमारे २४.६४ लाख रिटर्न अजूनही प्रक्रिया झालेले नाहीत. आयकर विभाग रिफंड तेव्हाच जारी करतो जेव्हा प्रक्रिया पूर्ण होते. २४ लाखांहून अधिक रिटर्न प्रलंबित असल्याने, या करदात्यांचे रिफंडही अडकले आहेत. याची अनेक तांत्रिक कारणे असू शकतात: जर रिटर्न फाइल केल्यानंतर ई-व्हेरिफाय केले नसेल, तर प्रोसेसिंग सुरू होणार नाही. घोषित उत्पन्न आणि विभागाकडे उपलब्ध डेटा (उदा. किंवा फॉर्म २६) मध्ये फरक असेल. बँक खाते वैध नसणे किंवा इतर तांत्रिक तपासणी प्रलंबित असणे किंवा विभागाकडे एकाच वेळी मोठ्या संख्येने रिटर्न आल्यामुळेही वेळ लागू शकतो.

### वर्षभरात ५४० टक्क्यांनी वाढली गोल्ड ईटीएफमधील गुंतवणूक

**नवी दिल्ली** : गेल्या एका वर्षात सोन्याच्या किमतींमध्ये झालेल्या विक्रमी वाढीमुळे भारतीय गुंतवणूकदारांचा कल डिजिटल सोन्याकडे वेगाने वाढला आहे.




असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडियाच्या ताज्या आकडेवारीनुसार, ३१ जानेवारी २०२६ पर्यंत गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंड्सचे निव्वळ मालमत्ता व्यवस्थापन मागील वर्षाच्या तुलनेत अडीच पटीने अधिक झाले आहे. फक्त जानेवारी महिन्यातच गोल्ड ईटीएफ मध्ये २४,००० कोटींहून अधिक गुंतवणूक आली आहे. जानेवारी २०२६ दरम्यान गोल्ड मध्ये २४,०३९.९६ कोटी रुपयांचा निव्वळ ओघ (नेट इनफ्लो) नोंदवला गेला. जर याची तुलना एक वर्षापूर्वी म्हणजेच जानेवारी २०२५ शी केली, तर तेव्हा हा आकडा फक्त ३,७५१.४२ कोटी रुपये होता. म्हणजेच, एका वर्षात मासिक ओघात (मंथली इनफ्लो) ५४०.८२ टक्क्यांची वाढ झाली आहे. तर डिसेंबर २०२५ (११,६४६ कोटी) च्या तुलनेतही गुंतवणुकीत १०६ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे.

### कॅनडातील शाळेत गोळीबार; १० जणांचा मृत्यू, २४ जखमी


**टोरंटो** : ब्रिटिश कोलंबियातील टम्बलर रिज सेकंडरी स्कूलमध्ये मंगळवारी दुपारी झालेल्या गोळीबारात किमान १० जणांचा मृत्यू झाला असून २४ जण जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दुपारी दीड वाजताच्या सुमारास शाळेत गोळीबार झाला. माहिती मिळताच पोलिस शाळेत हजर झाले असता घटनास्थळी मृतदेह आढळून आले. एकाचा मृत्यू रुग्णालयात नेत असताना झाला. पोलिसांनी आतमध्ये अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले आहे. शाळा बंद ठेवण्यात आली असून मारेकऱ्याचा शोध घेतला जात आहे.

### सलमान खानच्या नातेवाईकाला धमकी

**मुंबई** : अभिनेता रणवीर सिंहला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती, त्यानंतर आता सलमान खानच्या नातेवाईकाला कोट्यवधी रुपये न दिल्यास जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. सलमान खानच्या जवळच्या नातेवाईकाला ई-मेलद्वारे धमकी देण्यात आली आहे. मेलमध्ये स्पष्ट लिहिले आहे की, जर कोट्यवधी रुपयांची मागणी पूर्ण केली नाही, तर त्यांच्या जीवाला धोका असेल. सध्या सलमान खानच्या कोणत्या नातेवाईकाला धमकी मिळाली आहे हे स्पष्ट नाही. मात्र, वृत्तानुसार, तो नातेवाईक चित्रपटसृष्टीशी संबंधित असून एक अभिनेता आहे. सध्या या प्रकरणी अद्याप पोलिस तक्रार दाखल करण्यात आलेली नाही.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८४,२७३.९२ (+२०८.१७) |
| निफ्टी | २५,९३५.१५ (+६७.८५) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,५७,४०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. २,६४,३०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | ३४.१ | १७.८ |
| अमरावती | ३५.६ | १५.३ |
| सोलापूर | ३४.४ | १९.४ |
| बुलडाणा | ३२.८ | १६.२ |
| चंद्रपूर | ३३.२ | १६.४ |
| गडचिरोली | ३२.४ | १५.२ |
| गोंदिया | ३२.० | १३.४ |
| नागपूर | ३१.९ | १३.२ |
| वर्धा | ३३.० | १५.१ |
| वाशीम | -.- | १४.६ |
| यवतमाळ | ३२.८ | १६.२ |

# पक्षादेश झुगारणाऱ्या ६९ जणांवर कारवाई

## ‘भाजपा’मधून सहा वर्षांसाठी निलंबित; बंडखोरी करणे भोवले

◆ **पुणे, ११ फेब्रुवारी**

नुकत्याच पार पडलेली पुणे महानगर पालिका निवडणूक आणि विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत भूमिकेशी फारकत घेत बंडखोरी करणाऱ्यांवर भारतीय जनता पक्षाने कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. पुण्यात पक्षादेश झुगारणाऱ्या अमोल बालवडकर, धनंजय जाधव यांच्यासह एकूण ६९ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी ही अधिकृत घोषणा केली आहे.

निवडणुकीच्या काळात पुण्यातून भाजपच्या तिकिटावर लढण्यासाठी इच्छुकांची मोठी गर्दी झाली होती. सुमारे अडीच हजार कार्यकर्त्यांनी उमेदवारीची पक्षाकडे मागणी केली होती. मात्र, जागावाटपाचे गणित आणि बाहेरून पक्षात आलेल्या नेत्यांमुळे अनेक निष्ठावंतांना उमेदवारी मिळू शकली नाही.

या नाराजीतून काही कार्यकर्त्यांनी थेट बंडाचे निशाण फडकवत निवडणूक लढवली, तर काहींनी पडद्यामागून विरोधी उमेदवारांना मदत करणे पसंत केले. अशा शिस्तभंग करणाऱ्यांवर आता पक्षाने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

शहराध्यक्ष घाटे यांनी जाहीर केलेल्या यादीनुसार, सर्वाधिक बंडखोर हे हडपसर विधानसभेतील आहेत. यामध्ये हडपसर विधानसभा मतदारसंघातील १९ जण निलंबित केले आहेत तर, खडकवासला मधील ९ जण, पुणे कॅन्टोन्मेंट मधील ९ जण, वडगाव शेरी मधील ८ जण, शिवाजीनगर मधील ८ जण, कोथरूड मधील ६ जण, कसबा पेठ मधील ६ जण आणि पर्वतीमधील ४ जणांचे निलंबन करण्यात आले आहे.

◂(तभा वृत्तसेवा)

> पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या आणि प्रदेशाध्यक्षांच्या आदेशानुसार ही शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. पक्षात राहून पक्षविरोधी केलेल्या कारवाया खपवून घेतल्या जाणार नाहीत. ज्यांनी निवडणुकीत पक्षाच्या विरोधात काम केले आहे, त्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. भविष्यातही कोणत्याही पदाधिकाऱ्याने अशी वर्तणूक केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई निश्चित केली जाणार आहे.
>
> **- धीरज घाटे**, शहराध्यक्ष

### पक्षशिस्तीचा गंभीर प्रकार

निवडणुकीदरम्यान पक्षाने उमेदवारी न दिल्याने काही कार्यकर्त्यांनी अपक्ष म्हणून किंवा इतर पक्षांच्या चिन्हावर निवडणूक लढवली होती. हे कृत्य पक्षशिस्तीचा गंभीर प्रकार असल्याचे मानत भाजपने थेट आणि स्पष्ट कारवाईचा निर्णय घेतला. निलंबित करण्यात आलेल्या सर्व कार्यकर्त्यांना पुढील सहा वर्षे पक्षाच्या कोणत्याही संघटनात्मक पदावर किंवा जबाबदारीवर काम करण्याची संधी दिली जाणार नसल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे.



पृथ्वीवरील नंदनवन असलेल्या जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही आठवड्यांपासून जोरदार बर्फवृष्टी सुरू आहे. पर्वतमालिका शुभ्रधवल झाल्या असून या निसर्ग सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी काश्मीर खोऱ्यात दररोज हजारो पर्यटक येत आहेत.

### फ्रेंच शिक्षकाचा ८९ अल्पवयीन मुलांवर अत्याचार

**पॅरिस** : फ्रान्समध्ये एका ७९ वर्षीय निवृत्त शिक्षकावर १९६० च्या दशकापासून २०२२ पर्यंत ८९ अल्पवयीन मुलांवर अत्याचार आणि लैंगिक शोषणाचा आरोप आहे. फ्रान्समधील ग्रेनोबल शहरात सरकारी वकील एटिएन मंटो यांनी मंगळवारी हे प्रकरण सार्वजनिक करताना पीडितांना पुढे येण्याचे आवाहन केले. आरोपीचे नाव जॅक लेवुग्ल आहे. सरकारी वकिलांनुसार, जॅक लेवुग्लने १९६७ ते २०२२ दरम्यान भारत, जर्मनी, स्वित्झर्लंड, मोरोक्को, नायजर, अल्जेरिया, फिलिपिन्स, कोलंबिया आणि फ्रान्समध्ये अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार केले. तो फ्रेंच भाषेचा शिक्षक आणि गुहा अभ्यास (स्पेलिओलॉजी) प्रशिक्षक म्हणून काम करत होता. सरकारी वकिलांनुसार, तो सर्वत्र जाऊन तरुणांना भेटत असे आणि त्यांच्यासोबत लैंगिक संबंध ठेवत असे. पीडितांचे वय १३ ते १७ वर्षांच्या दरम्यान असल्याचे सांगितले आहे. तो २०२४ मध्ये आरोप निश्चित झाल्यापासून अटकेत आहे. सरकारी वकिलांनुसार, आरोपीने आपल्या आजारी आई आणि वृद्ध मावशीच्या हत्येची कबुलीही दिली आहे.

### कॅनडातील शाळेत गोळीबार, शूटरसह नऊ जणांचा मृत्यू

**ओटावा** : कॅनडाच्या ब्रिटिश कोलंबिया प्रांतातील टम्बलर रिज शहरात एका हायस्कूलमध्ये गोळीबार झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, या घटनेत नऊ लोकांचा मृत्यू झाला, तर २५ जण जखमी झाले. खबरदारी म्हणून शाळा बंद करण्यात आली आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मोठ्या संख्येने पोलिस आणि रुग्णवाहिका पथके घटनास्थळी पाठवण्यात आली. सरकारी वेबसाइटनुसार, ज्या टम्बलर रिज सेकंडरी स्कूलमध्ये ही घटना घडली, इयत्ता ७ वी ते १२ वी पर्यंतचे एकूण १७५ विद्यार्थी शिकतात.




सोलापूर : महा पशुधन एक्स्पो लोगोचे अनावरण सीईओ कुलदीप जंगम यांच्या हस्ते झाले.

# व्याप्त काश्मीर-अक्साई चीनवर अमेरिकेची कोलांटउडी

## व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने हटविला नकाशा

◆ **वॉशिंग्टन, ११ फेब्रुवारी**

कोलांटउडी मारण्यात पटाईत असलेल्या अमेरिकेने भारतासोबत व्यापार करार झाल्यानंतर व्याप्त काश्मीर आणि अक्साई चीनसह भारताचा नकाशा व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने सोशल मिडियावर प्रकाशित केला होता. पण, हा नकाशा आता हटविण्यात आल्याने अमेरिका बेभरवशाचा साथीदार असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

भारत-अमेरिका व्यापार कराराच्या घोषणेनंतर अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने सोशल मीडियावर भारताचा नकाशा प्रसिद्ध केला होता. या नकाशात जम्मू-काश्मीरचा संपूर्ण भाग भारतीय भूभाग म्हणून दर्शवण्यात आला होता. यात पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीर (पीओके) तसेच चीनच्या नियंत्रणाखाली असलेला अक्साई चीन हेदेखील भारताचा भाग म्हणून दाखवण्यात आले होते.




भारताने सातत्याने जम्मू-काश्मीरचा संपूर्ण केंद्रशासित प्रदेश हा देशाचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच ऐतिहासिक करार आणि दाव्यांच्या आधारे अक्साई चीनवरही भारताचा हक्क असल्याची भूमिका नवी दिल्लीने कायम ठेवली आहे. अशा पार्श्वभूमीवर अमेरिकन अधिकाऱ्यांच्या अधिकृत खात्यावरून प्रसिद्ध झालेला नकाशा महत्त्वाचा मानला जात होता. मात्र, तो हटवल्यानंतर अमेरिकेने या प्रश्नावर आपली भूमिका बदलली का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

◂(वृत्तसंस्था)

# लाड कमिटीसंदर्भातील प्रस्ताव मंजुरीसाठी मनपा सभेकडे पाठवा

## महापालिका कामगार संघटना कृती समितीचे आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

लाड कमिटीतील पात्र वारसदारांना नियुक्ती देण्यासाठी आकृतिबंधाचा प्रशासकीय प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशी मागणी महापालिका कामगार संघटना कृती समितीने महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

यासंदर्भात समितीचे अध्यक्ष अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना निवेदन दिले आहे. लाड कमिटीचे प्रकरण करतांना वारसदार अर्ज करतात. परंतू सेवानिवृत्त मयत झालेला सफाई कामगारांचे सेवापुस्तक असल्याशिवाय प्रकरण पुढे जात नाही. सेवापुस्तक शोधण्यासाठी एकच कारकुन नेमलेला आहे. हजारो सेवापुस्तकाचे गठ्ठे पडलेले आहेत. हे फार कठीण काम आहे. लाड कमिटीची हजारो प्रकरणे हाताळण्यासाठी एकच कारकुन आहे. आलेल्या प्रकरणाचे ऑडीट करणाऱ्यांची संख्या अपुरी आहे. ऑडीट झाले तर सेवापुस्तक नाही. सेवापुस्तक सापडले तर ऑडीट झाले नाही, अशा तक्रारी वाढल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागात गर्दी होत आहे. राज्य शासनाच्या परिपत्रकात कुठेही वंशावळ द्यावी असे सांगितले नाही. तरीही वंशावळ मागितली जात आहे. संबंधित कागदपत्र मिळावीत म्हणून ६०० रुपये महापालिकेत जमा करुनही कागदपत्रे मिळत नाहीत. सन १९७५ पासून जे सफाई कामगार मयत झालेले आहेत, त्यांचे वारस मुले-मुली ५०-६० वर्षांचे आहेत. त्यांची नातवंडे वयाची ४५ वर्षे पार करीत आहेत. तेव्हा त्यांना नोकरी दिली जात नाही. तेव्हा नात, सुन, पणतू या वारसांना नोकरी द्यावी. प्रतीक्षा यादीतील जेष्ठतेप्रमाणे नेमणूक होत नाहीत. तेव्हा हा सर्व गोंधळ थांबवावा, अशी विनंती समितीने निवेदनात केली आहे.

यावेळी शशिकांत शिरसट, लिंगराज जेटीथोर, बाली मंडेपु, बाबा क्षीरसागर, दत्ता तुळसे, अजय क्षीरसागर उपस्थित होते.

# देशभरात ३४ आयुष संशोधन प्रकल्पांना मान्यता

## डॉ. अनिल बोंडेंचा राज्यसभेत प्रभावी पाठपुरावा

◆ **अमरावती, ११ फेब्रुवारी**

आयुष क्षेत्रातील संशोधन, नवोन्मेष आणि वैज्ञानिक अधिष्ठान यांना चालना देण्यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी राज्यसभेत प्रभावी भूमिका बजावली. त्यांच्या प्रश्नामुळे आयुष मंत्रालयाकडील आयुर्ज्ञान योजनेअंतर्गत सुरू असलेल्या संशोधन कार्याचा सविस्तर आढावा सभागृहासमोर आला.

डॉ. बोंडे यांनी राज्यसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करून, एक्स्ट्रा म्युरल रिसर्च (ईएमआर) योजनेंतर्गत मंजूर संशोधन प्रकल्पांची संख्या, त्यांचे प्रत्यक्ष परिणाम, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रकाशने तसेच आयुष मनुष्यबळ प्रशिक्षणाबाबत सरकारची प्रगती जाणून घेतली.



या प्रश्नाला उत्तर देताना आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी सांगितले की, डिसेंबर २०२५ पर्यंत देशभरात ३४ आयुष संशोधन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून, ६२ संशोधनपर लेख आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत. डॉ. अनिल बोंडे यांनी आयुष पद्धती केवळ परंपरेपुरत्या मर्यादित न राहता वैज्ञानिक चाचण्या, पुरावाधारित संशोधन आणि जागतिक स्वीकारार्हता मिळवणे गरजेचे असल्याचे सातत्याने अधोरेखित केले आहे. त्यांच्या पुढाकारामुळे आयुर्वेद, योग, सिद्ध, युनानी व होमिओपॅथी क्षेत्रातील संशोधनाला नवी दिशा मिळत असल्याचे दिसून येते. डॉ. बोंडे यांच्या हस्तक्षेपाचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील नागपूर, पुणे व धुळे येथील संस्थांना आयुष संशोधन प्रकल्प मिळाले असून, टीबी, अल्झायमर, लठ्ठपणा, मायक्रोबायोम यांसारख्या गंभीर आजारांवर संशोधन सुरू आहे.

यामुळे राज्यातील शैक्षणिक व वैद्यकीय संस्थांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळत आहे.

डॉ. बोंडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांमुळे आयुष मनुष्यबळ विकासाचीही माहिती समोर आली. मंत्रालयाने स्पष्ट केले की, निश्चित लक्ष्यापेक्षा अधिक म्हणजे ७५३१ आयुष शिक्षक, वैद्य व पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

◂(तभा वृत्तसेवा)

### दिल्लीत तिघांच्या हत्या प्रकरणात तांत्रिकाला अटक

◆ **नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

दिल्लीतील पश्चिम विहार परिसरात धनवर्षा (अचानक धनलाभ) चे आमिष दाखवून तीन लोकांची विष देऊन हत्या केल्याप्रकरणी पोलिसांनी एका तांत्रिकाला अटक केली आहे. आरोपीने तिघांना विषारी लाडू खाऊ घातले आणि रोख रक्कम घेऊन पळ काढला होता. या प्रकरणात ही पहिली अटक आहे. पोलिसांनुसार, आरोपीची ओळख कमरुद्दीन उर्फ बाबा अशी झाली आहे.

तो उत्तर प्रदेशातील फिरोजाबादचा रहिवासी असून लोणी आणि फिरोजाबादमध्ये तंत्र-मंत्राचे केंद्र चालवत होता. दिल्लीतील पीरागढ़ी उड्डाणपुलाजवळ ८ फेब्रुवारी रोजी एका बंद कारमध्ये तीन लोकांचे मृतदेह आढळले होते.

◂(वृत्तसंस्था)

### सदिच्छा भेट...



पुणे महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित महापौर मंजूषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर आणि गटनेते गणेश बिडकर यांनी बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत सदिच्छा भेट घेतली. यावेळी विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# नवीन पिढीची विमाने मिळवण्यास वायुदल उत्सुक

◆ **नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

नवीन पिढीची लढाऊ विमाने मोठ्या प्रमाणात वायुदलात सवाविष्ट करण्यासाठी वायुदल उत्सुक आहे, असे भारतीय वायुदलाचे उपप्रमुख एअर मार्शल नागेश कपूर यांनी बुधवारी सांगितले.

‘ऑपरेशन सिंदूर’दरम्यान राफेल निश्चितच इतर नायकांपैकी एक हिरो होते. राफेल हा चर्चेचा शब्द आहे. निश्चितपणे तो चर्चेचा शब्द असल्याचे कपूर यांनी वायुशक्ती सरावाच्या आधी झालेल्या पत्रपरिषदेत सांगितले. भारतीय वायुदलाला आणखी बरीच मल्टी रोल फायटर एअरक्राफ्ट्स सामील करायची आहेत. मग ती राफेल असो किंवा इतर कोणतेही विमान असो, सध्या हा मुद्दा विचाराधीन आहे आणि त्याबाबत अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही, असे कपूर यांनी सांगितले.

वायुदल आपल्या ताफ्यात नवीन पिढीतील विमानांचा समावेश करण्यास उत्सुक आहे आणि जितक्या लवकर ही विमाने वायुदलात येतील, तितके चांगले आहे, असे कपूर म्हणाले. राफेल, सुखोई-३०, मिग-२९, तेजस, जग्वार हे इतर लढाऊ विमाने आगामी वायुशक्ती सरावाचा भाग असतील. ही विमाने ‘ऑपरेशन सिंदूर’दरम्यान वायुदलाच्या यशस्वी भूमिकेवर प्रकाश टाकतील, असे दुसऱ्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

◂(वृत्तसंस्था)

# शेगाव-उमरखेड एसटी बसचा अपघात

**वाशीम, ११ फेब्रुवारी**

उमरखेड आगाराच्या शेगाव-उमरखेड बसला बुधवार, ११ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास सापळी फाट्याजवळ भीषण अपघात झाला. सुदैवाने या अपघातात बसमधील ३७ प्रवासी पूर्णपणे सुखरूप असून, मोठी जीवितहानी टळली आहे. मात्र, या घटनेत चालक आणि वाहक जखमी झाले असून, त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्राप्त माहितीनुसार, उमरखेड आगाराची बस वाशीमवरून उमरखेडकडे येत होती. दुपारी ३ वाजता ही बस सापळी फाट्यावर आली असता हा अपघात घडला. यामध्ये मोटारसायकल ही सापळीवरून भरधाव वेगाने येत होती, त्या मोटारसायकलला वाचवित अपघात घडला. घटनेची माहिती मिळताच उमरखेड आगाराचे वाहतूक नियंत्रक पांडुरंग यादव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी चालक संजय शिवदास धाये आणि वाहक धनेश्वर भाऊराव थाटबड्वे यांना तातडीने औषधोपचारासाठी दवाखान्यात हलविले. वाहतूक नियंत्रक यादव यांनी प्रवाशांची विचारपूस केली असता, सर्व ३७ प्रवासी सुखरूप असल्याचे कळले.

# सार्वजनिक कार्यक्रमात पूर्ण वंदे मातरम् अनिवार्य



## केंद्र सरकारकडून नवी नियमावली जाहीर

◆ **नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

सरकारने अधिकृत प्रसंगी ३ मिनिटे १० सेकंदांच्या ‘वंदे मातरम्’च्या सहा कडव्यांचे वादन किंवा गायन अनिवार्य केले आहे. हा नियम राष्ट्रध्वज फडकावण्याच्या वेळी, कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपतींच्या आगमनाप्रसंगी तसेच राष्ट्राला उद्देशून दिल्या जाणाऱ्या भाषणांपूर्वी आणि नंतर लागू राहणार आहे. याबाबत केंद्र सरकारने नवा आदेश काढला आहे.

राष्ट्रगीत म्हणून वंदे मातरम्ची सहा कडव्यांची आवृत्ती राष्ट्रगान ‘जन गण मन’ च्या आधी वाजवली जाईल, जेणेकरून सन्मान आणि राष्ट्रीय भावनेचा स्पष्ट संदेश मिळेल. त्यावेळी उभे राहणे आवश्यक राहणार आहे. याव्यतिरिक्त, राज्यपालांच्या आगमनाच्या वेळी तसेच त्यांच्या भाषणांपूर्वी आणि नंतरही समान निर्धारित कालावधी व कडवी अनिवार्य करण्यात आली आहे. या सरकारी आदेशाचा उद्देश अधिकृत प्रोटोकॉलचा एक भाग म्हणून राष्ट्रगीताचा आदर राखणे आणि त्याच्या सादरीकरणात एकरूपता सुनिश्चित करणे हा आहे. त्यामुळे आता सर्व सरकारी कार्यक्रमांमध्ये हे गीत विहित वेळेच्या मर्यादेत गायले किंवा वाजवले जाणार आहे.

वंदे मातरम् हे मूळतः संपूर्ण भारताचे राष्ट्रगीत नव्हते, तर ते बंगालसाठी एक गाणे म्हणून सुरू झाले, असा अनेकांनी दावा केला होता. बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी हे गाणे संस्कृत भाषेत लिहिले आणि ७ नोव्हेंबर १८७५ रोजी ‘बंगदर्शन’ या जर्नलमध्ये प्रकाशित केले. नंतर ते त्यांच्या आनंदमठ (१८८२) या कादंबरीत प्रकाशित झाले.

◂(वृत्तसंस्था)

### सिनेमा हॉलला वगळले

**पद्म पुरस्कार समारंभासारख्या नागरी पुरस्कार समारंभांमध्ये किंवा राष्ट्रपती उपस्थित असलेल्या कोणत्याही कार्यक्रमातही वंदे मातरम् वाजवले जाईल. तथापि, सिनेमा हॉलना नवीन नियमांमधून वगळण्यात आले आहे.**



राम सातपुते यांनीच आगाऊपणा करत गुलालाची पिस्तूल बाबा मानेंच्या तोंडावर मारण्याचा प्रयत्न झाला, त्यानंतर रागाच्या भरात एकमेकांमध्ये धराधरी झाली. या प्रकाराला हत्येच्या सातपुतेंनी कटासारखे स्वरूप देणे योग्य नाही.
**उत्तमराव जानकर**, आमदार राकाँशप


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६




मला असे वाटते की राज ठाकरेच नरेंद्र मोदींना जास्त घाबरत आहेत. त्यांनी मोदींना घाबरू नये, उलट त्यांच्या जवळ जावे. मोदींसाठी सर्व जनता समान आहे. ज्या पद्धतीने रामाला सर्व प्रजा समान होती, त्याचप्रमाणे मोदींसाठीही सर्व नागरिक समान आहेत.
**भगतसिंह कोश्यारी**, माजी राज्यपाल



# देशभरात ३९ लाख किलो गांजा जप्त

## ओडिशातून सर्वाधिक तस्करीच्या घटना उघडकीस

**◆ नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

अंमली पदार्थविरोधी संस्थांनी २०२० पासून देशभरात तब्बल ३९ लाख किलो गांजा जप्त केला आहे. यापैकी २७ टक्के गांजा केवळ ओडिशातून जप्त केला, अशी माहिती लोकसभेत दिलेल्या लेखी उत्तरात देण्यात आली आहे.

२०२० ते नोव्हेंबर २०२५ या काळातील कारवायांची माहिती केंद्रीय गृहमंत्रालयाने संसदेत दिली आहे. २०२० मध्ये ५ लाख ८८ हजार तर २०२१ मध्ये ८ लाख १६ हजार गांजा जप्त केला. २०२२ मध्ये ७ लाख २२ हजार, २०२३ मध्ये ६ लाख ३२ हजार, २०२४ मध्ये ५ लाख ४ हजार तर २०२५ मध्ये ५ लाख ८९ हजार किलो गांजा जप्त केल्याची माहिती लोकसभेत सादर करण्यात आली. एकट्या ओडिशा जिल्ह्यात तब्बल १० लाख ६५ हजार किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. राजस्थानातून जप्त करण्यात आलेल्या गांजाची आकडेवारीही चकित करणारी आहे. २०२० मध्ये १४ हजार ८२६ किलो गांजा जप्त केला तर २०२५ मध्ये हा आकडा ५८ हजार १४६ किलोपर्यंत पोहचला. पश्चिम बंगालमध्येही मोठ्या प्रमाणात गांजा जप्त केला. २०२० मध्ये २५ हजार ९७९ किलो तर २०२५ मध्ये ३२ हजार ४५६ किलो गांजा जप्त करण्यात आला.

विशेष म्हणजे छत्तीसगड आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये गांजा जप्तीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून आले आहे. २०२१ मध्ये छत्तीसगडमध्ये ३६ हजार २११ तर २०२५ मध्ये १५ हजार २३५ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. गांजा तस्करी रोखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. तस्करीच्या मार्गावर एआय आधारित आधुनिक कॅमेरे, रडार यंत्रणा आणि ड्रोन्सच्या मदतीने लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती केंद्रीय गृहराज्य मंत्री नित्यानंत राय यांनी लोकसभेत दिली आहे. (वृत्तसंस्था)

### आंध्र प्रदेश दुसऱ्या स्थानावर



**गेल्या सहा वर्षांच्या काळात ओडिशानंतर आंध्र प्रदेशात सर्वाधिक गांजा तपास संस्थांच्या हाती लागला. राज्यात एकूण ५ लाख ५० हजार गांजा जप्त करण्यात यश मिळाले. वार्षिक आकडेवारीत मात्र, घट झाल्याचे दिसून आले. २०२१ मध्ये २ लाख तर २०२५ मध्ये त्यात घट होऊन ४४ हजार १८२ किलो गांजा जप्त करण्यात आला.**

### पूर्वोत्तर राज्यांमध्ये जप्तीच्या प्रकरणांमध्ये वाढ

**पूर्वोत्तर राज्यांमध्ये गांजा तस्करीत वाढ झाल्याचे आकडेवारीवरून उघड झाले आहे. सहा वर्षांच्या काळात २ लाख ४६ हजार गांजा जप्त करण्यात आला. तिसऱ्या क्रमांकावरील उत्तर प्रदेशानंतर पूर्वोत्तर भागाचा क्रमांक लागतो.**



सोमालियातील मोगादिशू विमानतळावर मंगळवारी धावपट्टीवर उतरत असताना स्टारस्काय कंपनीच्या विमानाला अपघात झाला. धावपट्टीवरून घसरून हे विमान जवळच्याच जलाशयात घुसले. सुदैवाने पाणी जास्त नसल्याने ५५ प्रवासी थोडक्यात बचावले

# गयानाच्या मंत्र्याने हिंदीत दिले भाषण

### व्हिडीओ व्हायरल



**◆ जॉर्ज टाऊन, ११ फेब्रुवारी**

दक्षिण अमेरिकेतील देश गयानाच्या संसदेत भारतीय वंशाचे मंत्री विकास रामकिसन यांचे हिंदीत दिलेले भाषण सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. संसद अधिवेशनादरम्यान त्यांनी विरोधकांच्या त्या दाव्याला हिंदीत उत्तर दिले, ज्यात त्यांना हिंदी येत नाही, असे म्हटले होते.

विरोधी पक्षाचे खासदार विष्णू पांडे यांनी सभागृहात टिप्पणी केली की विकास रामकिसन यांना हिंदीचा एक शब्दही येत नाही. यावर रामकिसन यांनी अध्यक्षांची परवानगी घेतली आणि सांगितले की त्यांना याच मुद्यावर हिंदीत उत्तर द्यायचे आहे.

यानंतर त्यांनी हिंदीत बोलताना विरोधी पक्षाच्या खासदाराला खुले आव्हान दिले. रामकिसन म्हणाले, मी त्यांना आत्ताच आव्हान देतो की कोणत्याही स्तरावर, कोणत्याही ठिकाणी, विषय त्यांनी ठरवावा आणि मी कागद न पाहता हिंदीत वादविवाद करेन. मंत्री विकास रामकिसन यांच्या भाषणाचा व्हिडीओ नंतर सोशल मीडियावर शेअर करण्यात आला, जो मोठ्या संख्येने लोक पाहत आणि शेअर करत आहेत. हा व्हिडीओ भारताच्या उच्चायुक्तालयाने गुयानाची राजधानी जॉर्जटाउन येथून एक्सवर पोस्ट केला होता. त्यानंतर तो वेगाने व्हायरल झाला आणि भारत तसेच अनेक देशांतील लोक मंत्र्यांच्या हिंदी भाषेचे कौतुक करत आहेत.

गयानामध्ये भारतीय वंशाची लोकसंख्या मोठ्या संख्येने राहते. एकूण लोकसंख्येच्या सुमारे ४० टक्के भाग भारतीय वंशाच्या लोकांचा आहे. ही कोणत्याही लॅटिन अमेरिकन देशातील भारतीय स्थलांतरितांची सर्वात मोठी लोकसंख्या आहे. (वृत्तसंस्था)

# आसाममध्ये भारतातील सर्वांत लांब भूकंपरोधक पूल तयार

### चीनलगतच्या सीमेवर संपर्क प्रस्थापित होणार

**◆ गुवाहाटी, ११ फेब्रुवारी**

आसाममधील ब्रह्मपुत्रा नदीवर उत्तर आणि दक्षिण गुवाहाटीला जोडणारा पहिला सहा-पदरी भूकंपरोधक पूल अर्थात महासेतू तयार झाला आहे. हा पूल केवळ आसामसाठीच नव्हे, तर देशासाठीही खास आहे, कारण हा भारतातील सर्वात लांब भूकंपरोधक पूल असेल.

हा पूल भूकंप-प्रतिरोधक तंत्रज्ञानाने डिझाइन केला आहे आणि त्याचे अंदाजित आयुष्य १०० वर्षे आहे. आसामचा हा प्रदेश भूकंप झोन-६ मध्ये येतो, त्यामुळे पुलामध्ये विशेष पेंडुलम प्रणाली बसवण्यात आली आहे, जी भूकंपाचे धक्के सहन करून त्यांना खाली सरकवते.

एक्स्ट्राडोसेड पूल गर्डर आणि केबल या दोन्ही तंत्रज्ञानावर आधारित असतो. यामुळे तो पारंपरिक पुलांपेक्षा अधिक मजबूत आणि



किफायतशीरही असतो. पुलाचे बांधकाम सुमारे ९९ टक्के पूर्ण झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी याच महिन्यात त्याचे उद्‌घाटन करतील अशी शक्यता आहे.

सोनाराम हायस्कूलजवळ असलेला हा सहापदरी विशाल पुल दक्षिण आणि उत्तर गुवाहाटी भागांना जोडतो. ब्रम्हपूत्रा नदीवरच भारतातील सर्वात लांब असलेला ढोला सादिया पुल असून त्याची लांबी तब्बल ९.१५ किलोमीटर आहे. या पुलाने आसाम आणि अरूणाचल प्रदेश ही राज्ये रस्ता मार्गाने जोडली गेली आहेत. सोबतच ४.९४ किलोमीटर लांबीचा बोगिबील हा रेल्वे आणि रस्ता पूलही आहे. धुबरी-फुलबारी हा १९ किलोमीटर लांबीच्या पुलाचे बांधकाम सुरू असून हा भारतातील सर्वांत लांबीचा पुल ठरू शकतो. (वृत्तसंस्था)

### अकासा एअरचे अय्यर यांचा राजीनामा

**◆ नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

अकासा एअरचे सहसंस्थापक आणि मुख्य व्यावसायिक अधिकारी प्रवीण अय्यर यांनी राजीनामा दिला आहे. मागील चार महिन्यांत मोठ्या पदावरील दुसरी व्यक्ती या माध्यमातून कंपनीबाहेर पडली आहे.

पाच वर्षांच्या उल्लेखनीय प्रवासानंतर अय्यर यांनी त्यांच्या आयुष्यातील पुढील अध्याय सुरू करण्यासाठी पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे, असे विमान कंपनीने बुधवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. कामकाज सुरळीत आणि सुलभपणे हस्तांतरित व्हावे यासाठी ते ३० एप्रिलपर्यंत ते नेतृत्व पथकासोबत असतील, असे निवेदनात म्हटले आहे.

७ ऑगस्ट २०२२ पासून उड्डाण सुरू करणाऱ्या एअरलाईन सोडणाऱ्या नीलू खत्री यांच्यानंतर अय्यर हे दुसरे सहसंस्थापक आहेत. खत्री यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये पद सोडले. ते एअरलाईनच्या कार्यकारी समितीचाही भाग आहेत. आता अकासा एअरचे आदित्य घोष, आनंद श्रीनिवासन, बेल्सन कोटिन्हो आणि भाविन जोशी हे चार सहसंस्थापक आहेत. (वृत्तसंस्था)

# बोलणे आवडले नाही म्हणून वाढविला टॅरिफ

### डोनाल्ड ट्रम्प यांचा विचित्रपणा

**◆ वॉशिंग्टन, ११ फेब्रुवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वित्झर्लंडवरील आयात शुल्क वाढवण्यामागील कारण स्पष्ट करताना धक्कादायक विधान केले आहे.स्विस नेत्याचे बोलणे आवडले नाही म्हणून टॅरिफ वाढविल्याचे ट्रम्प यांनी सांगितले.



फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांनी सांगितले की, "स्विस नेत्या करिन केलर-सटर यांच्याशी झालेल्या संभाषणानंतर कर दर वाढवण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या मते, स्वित्झर्लंड हा आकाराने लहान देश असला तरी अमेरिकेसोबतची व्यापार तूट सुमारे ४२ अब्ज डॉलर्स इतकी मोठी आहे. सुरुवातीला स्वित्झर्लंडवर ३० टक्के आयात शुल्क लावले. मात्र, यावर स्विस नेतृत्वाकडून फोन आला. करिन वारंवार स्वित्झर्लंड हा लहान देश असल्याचे सांगत सवलतीची मागणी करत होत्या. यांच्या बोलण्याची पद्धत आक्रमक वाटल्याने आणि सवलतीबाबत सातत्याने आग्रह धरल्याने त्यांनी करदर वाढवून ३९ टक्क्यांपर्यंत नेला. स्वित्झर्लंड अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर वस्तू निर्यात करत असून त्यावर योग्य शुल्क भरत नाही." (वृत्तसंस्था)

### वारंवार उल्लेख करण्याची सवय

यापूर्वी दावोस येथील जागतिक आर्थिक मंचातही ट्रम्प यांनी अशाच प्रकारच्या संभाषणाचा उल्लेख केला होता. अमेरिकेने अलीकडेच भारतासोबत व्यापार करार जाहीर केला असून त्यानंतर भारतावरील काही शुल्क दर १८ टक्क्यांपर्यंत कमी झाल्याचे ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर नमूद केले आहे. अमेरिका विविध देशांसोबतच्या व्यापार संबंधांचा पुनर्विचार करत असल्याचे या घडामोडींवरून स्पष्ट होत आहे.

# दिल्ली पोलिसांनी पेंग्विन इंडियाला पाठवली नोटीस

### एफआयआरमध्ये गुन्हेगारी कलमे जोडली

**◆ नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

माजी लष्करप्रमुख जनरल एमएम नरवणे यांच्या फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी या अप्रकाशित पुस्तकाच्या गळती प्रकरणात दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने पेंग्विन इंडियाला नोटीस पाठवली आहे.

पोलिसांनी नोटीसद्वारे कंपनीला अनेक प्रश्न विचारले आहेत आणि उत्तर मागितले आहे. पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरमध्ये गुन्हेगारी कटकारस्थानाशी संबंधित कलमेही जोडली आहेत. ही कारवाई सोशल मीडिया आणि काही ऑनलाइन वृत्त मंचांवर मिळालेल्या माहितीच्या आधारे करण्यात आली, ज्यात पुस्तकाच्या प्री-प्रिंट प्रती प्रसारित होत असल्याचा दावा करण्यात आला होता.

दरम्यान, केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी संसदेबाहेर सांगितले की, एक खासदार (राहुल गांधी) सुरक्षेशी संबंधित संवेदनशील मुद्द्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत आहेत. यापूर्वी मंगळवारी पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने सांगितले होते की, पुस्तक अजून प्रकाशित झालेले नाही. त्याचा कोणताही भाग सार्वजनिक करण्यात आलेला नाही. प्रकाशनाचे सर्व हक्क आमच्याकडे आहेत. आतापर्यंत पुस्तकाची कोणतीही छापील प्रत किंवा डिजिटल प्रत समोर आलेली नाही.

२४ तासांत दुसरी पोस्ट करीत प्रकाशित पुस्तक आणि प्री-ऑर्डर कॉपीमधील फरक स्पष्ट केला. पुस्तकाची योजना तयार असल्याचे पोस्टमध्ये म्हटले आहे, (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### प्रदर्शनालाच धमाका करणार 'धुरंधर २'

**मुंबई** : रणवीरसिंह आणि अक्षय खन्नासह मातब्बर कलाकारांची यशस्वी चमू आता पुन्हा 'धुरंधर २'च्या निमित्ताने प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. येत्या १९ मार्च रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार असून त्या दिवशी गुढीपाडवा आहे. लगेचच दोन दिवसात ईदची सुटी असल्याने या चित्रपटाला विक्रमी ओपनिंग मिळणार अशी शक्यता वर्तवली जात आहे. काही माध्यम



संस्थांनी दिलेल्या अंदाजानुसार, 'धुरंधर २'ला पहिल्याच दिवशी ६० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त कमाई होण्याची शक्यता आहे. याच्या ॲडव्हान्स बुकिंगचेही आकडे विक्रमी राहू शकतात. आतापर्यंत सर्वाधिक मोठा ओपनिंगचा विक्रम सलमान खानच्या 'भारत' चित्रपटाच्या नावे आहे. त्याने पहिल्या दिवशी ४२.३ कोटी रुपये कमावले होते. तज्ज्ञांच्या मते, 'धुरंधर २' कदाचित हा आकडा सहज पार करेल आणि पहिला ५० ते ६० कोटींचा ओपनिंग मिळवणारा चित्रपट ठरू शकेल.



केरळमधील तिरूवनंतपूरम् महानगरपालिकेचे भाजपाचे महापौर व्ही. व्ही. राजेश यांच्या नेतृत्वातील नगरसेवकांचे शिष्टमंडळ बुधवारी नवी दिल्लीच्या भेटीवर आले आहे. दिल्ली भाजपाच्या वतीने या शिष्टमंडळाचे जोरदार स्वागत करण्यात आले

# डिजिटल पद्धतीने तपासले जाणार पेपर

### सीबीएसई बारावीच्या उत्तरपत्रिका अपलोड होणार

**◆ नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

यावेळी सीबीएसई बारावीच्या १७ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका ऑन-स्क्रीन मार्किंग सिस्टिमने तपासल्या जातील. याचा अर्थ त्या डिजिटल पद्धतीने तपासल्या जातील. सीबीएसई १२वीची बोर्ड परीक्षा १७ फेब्रुवारी ते १० एप्रिल दरम्यान होणार आहे.

यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्व उत्तरपत्रिकांचे (आन्सर शीट्स) प्रत्येक पान परीक्षा केंद्रातच स्कॅन करून कॉम्प्युटर सिस्टिममध्ये अपलोड केले जाईल. सुमारे १ कोटी उत्तरपत्रिकांची जवळपास ३२ कोटी पाने स्कॅन करून अपलोड केली जातील. परीक्षक या डिजिटल उत्तरपत्रिका तपासूनच गुण देतील.

१०वी बोर्ड परीक्षांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी पूर्वीप्रमाणे कागदावरच होईल. सीबीएसईचे परीक्षा नियंत्रक संयम भारद्वाज यांच्या मते, या नवीन व्यवस्थेमुळे उत्तरपत्रिकांच्या वाहतुकीत लागणारा वेळ आणि खर्च वाचेल. शिक्षक त्यांच्या शाळेत राहूनच मूल्यांकन करू शकतील, मुलांच्या नियमित अभ्यासावर परिणाम होणार नाही. मूल्यांकन अधिक पारदर्शक, जलद आणि चुकाविरहित करण्याच्या उद्देशाने बोर्डाने ही प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. (वृत्तसंस्था)

### अरुणा इराणींना भोवले मेहमूदसोबतचे नाते

**मुंबई** : अरुणा इराणी भारतीय सिनेमातील सर्वात चर्चित अभिनेत्रींपैकी एक आहेत. व्यावसायिक जीवनासोबतच त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही खूप चर्चेत असतात. नुकतेच त्यांनी महमूदसोबतच्या त्यांच्या नात्याबद्दल मोकळेपणाने सांगितले. त्या म्हणाल्या की, आमचे नाते एका प्रकारच्या उपकार आणि मजबुरीच्या भावनेतून निर्माण झाले होते. त्यांनी माझ्याशी लग्न करणार असे सांगितले होते, पण केले नाही. ते त्यांचे तिसरे लग्न ठरले असते. त्या काळात ते लोकांना माझ्याशी लग्न केल्याचे जाहीरपणे सांगत होते. त्यामुळे माझ्या करिअरवर परिणाम झाला. निर्मात्यांनी मला काम देणे बंद केले. कारण त्यांना वाटायचे की मी गर्भवती राहिले तर चित्रपटाचे काम खोळंबेल. माझ्यासाठी मोठा धक्का होता. जेव्हा ही गोष्ट संपली आणि मी स्वतंत्रपणे काम करायला सुरुवात केली, तेव्हा लोकांना समजले की आमच्यात काहीही नव्हते.



# भारत घेणार दुर्मिळ खनिजांचा शोध

**◆ नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

चीनवरील अवलंबिय कमी व्हावे, देशाचा दुर्मिळ खनिजांचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी भारताने विदेशी भूमीतील साठ्यांचा शोध घेणे आणि त्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. ब्राझील, कॅनडा, फ्रान्स आणि नेदरलैंड सरकारशी याबाबत चर्चा सुरू केली आहे.

लिथियम आणि इतर दुर्मिळ खनिजांसाठी भारत मोठ्या प्रमाणावर चीनवर अवलंबून आहे. एका देशावरील अवलंबित्व आपणास परवडणारे नाही. गेल्या वर्षी चीनने दुर्मिळ खनिजांचा पुरवठा आवळल्यानंतर देशातील उद्योगांमध्ये अस्वस्थता पसरली होती. या दुर्मिळ खनिजांचा वापर वाहन, ऊर्जा, वैद्यकीय उपकरणे, अणुऊर्जानिर्मिती, संरक्षण क्षेत्र अशा विविध क्षेत्रांत वापर होती.

### चीनवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न

या देशांच्या सहकार्याने दुर्मिळ खनिजांचा शोध घेणे, त्यावर प्रक्रिया करण्यासाठी संयुक्त प्रकल्प राबवावा, यासाठी बोलणी सुरू केली आहेत. याशिवाय जुन्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंमधून दुर्मीळ खनिजे पुन्हा मिळविण्यासाठी देखील प्रयत्न केले जाणार आहेत. जानेवारीमध्ये जर्मनीसोबत झालेल्या महत्त्वाच्या खनिज कराराप्रमाणे इतर देशांशी करार करण्याचे भारताने ठरविले आहे. ज्यामध्ये खनिजसंपदेचा शोध, प्रक्रिया आणि पुनर्वापर तसेच दोन्ही देशांमध्ये अथवा अन्य देशांमध्ये खनिज मालमतेचे संपादन आणि विकासकामांचा यात समावेश आहे. याबावत सध्या फ्रान्स, नेदरलैंड आणि ब्राझीलशी बोलणी सुरू आहेत, तर, कॅनडासोबत याचर करार करण्यापर्यंत प्रगती झाली आहे. अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया आणि जपानशी करार केले आहेत. पेरू आणि चिलीसोवत द्विपक्षीय करारांवर चर्चा केली जात आहे. (वृत्तसंस्था)



### कॅनडासोबत मार्चमध्ये करार

**कॅनडासोबत युरेनियम, ऊर्जा, खनिजे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत लवकरच करार होणार आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीस कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी भारत भेटीवर येत आहेत. त्यात ऊर्जा सहकार्य करारावर स्वाक्षरी केली जाणार आहे. कॅनडाच्या नैसर्गिक संसाधन विभागाने भारतासोबत दुर्मीळ खनिज उत्खननाबाबत करार केला जाणार असल्याचे म्हटले होते.**

### दौसात अपघातात सहा तरुण ठार

**दौसा** : राजस्थानातील दौसा येथे राष्ट्रीय महामार्ग २१ वर मंगळवारी रात्री उशिरा झालेल्या भीषण अपघातात सहा युवकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार कैलाई बस स्टँडजवळील दुभाजकावर आदळली. त्यानंतर कार उलटी होऊन ट्रकवर जाऊन धडकली. या अपघातात कार पूर्णपणे चक्काचूर झाली. अपघातात एका काका-पुतण्यासह सहा तरुणांचा जीव गेला. मृतांची ओळख कालाखोह, सिकंदरा पोलिस स्टेशन परिसरातील रहिवासी म्हणून झाली आहे. ते सर्व तरुण एका लग्न समारंभातून परतत होते.

### आता दिग्दर्शकाच्या खुर्चीत बसणार मनवा

**मुंबई** : मराठीतील दोन गुणी महिला कलाकार आता नव्या चित्रपटासाठी एकत्र येत आहेत. 'शुभारंभ शुभदिनी' असे या चित्रपटाचे नाव असून यासाठी मनवा नाईक आणि गौरी कालेलकर चौधरी यांनी याविषयी घोषणा केली. हा चित्रपट मधुसूदन कालेलकर प्रॉडक्शन्स अंतर्गत तयार होत आहे. या चित्रपटाची कथा मनवा नाईकने लिहिली असून दिग्दर्शनही ती स्वतः करणार आहे. याआधी तिने हा अनुभव 'पोर बाजार' या चित्रपटाचे वेळी घेतला आहे. तसेच 'चूक भूल द्यावी घ्यावी' आणि 'सरस्वती' सारख्या लोकप्रिय मालिकांची निर्मिती केली आहे. अभिनेत्री म्हणून तिने 'नो एंट्री पुढे धोका आहे' आणि 'जाऊ द्या ना बाळासाहेब' अशा अनेक चित्रपटात काम केले आहे. गौरी कालेलकर-चौधरी यांनी अलिकडेच गाजलेल्या 'घरत गणपती' या चित्रपटाची निर्मिती केली होती.



## अग्रलेख...

# तेल गेले, तूप गेले अन्...

एक जुनी गोष्ट आहे. आईने सांगितल्याप्रमाणे मुलगा तेल आणि तूप घ्यायला बाजारात गेला होता. या वस्तू आणण्यासाठी त्याने धुपाटणे सोबत घेतले. हे एक उभे पात्र असते, ज्यात दोन्ही बाजूला जागा असते. त्याने दुकानदाराकडून वरच्या भागात तेल घेतले. दुकानदार म्हणाला, तूप कुठे देऊ. तर त्या मुलाने पात्र उलटे केले आणि त्यात तूप घेतले आणि परत फिरला. रस्त्यात त्याला आठवले की, तेल सुरक्षित आहे की नाही बघितले पाहिजे आणि म्हणून त्याने पात्र पुन्हा उलटे केले. त्या क्षणी तूपही गेले होते. शेवटी 'तेल गेले, तूप गेले अन् हाती केवळ धुपाटणे राहिले', अशी त्याची स्थिती झाली.

ही बोधकथा आठवण्याचे कारण म्हणजे, चंद्रपूर महानगराच्या महापौर व उपमहापौरपदाच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या तोंडापर्यंत आलेला सत्तेचा घास या पक्षाचे नेते खा. प्रतिभा धानोरकर व आ. विजय वडेट्टीवार यांच्यातील कमालीच्या भांडणाने आणि पराकोटीच्या अहंकारामुळे हिरावला गेला. २७ नगरसेवकांच्या बळावर सर्वांत मोठा पक्ष म्हणून पुढे आलेल्या काँग्रेसला मित्रपक्ष असलेल्या जनविकास सेनेच्या ३ नगरसेवकांचे बळ आधीच मिळाले होते. जनविकास सेनेने 'एआयएमआयएम'च्या एका नगरसेवकाला आपल्या गटात घेतल्याने तोही काँग्रेसचा नैसर्गिक मित्र होता. अशा एकूण ३१ सदस्यांच्या ताकदीवर काँग्रेस पक्ष अगदी सहजतेने सत्ता काबीज करू शकला असता. बहुमत सिद्ध करायला अवघ्या ३ सदस्यांची गरज होती. त्यातही निवडून आलेले दोन अपक्ष सदस्य हे काँग्रेसचेच बंडखोर होते. आ. वडेट्टीवार यांची जवळीक असलेल्या या दोघांचीही 'घरवापसी' अशक्य नव्हती. शिवाय, शिवसेना उबाठा पक्ष तडजोडीसाठी तयार होताच. पण अहंकार आडवा आला.

'तेल गेले, तूप गेले', ही म्हण या काँग्रेसच्या नेत्यांना किती चपखल लागू पडते, हे वेगळ्याने सांगण्याची गरज नाही. त्यांच्या वादामुळे ज्या पक्षाकडे जनतेने सर्वाधिक नगरसेवक देऊन सत्तेचा कौल दिला होता, त्या पक्षाला सत्तेचे एकही पद मिळाले नाही! महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या चंद्रपूरच्या या निकालाची चर्चा चवीने केली जात आहे. २७ नगरसेवक निवडून आणूनही सत्तेबाहेर राहणे, हे खासदार प्रतिभा धानोरकर आणि आमदार विजय वडेट्टीवार यांच्यातील अंतर्गत कलहाचेच फळ आहे. मित्रपक्षांना सोबत घेऊन चालण्याची प्रगल्भता दाखवण्याऐवजी, ते तर आमच्या दावणीलाच बांधले आहेत, हा अहंकार त्यांना नडला. उलट, भारतीय जनता पक्षाने बहुमतापासून खूप दूर असताना आणि तब्बल १० नगरसेवकांची गरज असताना, अगदी शेवटपर्यंत अत्यंत सजग राहून सत्ताकारणाचे उत्तम उदाहरण दाखवून दिले. विजयाचा जल्लोष साजरा होत असताना कार्यकर्त्यांनी आ. सुधीर मुनगंटीवार हे 'किंगमेकर' असल्याचे फलक मिरवले, यातच सारे काही आले. त्यांच्यासारख्या चाणाक्ष आणि मुत्सद्दी नेत्याच्या मार्गदर्शनाखाली भाजपने कमी संख्या असतानाही बाजी मारली. निवडणुकीदरम्यान अतिशय संयमी, पण आत्मविश्वासाने भरलेल्या मुनगंटीवारांच्या वक्तव्याची जराशी दखल जरी काँग्रेसच्या नेत्यांनी घेतली असती, तरी त्यांच्यावर नामुष्कीची पाळी आली नसती. भाजप आणि उबाठा यांच्यातील अनपेक्षित युती हा केवळ योगायोग नव्हता. ती सुनियोजित रणनीती होती. त्याची इतिश्री मंगळवारी मतदानाला येताना अगदी रस्त्यात गाड्या उभ्या करून अंतिम तडजोडीने झाली. काँग्रेस मात्र गाफील राहिली.

चंद्रपूरच्या निवडणुकीने राजकारणातील अनिश्चिततेचा आगळा थरार अनुभवला. अवघ्या एका मताने भाजपच्या संगीता खांडेकर यांचा विजय राजकारणात शेवटच्या मिनिटापर्यंत लढणे कसे महत्त्वाचे असते, हे सांगणारे होते. तर, उपमहापौरपदाचा सामना जेव्हा बरोबरीत सुटला आणि 'ईश्वरचिठी'ने उबाठाचे प्रशांत दानव यांची वर्णी लागली, तेव्हा नशीबही फक्त खऱ्या योद्ध्याला साथ देते हे अधोरेखित झाले. भाजपने रणनीती आखली आणि ती प्रत्यक्षात उतरवली. या सगळ्या नाट्यातून एक गोष्ट मात्र स्पष्ट होते की, केवळ संख्याबळ असणे पुरेसे नसते, तर ते सांभाळण्यासाठी आणि योग्य वेळी वापरण्यासाठी मुनगंटीवार यांच्यासारख्या चाणाक्ष पुढाऱ्याचीच गरज लागते. काँग्रेससाठी आता पश्चात्ताप करण्यापलीकडे दुसरा पर्याय उरलेला नाही.

चंद्रपूरप्रमाणेच महाराष्ट्रातील इतर महानगरांमध्येही भाजपने आपली सजगता दाखवून दिली आहे. तब्बल २५ वर्षांची ठाकरेंची सत्ता मोडीत काढत भाजपने मुंबईवर भगवा फडकवला. तिथे रितू तावडे यांना महापौरपदी बसवून इतिहास रचला गेला. मुंबईसारखे महत्त्वाचे शहर ताब्यात घेण्यासाठी या पक्षाने दाखवलेली संघटनात्मक ताकद वाखाणण्याजोगी आहे. पुणे आणि नागपूरमध्ये तर आधीच भाजपने आपले बालेकिल्ले मजबूत केले आहेत. पुण्यातील पवारांच्या वर्चस्वाला धक्का देत आपली पकड घट्ट केली, हे त्या पक्षाच्या सातत्यपूर्ण कर्माचे फळ आहे. ध्येयनिष्ठ विकास घडवून आणण्यासाठी नाही म्हटले तरी सत्तेची गरज असते. ती मिळवण्यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागते आणि ते भाजप करताना दिसते. उलट, काँग्रेस सततच्या पराभवानंतरही ही गोष्ट आत्मसात करायला तयार नाही. विकासाच्या ध्येयपथावर सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती हे भाजपचे वैशिष्ट्य आहे. उलट, चंद्रपूर महानगराच्या निवडणुकीत काँग्रेसच्या नेत्यांनी अन्य मित्रपक्षांचा अजिबात विचारच केला नाही. आपसात भांडून खा. धानोरकर व आ. वडेट्टीवार यांनी महापौर व उपमहापौरपद आपसात वाटून घेतले आणि उबाठा, जनविकास सेना यांना स्थायी समितीचे अध्यक्षपद तेवढे देण्याची तयारी दाखवली. उबाठा त्यावर ऐकणार नाही, हे सर्वांना कळत होते. ते काँग्रेस नेत्यांना का उमजले नाही, हे मात्र न समजण्यापलीकडचे आहे. खरे तर, सर्वांत मोठी अडचण खा. धानोरकर व आ. वडेट्टीवार यांच्यातील तीव्र स्पर्धेत दडलेली आहे. 'मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है', असा राग आलापणाऱ्या धानोरकर यांना, वडेट्टीवार कधीच सहन झाले नाहीत. त्यांनी चंद्रपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत नाक खुपसू नये, अशीच त्यांची आधीपासून इच्छा होती आणि त्यामुळे अगदी निवडणुकीच्या प्रचारापासूनच या दोन्ही काँग्रेसी नेत्यांमध्ये गृहयुद्ध सुरू राहिले. तरीही जनतेने काँग्रेसला २७ नगरसेवक दिले. वडेट्टीवार आणि धानोरकर यांनी मात्र काँग्रेसच्या नगरसेवकांना पक्षाचे कधी मानलेच नाही, तर 'हा माझा, हा तुझा' असेच त्यांचे नामाभिधान करून त्यांना विभाजित केले. कमी पडले तर एकमेकांचेच नगरसेवक पळवले; जसे विरोधक पळवतात तसे! आपापल्या गटाची वेगळी नोंदणी करण्याचे कारस्थानही केले गेले. उघड्या डोळ्यांनी पक्षश्रेष्ठी हे सारे बघत राहिले. आपल्या आटोक्यातले हे नाही, याची खात्री प्रदेशाध्यक्षांना पटली तेव्हा हा वाद दिल्ली दरबारी पोहोचला. दिल्लीच्या तहाप्रमाणे, महापौरपद धानोरकर गटाकडे, तर उपमहापौरपद वडेट्टीवार गटाकडे देण्याचे ठरले. या तडजोडीमुळे आनंदात असलेल्या या नेत्यांना याची जाणीवच झाली नाही, की दोन्ही पदे जर तुमच्याकडेच राहणार असतील, तर मित्रपक्षाचे काय? उबाठा पक्ष जणू आपल्या दावणीलाच बांधला आहे, असे समजून त्यांनी त्यांच्या ६ नगरसेवकांना गृहीत धरले. आधीचा मित्रपक्ष असलेल्या जनविकास सेनेला तर विश्वासातच घेतले नाही. बंडखोरांची समजूत काढण्यासाठी आपला अहंकारही त्यांनी दूर सारला नाही. शेवटी सारेच तुटले.

अगदी दगडाला जरी काँग्रेस पक्षाचा उमेदवार केला तरी तो सहज निवडून येईल, असा चंद्रपूर जिल्ह्यात एकेकाळी काँग्रेसचा दबदबा होता. २०१९ च्या निवडणुकीत बाळू धानोरकर यांनी अवघ्या महाराष्ट्रात एकमेव अशी चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची जागा राखत विक्रम नोंदवला होता. खा. प्रतिभा धानोरकर या त्यांच्याच अर्धांगिनी आहेत. पण त्यांच्या आणि राज्यात काँग्रेसचा मातब्बर नेता म्हणून ओळख असलेल्या आ. विजय वडेट्टीवार यांच्या हट्टापायी पक्षाच्या त्या पुण्याईची लक्तरे वेशीवर टांगण्याचा प्रकार चंद्रपुरात घडला. या पक्षाचे सर्वांत मोठे दुर्दैव कोणते असेल, तर अशा मोठ्या नेत्यांना आवरण्याची धमक पक्षश्रेष्ठींमध्ये उरलेली नाही. काँग्रेस पक्ष दिवसेंदिवस कसा रसातळाला जात आहे, याचे ताजे उदाहरण चंद्रपूर आहे, हे वास्तव हा पक्ष जेवढ्या लवकर मान्य करेल, तेवढे काँग्रेससाठी बरे. बाकी राजकारण आपल्या पद्धतीने होतच राहणार!

## तंत्रवेध

# सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ हवे

**डॉ. दीपक शिकारपूर**

भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांतील प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकित करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्त्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सुकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्त्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.

केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९० च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा ॲनॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पृष्ठभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणारे आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये.

२०२६ च्या अंदाजपत्रकाचा मूलभूत उद्देश 'विकसित भारत' या संकल्पनेभोवती फिरतो. आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करणे हे या अंदाजपत्रकाचे प्रमुख स्तंभ आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्र या सर्व उद्दिष्टांचा केंद्रबिंदू असल्याने धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे आयटी आणि आयटी-संबंधित सेवांचे एकत्रीकरण. सॉफ्टवेअर सेवा, आयटी-एनेबल्ड सर्व्हिसेस, ज्ञानाधारित प्रक्रिया सेवा आणि कराराधारित संशोधन या सर्व सेवा एका एकसमान 'माहिती तंत्रज्ञान सेवा' या वर्गाखाली आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर नियमांमध्ये स्पष्टता येते, कंपन्यांवरील अनुपालनाचा ताण कमी होतो आणि उद्योगासाठी एक स्थिर, पूर्वानुमान करता येणारे वातावरण निर्माण होते. विशेषतः लहान आणि मध्यम आयटी कंपन्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये करधोरणाच्या दृष्टीने 'सेफ हार्बर' नियमांमध्ये करण्यात आलेली सुधारणा आयटी क्षेत्रासाठी दिलासादायक आहे. सेफ हार्बरची मर्यादा लक्षणीयरीत्या वाढवण्यात आल्याने मोठ्या उलाढाली असलेल्या कंपन्यांनाही कर निर्धारणात निश्चितता मिळणार आहे. कर वाद, नोटिसा आणि प्रदीर्घ न्यायप्रक्रिया यापासून उद्योगांची सुटका होऊन कंपन्या मुख्य व्यवसायावर अधिक लक्ष केंद्रित करू शकतील. याचा थेट परिणाम उत्पादकतेवर आणि जागतिक स्पर्धात्मकतेवर होणार आहे.

ताज्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. डेटा सेंटर्स, क्लाऊड सेवा आणि उच्च क्षमतेचे नेटवर्क हा आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परदेशी क्लाऊड कंपन्यांना भारतातील डेटा सेंटर्स वापरून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी २०४७ पर्यंत 'टॅक्स हॉलिडे' जाहीर करण्यात आला आहे; भारतीय ग्राहकांसाठी स्थानिक रिसेलरद्वारे सेवा द्यावी लागेल. संबंधित डेटा सेंटर प्रदात्यांसाठी १५ टक्के खर्चावर सेफ हार्बर मार्जिन उपलब्ध आहे. भारताला जागतिक डेटा हब बनवण्याच्या दृष्टीने डेटा सेंटर्ससाठी करसवलती, दीर्घकालीन धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येतो. यामुळे परदेशी तसेच देशांतर्गत गुंतवणूक वाढून आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान हा अंदाजपत्रकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी सरकारी पाठबळ देण्याचे संकेत मिळतात. आयटी क्षेत्र आता केवळ सेवा पुरवठादार न राहता नवकल्पनांचा स्रोत बनत आहे. स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञानातील नेतृत्व भूमिका बजावू शकतो. मानव संसाधन विकास हा आयटी क्षेत्राचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल कौशल्य विकासावर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील युवकांना आयटी कौशल्ये मिळावीत, महिलांचा तंत्रज्ञान क्षेत्रातील सहभाग वाढावा आणि नवीन पिढी भविष्यातील नोकऱ्यांसाठी सज्ज व्हावी यासाठी विविध योजना आणि प्रशिक्षण कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. यामुळे आयटी क्षेत्राचा सामाजिक प्रभाव अधिक व्यापक होणार आहे.

आयटी क्षेत्राचा प्रभाव केवळ आर्थिक मर्यादित न राहता प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक समावेशनापर्यंत विस्तारला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाईन शिक्षण आणि टेलिमेडिसिन यासारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ होत आहे. अंदाजपत्रक २०२६ या डिजिटल परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न करते. यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समावेशक विकास साध्य होऊ शकतो. तथापि, या संधींसोबतच काही आव्हानेही आहेत. जागतिक आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्यातील तफावत यांचा सामना आयटी क्षेत्राला करावा लागणार आहे. अंदाजपत्रकाने दिशा दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी, धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि उद्योग-शिक्षण-संशोधन यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे.

एकूणच, यंदाचा अर्थसंकल्प आयटी क्षेत्रासाठी सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना तसेच कौशल्य विकासावर लक्ष यामुळे आयटी क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनात आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल. योग्य अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास आयटी क्षेत्र भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या प्रवासात निर्णायक योगदान देईल, अशी आशा बाळगता येते.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# सब्जेक्ट टु मार्केट रिस्क

मार्च महिना जवळ आला की देशभरात गुंतवणुकीचा महोत्सव सुरू होतो. टेलिव्हिजन, मोबाईल, वृत्तपत्र, सोशल मीडिया-सर्वत्र शेअर मार्केट, म्युच्युअल फंड, इन्शुरन्स, टॅक्स सेव्हिंग प्लॅन यांच्या जाहिरातींचा पूर येतो. आता गुंतवा भविष्यात सुरक्षित व्हा, डबल रिटर्न, टॅक्समध्ये मोठी सूट अशा आकर्षक शब्दांत सर्वसामान्य माणसाला स्वप्नं दाखवली जातात. मार्च अखेरपर्यंत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होतेही. मात्र प्रश्न असा आहे की, ही गुंतवणूक करताना सामान्य माणसाला त्या योजनेची खरी माहिती असते का?

बहुतेक वेळा उत्तर नकारार्थीच असते. किती रिटर्न मिळणार, त्यावर किती टॅक्स लागणार, तो रिटर्न हमखास आहे की बाजारावर अवलंबून आहे, तोटा झाला तर जबाबदारी कुणाची, या मूलभूत प्रश्नांची उत्तरे न समजूनच अनेक जण आपली आयुष्यभराची जमापुंजी गुंतवतात. काही महिन्यांनी बाजार घसरतो, युनिट्सची किंमत कमी होते आणि मग डोक्यावर हात मारून बसायची वेळ येते.

या सगळ्या जाहिरातींच्या शेवटी एक वाक्य हमखास असतं- 'सब्जेक्ट टु मार्केट रिस्क.' हे वाक्य इतक्या झपाट्याने, इतक्या छोट्या अक्षरांत वाचून दाखवलं जातं की सामान्य माणसाला त्याचा अर्थ कळण्याआधीच जाहिरात संपते. मोठे अभिनेते, क्रिकेटपटू, सेलिब्रिटी हे प्रॉडक्ट्स प्रमोट करतात, त्यामुळे लोकांचा विश्वास आणखी वाढतो. सचिन सांगतोय म्हणजे बरोबरच असेल, धोनीने केलंय म्हणजे सुरक्षितच असेल, असा समज तयार होतो. मात्र अलिकडेच काही नामवंत क्रिकेटपटूंना सेबी व आयआरडीएने नोटीस दिल्याच्या बातम्या समोर आल्या. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते जाहिरात करणारी सेलिब्रिटी जबाबदार नसते, जबाबदारी




शेवटी गुंतवणूकदाराचीच असते. मग प्रश्न उरतो, 'सब्जेक्ट टु मार्केट रिस्क' म्हणजे नेमकं काय? याचा साधा अर्थ असा की, या गुंतवणुकीवरचा नफा किंवा तोटा पूर्णपणे बाजारावर अवलंबून आहे. इथे हमी नाही, खात्री नाही, निश्चित रिटर्न नाही. बाजार वाढला तर फायदा, घसरला तर नुकसान- इतकंच सरळ गणित आहे. पण ही गोष्ट सर्वसामान्य माणसाला किती जण समजावून सांगतात? म्हणूनच गुंतवणूक करताना काही खबरदारी अत्यावश्यक आहे.

कोणतीही योजना घेताना फक्त जाहिरात पाहून निर्णय घेऊ नका. योजनेची कागदपत्रे नीट वाचा, टॅक्सचे नियम समजून घ्या, तुमची जोखीम घेण्याची क्षमता तपासा. हमी आणि अंदाज यातला फरक ओळखा. शक्य असेल तर स्वतंत्र, विश्वासार्ह आर्थिक सल्लागाराचा सल्ला घ्या- सेल्समनचा नाही. गुंतवणूक चुकीची नाही, पण अज्ञानातून केलेली गुंतवणूक धोकादायक आहे. 'सब्जेक्ट टु मार्केट रिस्क' हे फक्त वाक्य नाही, ती एक स्पष्ट सूचना आहे, पण ती समजून घेण्याची जबाबदारी आपली आहे. अन्यथा मार्चमध्ये गुंतवणूक आणि एप्रिलमध्ये पश्चात्ताप, हेच सर्वसामान्य माणसाचं नशीब बनून राहील. गुंतवणूक चुकीची नाही, पण अज्ञानातून केलेली गुंतवणूक धोकादायक आहे. म्युच्युअल फंड, शेअर मार्केट, युलिप, हायब्रिड प्लॅन सर्व काही भविष्यासाठी सर्वोत्तम म्हणून मांडलं जातं. पण या झगमगाटामागे एक प्रश्न कायम दुर्लक्षित राहतो की या सगळ्यांच नियमन नेमकं कोण आणि किती प्रभावी? सेबी, आयआरडीए, अर्थ मंत्रालय हे सगळे रेग्युलेटर फक्त नियम बनवण्यासाठी आहेत की सर्वसामान्य गुंतवणूकदाराचं संरक्षण करण्यासाठी? जाहिरातीच्या शेवटी वेगात वाचलं जाणारं सब्जेक्ट टु मार्केट रिस्क एवढीच काय ती त्यांची जबाबदारी उरली आहे का? सामान्य माणसाला हे वाक्य समजत नसेल, तर तो दोष कुणाचा, गुंतवणूकदाराचा की यंत्रणेचा? आज बाजाराधिष्ठित उत्पादनांची जाहिरात करताना मोठमोठे सेलिब्रिटी पुढे येतात. पण बाजार कोसळला, रिटर्न शून्य झाला, गुंतवणूक अर्धी बुडाली की कोणीही पुढे येत नाही. तेव्हा रेग्युलेटर फक्त तुम्ही धोका स्वीकारला होता असं सांगून मोकळे होतात. मग प्रश्न उभा राहतो की सर्व धोका सामान्य माणसाचाच आणि नफा सगळ्यांचाच का? रेग्युलेटर बाजाराला मोकळं रान देतात, पण सरकारी संस्थांवर नियमांची कात्री लावतात, हा विरोधाभासही विचार करण्यासारखा आहे. एलआयसीसारख्या संस्थांवर हमीची जबाबदारी, पारदर्शकता, सामाजिक बांधिलकी सगळं बंधनकारक. पण खाजगी, बाजाराधिष्ठित उत्पादनांमध्ये नुकसान झालं की मार्केट रिस्क नावाची ढाल पुढे केली जाते. आज गरज आहे ती गुंतवणूकदार शिक्षणाच्या जाहिरातींची, स्पष्ट भाषेत जोखीम समजावून सांगण्याची आणि दिशाभूल करणाऱ्या प्रचारावर कठोर कारवाईची. रेग्युलेटरने फक्त नोटीस पाठवण्यापुरतं न थांबता, सामान्य माणसाच्या हिताचं रक्षण हे आपलं मुख्य उद्दिष्ट मानलं पाहिजे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र


# लोकसभा सभापतींविरुद्धचे अविश्वास प्रस्ताव

**श्यामकांत जहागीरदार**

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्तावाची सूचना काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी लोकसभेत सादर केल्यामुळे राजधानी दिल्लीत राजकीय वातावरण तापले आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्धच्या महाभियोग प्रस्तावावरून धक्कादायक राजकीय घडामोडी घडल्या होत्या. यावेळी अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांतील विशेषत: काँग्रेसमधील संघर्षाने गाजत आहे.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी लोकसभेत जो गदारोळ झाला, त्याने संसदीय लोकशाहीचा आतापर्यंतचा गौरवशाली इतिहास कलंकित झाला. संसदेच्या प्रत्येक अधिवेशनात लोकसभेत आणि राज्यसभेत गदारोळ होत असतो. अध्यक्ष वा सभापतींच्या आसनासमोर येऊन हातात पोस्टर्स फडकवत घोषणाबाजी करणे काही नवीन नाही. संसदेत गदारोळ झाला नाही, विरोधी पक्षांच्या सदस्यांनी गोंधळ घातला नाही, असे एकही अधिवेशन आजपर्यंत झाले असेल, असे वाटत नाही.

पण यावेळी विरोधी पक्षाच्या महिला सदस्यांनी पंतप्रधानांच्या आसनाच्या दिशेने धाव घेत त्याठिकाणी घोषणाबाजी केली. एकप्रकारे पंतप्रधानांना घेराव घालण्याचा प्रयत्न केला. काहीतरी अप्रिय करण्याचा विरोधी पक्षांच्या महिला सदस्यांचा प्रयत्न आहे, याची कल्पना आल्यामुळे सभापती ओम बिर्ला यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सभागृहात येण्यापासून रोखले. त्यामुळे संभाव्य अनुचित प्रसंग टळला. यामुळे पंतप्रधानांना अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देता आले नाही. पंतप्रधानांच्या उत्तराच्या भाषणाशिवायच धन्यवाद प्रस्ताव लोकसभेला पारित करावा लागला. लोकसभेत सातत्याने सुरू असलेल्या गोंधळाची परिणती आठ सदस्यांच्या अधिवेशन संपेपर्यंतच्या निलंबनात झाली. याआधी याच्यापेक्षा जास्त सदस्य लोकसभेत आणि राज्यसभेत निलंबित झाले आहेत. एका अधिवेशनात दोन्ही सभागृहांच्या मिळून सव्वाशेवर सदस्यांना निलंबित करण्यात आले होते. पण यावेळी विरोधकांनी लोकसभेच्या सभापतींविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल करून आरपारच्या लढाईचे संकेत दिले आहेत. या लढाईचा निकाल काय आहे, हे त्यांनाही माहिती आहे. लोकसभेत भाजपाच्या नेतृत्वातील सत्तारूढ रालोआचे बहुमत असल्यामुळे हा प्रस्ताव पारित होऊ शकणार नाही, याची जाणीव विरोधी पक्षांना नाही, असे नाही. तरी सुद्धा त्यांनी ओम बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे.



लोकसभेच्या सभापतींना पदावरून हटवण्यासाठी जो प्रस्ताव आणला जातो, त्याला तांत्रिकदृष्ट्या अविश्वास प्रस्ताव म्हणजे 'नो कॉन्फिडन्स मोशन' म्हणत नाही, तर 'रिझोल्युशन टु रिमुव्ह स्पीकर' असे म्हटले जाते. घटनेच्या ९४ सीनुसार दोन सदस्य असा प्रस्ताव देऊ शकतात. यावेळच्या सभापतींविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावावर ११८ सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. अविश्वास प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी विरोधी पक्षांच्या सदस्यांना कोणत्याही अडथळ्याशिवाय भाषण करता येते, आपल्या मनातील भावना व्यक्त करता येतात. विरोधी पक्षांच्या दृष्टीने अविश्वास प्रस्तावाची उपलब्धी एवढीच आहे. लोकसभेच्या सभापतींविरुद्ध सादर झालेला हा चौथा अविश्वास प्रस्ताव आहे. विशेष म्हणजे यातील एकही अविश्वास प्रस्ताव आतापर्यंत पारित होऊ शकला नाही.

१८ डिसेंबर १९५४ ला लोकसभेचे पहिले सभापती गणेश वासुदेव उपाध्य दादासाहेब मावळणकर यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आला होता. समाजवादी पक्षाचे विघ्नेश्वर मिश्रा आणि २१ सदस्यांनी या प्रस्तावाची सूचना दिली होती. मावळणकर यांची सभागृहातील भूमिका निष्पक्ष नाही, तर सत्ताधारी काँग्रेसच्या सदस्यांना ते झुकते माप देतात, विरोधकांच्या स्थगन प्रस्तावाच्या सूचना फेटाळून लावतात, असा आरोप तेव्हा त्यांच्यावर अविश्वास प्रस्ताव आणताना विरोधी पक्षांनी केला होता. दोन तासांच्या सभागृहातील चर्चेनंतर हा प्रस्ताव फेटाळला गेला. या चर्चेत तेव्हाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचेही भाषण झाले होते. विरोधकांनी आणलेला अविश्वास प्रस्ताव हा दुर्भावनापूर्ण आहे, विरोधकांनी पूर्ण न वाचताच या प्रस्तावावर स्वाक्षरी केली असावी, असे वाटते. लोकसभेचे सभापती हे निष्पक्षता आणि सभागृहाच्या प्रतिष्ठेचे प्रतीक आहेत. अध्यक्षांसमोर असणाऱ्या आव्हानांकडे आम्हाला दुर्लक्ष करता येणार नाही, असे नेहरू तेव्हा म्हणाले होते. सभापतींविरुद्धचा अविश्वास प्रस्ताव हा एका व्यक्तीविरुद्ध नाही तर सभागृहाच्या सर्वोच्च अशा प्रतिष्ठेविरुद्ध आहे, याकडे नेहरू यांनी लक्ष वेधले होते. प्रस्तावाला समर्थन देणाऱ्या डाव्या पक्षांचा लोकशाहीवर विश्वास नसल्याचा आरोपही नेहरूंनी केला होता. सभापतींविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावावर सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांपेक्षा विरोधी पक्षांच्या सदस्यांना जास्त वेळ द्यावा, त्यांना त्यांचे म्हणणे सभागृहात मांडू द्यावे, असे आवाहनही नेहरू यांनी केले होते. विशेष म्हणजे या अविश्वास प्रस्तावावरील चर्चेचा कोणताही व्हीप जारी न करता सदस्यांना सद्सदविवेकबुद्धीने मतदान करण्याचे स्वातंत्र्य नेहरू यांनी काँग्रेसच्या सदस्यांना दिले होते. हा अविश्वास प्रस्ताव मोठ्या फरकाने फेटाळला गेला.

सभापतींविरुद्धचा दुसरा अविश्वास प्रस्ताव २४ नोव्हेंबर १९६६ ला लोकसभेचे तत्कालीन सभापती सरदार हुकूमसिंह यांच्याविरुद्ध समाजवादी पक्षाचेच मधु लिमये यांनी आणला होता. पण या प्रस्तावाला ५० सदस्यांचा पाठिंबा न मिळाल्यामुळे तो बारगळला होता. तिसरा अविश्वास प्रस्ताव बलराम जाखड यांच्याविरुद्ध माकपचे सोमनाथ चटर्जी यांनी दाखल केला होता. हा प्रस्तावही बहुमताच्या अभावी फेटाळला गेला होता. लोकसभेच्या सभापतींविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल करणारे माकपचे सोमनाथ चटर्जी नंतर लोकसभेचे सभापतीही झाले होते. सुदैवाने त्यांना अविश्वास प्रस्तावाचा सामना करावा लागला नाही.

काँग्रेसच्या अविश्वास प्रस्तावावर लोकसभेत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यातील पहिल्या दिवशी म्हणजे ९ मार्चला चर्चा होण्याची शक्यता आहे. हा प्रस्ताव चर्चेला घेतल्यानंतर त्याच्या समर्थनार्थ ५० खासदारांनी उभे राहून त्याला समर्थन दिले पाहिजे. ५० खासदारांनी उभे राहून प्रस्तावाला समर्थन दिल्यानंतर सभागृहात त्यावर चर्चा होते. विशेष म्हणजे या चर्चेला उत्तर देण्याचा म्हणजे आपल्यावरील आरोप खोडून काढण्याचा अधिकार सभापतींना मिळत असतो. हा प्रस्ताव पारित झाल्यानंतर त्यांना हटवता येते. पण आजपर्यंत आपल्या संसदेत लोकसभा सभापतींना मुदत संपण्याच्या आधी अविश्वास प्रस्तावाच्या माध्यमातून हटवण्यात आले नाही. यावेळीही लोकसभेत सत्ताधारी पक्षाचे पूर्ण आणि निर्विवाद बहुमत असल्यामुळे हा अविश्वास प्रस्ताव फेटाळला जाणार, हे निश्चित आहे.

ओम बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव मांडून काँग्रेसने 'आ बैल मुझे मार'ची स्थिती आपल्या हाताने ओढवून घेतली आहे. विनाशकाले विपरीत बुध्दी असे काँग्रेसच्या या भूमिकेचे वर्णन करायला हरकत नाही.

९८८१७१७८१७

### एआय नियंत्रित वाहतूक सिग्नल फायद्याचे

वरील विषयाशी संबंधित बातमी वाचली व नागपूरच्या बेशिस्त वाहतुकीला आता नियंत्रण लाभेल याची आशा पल्लवित झाली. नागपूरला नुसत्या दुचाकीच नव्हे तर, ऑटो व कधी कधी चारचाकी वाहने सुद्धा अकस्मात उलट दिशेने येऊन अपघाताची



शक्यता वाढवतात. चालकाला हटकले तर मुजोरी करतात. 'पुलीस कुछ कहते नहीं, तू क्यौं बोलता है', अशी नागपुरी भाषेत दाट ऐकावी लागते. बेशिस्त व आळशी लोक भेकड असतात. कायद्याचा बडगा उगारल्याशिवाय ते सुधारत नाहीत. याविषयी पोलिस अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता, ते 'स्टाफची कमी असल्याचे' सांगतात व बाहेर देशात असे प्रश्न का उद्भवत नाहीत, याचे आश्चर्य वाटते. मागे नागपुरात अनेक प्रमुख चौकांत कॅमेरे लावलेले होते, पण ते आता काढून टाकण्याचे कारण समजले नाही.

भारत आता प्रगत देश होण्याकडे वाटचाल करीत आहे. एआय सिग्नलसारख्या आधुनिक पद्धतीमुळे लोकांना शिस्त लागेल व विकासकार्यात नक्कीच मदत होईल. बाहेरच्या अनेक देशांमध्ये अशी प्रणाली कार्यरत आहे व नियम तोडल्यास काही क्षणातच दंड झाल्याचा संदेश फोनवर येतो. यामुळे अपघातांना आळा बसतो व निर्दोष जिवांचे प्राण वाचतात. ही आधुनिक प्रणाली काही लोकांना आवडणार नाही, पण बहुतेकांच्या मते ही सर्वांच्या फायद्याचीच आहे, हे सिद्ध होईल.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### शहरातील आव्हाने...

शहरे हे आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक केंद्रे असून त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. परंतु, वाढती लोकसंख्या, जागेचा अभाव, प्रदूषण, वाहतूक अडचणी आणि पायाभूत सुविधा यासारखी अनेक आव्हाने आहेत. या आव्हानांवर योग्य तोडगा शोधणे आवश्यक आहे, जेणेकरून शहरांचा विकास संतुलित आणि शाश्वत होईल. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे ताण वाढत आहे. नवीन उद्योग, रोजगार संधी आणि शिक्षणासाठी लोक शहरांकडे वळतात. मात्र, यामुळे जागेचा तुटवडा, वाहतूक कोंडी, कचऱ्याचे व्यवस्थापन आणि प्रदूषण या समस्यांना जन्म देतो. याशिवाय, पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, पाणीपुरवठा आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजा भागवण्यात अडचणी येतात.

आजच्या जगात शहरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची झाली आहे. उद्योगधंदे, शिक्षण संस्था, रोजगार अशा अनेक संधी शहरांमध्ये उपलब्ध झाल्या आहेत. परंतु, या वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, ज्या शहरातील जीवनावर परिणाम करतात. शहरातील मुख्य आव्हाने म्हणजे वाहतूक कोंडी, वायुप्रदूषण, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन, वाढीव लोकसंख्या, रहिवाशांची गरिबी आणि आरोग्यसेवा. वाहतूक कोंडीमुळे वेळेची हानी होते आणि वायुप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. पाणीटंचाईमुळे पिण्याच्या पाण्याचा अभाव असतो, तर कचरा व्यवस्थापनाच्या अभावाने शहरांमध्ये आरोग्य धोक्याची शक्यता वाढते. याशिवाय, वाढती लोकसंख्या ही शहरातील संसाधनांवर ताण आणते, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास होतो. शहरातील या आव्हानांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. योग्य त्या उपाययोजना राबविल्यास, जसे की, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारणे, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, पाणीसंवर्धन, कचरा व्यवस्थापन यावर लक्ष केंद्रित करणे, पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी फुटपाथ, तर या समस्या काहीशी कमी होऊ शकतात. शहरी जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी या आव्हानांवर योग्य ते लक्ष देणे आवश्यक आहे. नागरिक, प्रशासन आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय साधल्यास, शहरांचे भवितव्य अधिक सुरक्षित आणि सुसूत्र बनू शकते. एकत्रित प्रयत्नांनीच आपण या आव्हानांना सामोरे जाऊ शकतो. वाढत्या वाहनसंख्येमुळे वाहतूक व्यवस्था कोलमडते, त्यामळे प्रवास वेळखाऊ होतो. वाढत्या लोकसंख्येमुळे घर, रस्ते, उद्याने यासाठी जागा कमी होते. कचऱ्याचा योग्यप्रकारे निपटारा होत नाही, ज्यामुळे पर्यावरण, पाणी आणि वीज, रस्ते, सार्वजनिक वाहतूक या सुविधांची कमतरता. लोकसंख्येच्या प्रमाणे आरोग्य व शिक्षण सुविधा अपुरी पडतात.

शहरातील या आव्हानांवर योग्य धोरणे, तंत्रज्ञानाचा वापर आणि जनसहभागाने मात केली जाऊ शकते. शाश्वत विकासासाठी नवे धोरण, प्रदूषण नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, कचऱ्याचा योग्य निपटारा व पायाभूत सुविधा वाढवणे महत्त्वाचे आहे. तसेच, नागरिकांची जागरूकता व सहभाग आवश्यक आहे. शहरातील आव्हाने टाळण्यासाठी सर्व स्तरांवर सहकार्य आणि जबाबदारीची भावना आवश्यक आहे. शहरांचा विकास म्हणजेच लोकांचे जीवनमान उंचावणे, पर्यावरण रक्षण आणि भविष्यासाठी टिकाऊ योजना आखणे. यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करणे गरजेचे आहे, जेणेकरून शहरे सुरक्षित व सशक्त बनू शकतील.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### लाकडी वाश्याला घेतला युवकाने गळफास



**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

राहत्या घरी लाकडी वाशाला गळफास घेत एका योगाने आत्महत्या केली. तो बेशुद्ध अवस्थेत आढळला होता, त्याला शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याबाबतची अधिकची माहिती अशी की, शुभम ज्ञानेश्वर वाघमारे (वय २०, रा, शिरपणहळी, ता. दक्षिण सोलापूर) हा दि. १० फेब्रुवारी रोजी राहत्या घरी साडीच्या साह्याने लाकडी वाशाला गळफास घेतलेल्या बेशुद्ध अवस्थेत मिळून आला. त्याला त्यांच्या नातेवाईकांनी दयानंद लक्ष्मण शिंदे यांच्या मदतीने खाली उतरवून उपचारासाठी वसंत पोलीस ठाण्याचे आर.डी.मालचे यांनी शासकीय रुणालय सोलापूर येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे

### ड्रोवीच्या चित्रकला स्पर्धा सोलापूरसह प्रमुख शहरांमध्ये होणार

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

ड्रोवी पुन्हा सज्ज आहे चिमुकल्यांच्या पसंतीस पडलेल्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेचे दुसरे पर्व म्हणजेच सीझन २ घेऊन येण्यासाठी. यानिमित्ताने त्यांना आपल्या मुक्त छंद विचारातून आणि कलेच्या माध्यमातून आपली कलाकृती साकारण्याची आणि व्यक्त होण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेचे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये जसे की मुंबई, पुणे, संभाजी नगर, कोल्हापूर, सोलापूर,अकोला, अमरावती, नागपूर, नाशिक आणि सातारा इथे आयोजन केले जाणार आहे. या आयोजनात नामांकित बालरोगतज्ज्ञ सहकार्य करत असून ते पुरस्कार वितरणासाठी परीक्षक आणि प्रमुख अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा दोन वयोगटांसाठी खुली आहे. १ ते ७ वर्षे आणि ७ ते १३ वर्षे या स्पर्धेचे विषय प्रत्येक वयोगटानुसार विचारपूर्वक ठरवलेले आहेत ते खालीलप्रमाणे स्पर्धेची अंतिम तारीख २० फेब्रुवारी असून, निकाल २८ फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात येतील. व्हाट्सॲपवर ९९३००३१५८२ या क्रमांकावर 'हाय' असा मेसेज पाठवा.

### पैशाच्या वादातून दगडाने मारहाण

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

राहत्या घराजवळ असताना पैशाच्या वादातून दोघांनी मिळून दगडाने मारहाण केल्याची धक्कादायक घटना सोलापूर जिल्ह्यात घडली आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, सोहन संतोष उबाळे वय २३ रा. मोहोळ जि. सोलापूर हा दि. १० फेब्रुवारी रोजी राहत्या घराजवळ असताना पैशाच्या वादातून अनोळखी दोन इसमांनी दगडाने मारहाण केल्याने त्यांना डोक्यास जखम झाली, त्यांना उपचारासाठी सरकारी दवाखाना मोहोळ येथे दाखल करण्यात आले होते. तेथून रेफरने शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल करण्यात आले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### उजनी कालव्यात तरंगत असताना आढळून आला व्यक्ती

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

उजनी कालवा, डावा कॅनल मधील पाण्यात तरंगत असताना पालथे स्थितीत एक व्यक्ती मिळून आल्याने त्यांना बाहेर काढून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याबाबतची अधिक माहिती अशी की, अनोळखी पुरुष वय ३५ ते ४० वर्ष हा दि. १० फेब्रुवारी रोजी मौजे आष्टी, ता. मोहोळ येथील उजनी कालवा, डावा कॅनल क्रमांक ९५ मधील पाण्यात तरंगत असताना पालथे स्थितीत मिळून आल्याने त्यांना बाहेर काढून ए.एस.आय. एस.के. गायकवाड सोलापूर ग्रामीण यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# संगमेश्वर महाविद्यालयास विजेतेपद

## जिल्हास्तरीय अर्थशास्त्र व बँकिंग प्रश्नमंजुषा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

श्रीमान भाऊसाहेब गांधी जन्मशताब्दी वर्षानिमित्त हिराचंद नेमचंद महाविद्यालयात जिल्हास्तरीय अर्थशास्त्र व बँकिंग प्रश्नमंजुषा स्पर्धेत संगमेश्वर महाविद्यालयाने विजेतेपद पटकाविले. या संघात ऐश्वर्या देओकाटे व अपूर्वा भाले यांचा समावेश आहे.



श्रीमान भाऊसाहेब गांधी जन्मशताब्दी वर्षाच्या औचित्याने हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, येथे अर्थशास्त्र व बँकिंग या विषयांवर आधारित या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधून एकूण ३५ संघांनी सहभाग नोंदविला.

या स्पर्धेचे उद्घाटन गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक शैलेश खेडकर यांनी केले. पारितोषिके वसुंधरा कला महाविद्यालयाचे डॉ. आर. के. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. प्रीतम कोठारी आदी उपस्थित होते. स्पर्धेचे समन्वयक डॉ. शिवकुमार बिरादार, डॉ. नवराज काळदाते, अश्विनी कांबळे तसेच विद्यार्थी समन्वयक साक्षी दंतकाळे यांनी नियोजन व अंमलबजावणीत मोलाचे योगदान दिले. कोमल चव्हाण व श्रुती चडचण यांनी सूत्रसंचालन केले.

**स्पर्धेतील अन्य विजेते : द्वितीय :** छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स (सगरी मोहम्मद, सुलोचना राचर्ला). **तृतीय :** वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय (सरस्वती भोरगुंडे, श्रद्धा मामद्याळ).

# श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे दहावी विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ संपन्न झाला. अध्यक्षस्थानी प्रशालेचे प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे होते. प्रमुख अतिथी माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, बसवराज कोरे, अण्णाराया तुप्पद, क्रीडा शिक्षक गंगाराम घोडके यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी धनश्री यणगुरे, समृध्दी चक्रे, वैष्णवी चवरे, लक्ष्मी सांळूखे, दुर्गा सूर्यवंशी, पुनम मुडगी, साधना वाघमारे, मधुरा शिंदे, वीर कुलकर्णी, दिपक कोळी, सचिन जांभळे या विद्यार्थ्यांनी प्रशालेबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली. तसेच शिक्षकांमधून अमरनाथ कदारे, रमेश आगवणे, भारत राऊत यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास बाबुराव कलशेट्टी, दत्तात्रय आगरखेड, परमेश्वर चांदोडे, गणेश कोरे, विद्याधर हुलगेरी, संतोष हिरेमठ, संतोष स्वामी, सुकेशनी गंगोडा, प्रतीक्षा बिडवे, प्रिया पसारे, सुनीता गंगोडा आदी उपस्थित होते. प्रास्ताविक अनिलकुमार गावडे यांनी केले. सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले. अनिता हौदे यांनी आभार मानले.

**CHANGE IN NAME**

"I am changing my name from **'Husen Noormhamad Patel'** to **'Husen Noorahmad Patel'** for passport issuance."

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी**
ता. बार्शी, जि. सोलापूर
E-mail :- am_barshi@msamb.com फोन. - ०२१८४-२२२९७६

जा.क्र. दि. ११/०२/२०२६

**जाहिर निविदा प्रसिध्दीकरण**
**निविदा सूचना क्र.०१ सन २०२५-२०२६**

कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी खालील कामाच्या निविदासाठी महाराष्ट्र शासनाचे मान्यताप्राप्त विभाग यांचेकडील नोंदणीकृत वर्गातील अनुभवी ठेकेदार यांचेकडून नमुन्यात द्विलिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | मंजूर रक्कम | कोरी निविदा फार्म फी GST सह | बयाणा रक्कम | सुरक्षित ठेव | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी मुख्य कार्यालयामध्ये सभापती दालनाची रंगरंगोटी व डागडुजी करणे व संचालक मंडळ यांचेकरीता नवीन दालन तयार करणे. | ६,८६,७३२/- | ५९०/- | ६,८६८/- | २७,४७०/- | ६ महिने |

१) सर्व पात्र/इच्छुक निविदा धारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी कोरे निविदा संच दि. १२/०२/२०२६ ते १८/०२/२०२६ मध्ये कार्यालयीन वेळेत खरेदी करावा.
२) निविदा पत्रकातील सर्व अटी व शर्ती निविदा धारकास बंधनकारक राहतील.

सही/-
सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी

### बायकोच्या माहेरी राहण्यास गेलेल्या नवऱ्याचा मृत्यू

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

बायकोच्या माहेरच्या घरी राहण्यास गेला असता, बायकोने दरवाजा उघडला असता नवरा मल्लिकार्जुन हा बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्यांच्या शेजारी ओढणी पडलेली होती अशी माहिती बायकोने दिली असल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, मल्लिकार्जुन कल्लप्पा शिंदे वय ४४ रा. कर्दहळ्ळी, ता.दक्षिण सोलापूर हा वडजी तालुका दक्षिण सोलापूर येथील बायकोच्या माहेरी राहण्यास गेला असता दि. १० फेब्रुवारी रोजी बायकोच्या माहेरी, बायकोने घराचा दरवाजा उघडला असता तो जमिनीवर बेशुद्ध पडलेल्या स्थितीत दिसून आला व बाजूला ओढणी पडलेली होती असे बायकोने सांगितले. त्यांना बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे नागेश शिंदे यांनी दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

### लोखंडी रॉडने व लाथाबुक्क्याने एकास मारहाण

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

मागील भांडणाचा राग मनात धरून दोघांनी मिळून लोखंडी रॉडणे व लाथा बुक्क्याने मारहाण केल्याने त्यांना डोक्यास जखम व मुकामार लागला आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, मल्लाप्पा दौलप्पा नडगिरी (वय ५५ रा. बोरगाव ता. अक्कलकोट जि. सोलापूर) यांना १० फेब्रुवारी रोजी बोसगाव गावात असताना मागील भांडणाचा राग मनात धरून लक्ष्मण सोनकांबळे व इतर एक जणांनी मिळून लोखंडी रॉडणे व लाथा बुक्क्याने मारहाण केल्याने त्यांना डोक्यास जखम व सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना अक्कलकोट येथे दाखल करण्यात आले होते. तेथून रेफरने उपचारासाठी श्याम गायकवाड यांनी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल केले.

**चौकशीची जाहीर नोटिस**

**किरकोळ अर्ज क्रमांक** : ३५/२०२६ (कलम २२(२)
**मुळ बदल अर्ज चौ.क्र.**: १८३८/२०२५ कलम २२
**सार्वजनिक न्यासाचे नाव** : लोकमंगल फाऊंडेशन, १३ अ, सह्याद्री नगर, विकास नगर जवळ, सोलापूर
नोंदणी क्र. एफ-१६७९५ (सोलापूर) बाबत.

**१. श्री. जयवंत मधूकर थोरात,**
रा. १७५/१२, काका गणपती मंदिर, भवानी पेठ, सोलापूर - **अर्जदार**

सर्व संबंधित लोकांस/विश्वस्तांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, सोलापूर विभाग, सोलापूर हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ (२) प्रमाणे किरकोळ अर्ज क्र. ३५/२०२६ (कलम २२(२) मुळ बदल अर्ज चौ.क्र. १८३८/२०२५ कलम.२२ सदर प्रकरणात तात्पुरती बदल अर्ज स्विकृती (Privisional Acceptence) आदेश दि. ०४/०२/२०२६ रोजी झालेला आहे.

तरी सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत/हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयात समक्ष किंवा विधीज्ञामार्फत येऊन कैफियत हरकत दाखल करावी. त्यानंतर आलेल्या कैफियतेचा/हरकतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत/हरकत न आल्यास कोणासही काही सांगावयाचे नाही असे समजून सदर चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जामध्ये चौकशीअंती तात्पुरती बदल अर्ज स्विकृती (Privisional Acceptence) झालेला निकाल कायम समजण्यात येईल. तसेच त्या पुढील योग्य ते आदेश केले जातील. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१ सोलापूर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०५/०२/२०२६ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सोलापूर विभाग, सोलापूर

Classifieds

**नोकरीविषयक**

**नोकरीची संधी!**
**सिक्युरिटी गार्ड, हॉस्पिटल सिक्युरिटी इंचार्ज, मामा-मावशी, बाईक वॉशिंगसाठी मुले तसेच प्रसिद्ध हॉटेलमध्ये वेटर व हाऊस किपिंगसाठी मुले पाहिजेत.**
**संपर्क: ९१५८१५८९७२, ७६६६५६०१४१, ९८५०६८०५२२**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**IDFC FIRST Bank Limited**

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 121846409 | मालमत्तेवर कर्ज | 1. अशोक निवृत्ती पाखरे 2. शैला अशोक पाखरे | 27/01/2026 | INR 5,23,154.07/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायतीचा सर्व तुकडा आणि पार्सल मिळकत क्रमांक ५७०, एकूण परिसर क्षेत्रफळ ४१२५ चौ.फूट, मौजे येथे स्थित: मानेगाव, ग्रामपंचायतीच्या हद्दीत मानेगाव, तालुका - बार्शी, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र-४१३४०२, आणि पूर्वेकडे - विठ्ठल पाखरे, पश्चिमेकडे - गट क्रमांक ४१७ चा उर्वरित क्षेत्र उत्तर - गट क्रमांक ४१७ च्या बाहेर निवृत्ती पाखरेचा जमीन क्षेत्र दक्षिणेकडे - लाडोले रोड.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 105077178 | मालमत्तेवर कर्ज | 1. सरताज पापा मुलाणी 2. लजिना सरताज मुलाणी | 21/01/2026 | INR 5,43,014.96/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्र. २ चे सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन ११६० चौ. फूट., दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले क्षेत्रफळ तळमजला = ११६०.०० चौ. फूट., एकूण बिल्टअप एरिया = ११६०.०० चौ.मी., मौजे येथे स्थित: पुलूज, ग्रामपंचायत: पुलूज, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि सीमा: पूर्व - दिलदार दादासो मुलाणी, पश्चिम - लिंगेश्वर तालीम, उत्तर - तानाजी महादेव पांढरे दक्षिण - ग्रामपंचायत रोड.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 142608453 | मालमत्तेवर कर्ज | 1. युसूफ मुस्तफा मोगल 2. बिस्मिल्ला युसूफ मोगल | 06/12/2025 | INR 6,31,368.24/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ७६० असलेल्या निवासी घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ १०८९ चौ.फूट, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला आहे = ४५४.०० चौ.फूट, एकूण बांधलेले क्षेत्रफळ ४५४.०० चौ.फूट, खांडवी गावात स्थित, ग्रामपंचायत खांडवीच्या हद्दीत, तालुका: बार्शी, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३४०१, आणि पूर्वेला अशी सीमा: बाबासो जाधव पश्चिम - रस्ता, उत्तर - रामा नामवडे, दक्षिण - रस्ता.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 95358597 | मालमत्तेवर कर्ज | 1. विशाल बिभिषण पिसाळ 2. जयश्री बिभिषण पिसाळ | 29/11/2025 | INR 4,37,692.34/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिळकत क्र. १८७ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण मोजमाप क्षेत्र ६८८ चौ. फूट, ग्रामपंचायत पिपळगाव (पण) च्या हद्दीत स्थित, उप-विभाग: बार्शी, दि: सोलापूर, महाराष्ट्र-४१३४०१, आणि सीमा:- पूर्व - सुमन पोपट ढिंगे, पश्चिम - अरुण कांबळे, दक्षिण - राजेंद्र सुरवसे उत्तर - ग्रामपंचायत रोड.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)

**दिनांक : 12/02/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

### आजच्या भारत बंदला जिल्हा काँग्रेसचा पाठिंबा

**सोलापूर :** प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार १२ फेब्रुवारी २६ रोजीच्या भारत बंदला जिल्हा काँग्रेस पक्षाने पाठिंबा दिला असल्याचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी कळविले आहे. केंद्र शासनाने कामगार कायद्यामध्ये केलेल्या विविध बदलामुळे कामगारांच्या समोर विविध प्रश्न व समस्या निर्माण झालेले आहेत.

**IN THE COURT OF THE PRIL, CIVIL JUDGE INDI, AT; INDI.**

O.S. NO : 481/2023.
**Shri, Adu K Lamani, & others. - Plaintiffs**
V/s
**1. Shri, Devadas T Lamani, & others. - Defendants**

**NOTICE**

To,
Lrs of Defendant No. 2C.
Smt, Parubai W/o Babu Chavan,
Age :- 36 Yrs, Occ;- H.H. Work,
R/o, Dudhani L.T., Tq : Akkalakot, Dist :- Solapur

You take notice that, the plaintiffs have filed a suit for Declaration and permanent injunction in principal civil judge court Indi, in O.S. No. 481/2023, against you.

All of you personally are through an advocate fully instructed, acquainted to answer, the all quarries arised out of above said appeal appear on; 23/03/2026, in the above said court at 10:30 Am, to answer the all the quarries out of above said case.

If incase you all failed to so appear your presence will record absence and placed ex-parte and decide the above said appeal on available documents and materials placed before the court.

Given under my hand and seal of the Court this day 11/02/2026

**Place;- Indi**
**Date;-07-02-2026**

**sd/-**
**Advocate for plaintiffs.**
**(Shri, K. H. Naik & V. G. Naik)**

Court Stamp

**By order of the court**
**sd/-**
**Sherstedar (Aum.)**
**Civil Judge & JMDC Court, Indi**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५/२०२६
नि.६

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**श्री. विद्यासागर लक्ष्मण मलगणकर** — **अर्जदार**
वय - ६८ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त,
रा. मु.पो. नागणसूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

विरुध्द

**१. अनिल लक्ष्मण मलगणकर**
वय - ६५ वर्षे, धंदा - मजुरी,
रा. घर नं.२४० राजवली, वसई नायगांव लिंक रोड, मंदिरजवळ, राज ॲमरल्ड बिल्डिंग समोर, वसई ईस्ट पालघर-४०१२०८
**२. देवगणाबाई सिद्राम मलगणकर**
वय - ६० वर्षे, धंदा - घरकाम,
**३. सुनिल सिद्राम मलगणकर**
वय - ४० वर्षे, धंदा - मजुरी,
**४. नागेश सिद्राम मलगणकर**
वय - ३८ वर्षे, धंदा - मजुरी,
**५. संतोष सिद्राम मलगणकर**
वय - ३५ वर्षे, धंदा - मजुरी,
वरील अ ते ड सर्व रा. नागणसूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**६. शांताबाई विश्वनाथ गायकवाड**
वय - ६४ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. घर नं.२४० राजवली, वसई नायगांव लिंक रोड, मंदिरजवळ, राज ॲमरल्ड बिल्डिंग समोर, वसई ईस्ट पालघर-४०१२०८
**७. रुपाबाई चंद्रशा शिवशरण**
वय - ६३ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. निरा रोड, घर नं.२०३ दुसरा मजला, रेशमी हेतल, अपार्टमेंट सिनेमॅक्स जवळ, मिरा रोड, ठाणे-४०११०७

— **सामनेवाले**

ज्याअर्थी वरील अर्जदारांने अक्कलकोट येथील दिवाणी न्यायालयात मयत लक्ष्मण दैनप्पा मलगणकर यांचे मृत्यू दि. ०२/०७/१९८४ व शिवम्मा उर्फ शिवबाई लक्ष्मण मलगणकर हे दि. १५/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मयताचे नावे डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर, तालुका अक्कलकोट, जिल्हा सोलापूर पैकी मौजे नागणसूर येथील भुमापन क्र. ७९५ यांसी क्षेत्र ३५.६० चौ.मी. व मौजे नागणसूर येथील ग्रामपंचायत मालमत्ता क्र. १०४३ यांसी क्षेत्र ३८० चौ. फुट या मिळकती ह्या मयताच्या पश्चात अर्जदार यांच्या नावे होण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार व सामनेवाला यांना मयताचे वारसाचा दाखला (लिगल हेअर सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर नेमलेली तारीख १६/०३/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावेत. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आज दि. ०५/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. ही जाहीर प्रसिध्दीकरण केले दिनांक : ११/०२/२०२५

सही/-
कनिष्ठ लिपीक

कोर्टाचा शिक्का

हुकुमावरुन
सही/-
सह. आधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
अक्कलकोट

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर येथील, तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील पेठ पश्चिम मंगळवार पेठ येथील मिळकत यांसी सिटी सर्व्हे नं. ३०५७ असा असून म्यु.पल घर नं. ९२७ असा असून, सदर मिळकतीचे एकूण क्षेत्र ११७.१ चौ.मी. इतके आहे. त्यात ३ मजली जुने बांधकाम असून त्यात निरनिराळे भाडेकरी आहेत. सदर मिळकतीपैकी तळमजल्यावरील दुकान नंवर २ त्याचे बिल्टअप क्षेत्र ११.२५ चौ.मी. इतके असून त्याची कारपेट एरिया ९.२९ चौ.मी. इतके आहे सदर दुकान जागेची चतु:सिमा :- पुर्वेस - दुकान नं. ३, दक्षिणेस - अंतर्गत रस्ता, पश्चिमेस - सरकारी रस्ता, उत्तरेस - दुकान नं. १. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत वर नमुद मिळकत ही आशिष हिरालाल कोठारी, रा. महेश सोसायटी, सोलापूर यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. त्यांनी सदरची मिळकत ही आमचे अशिल शिखरचंद किसनलाल करनावट यांना विक्री करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी व बिनबोजाची असल्याची हमी त्यांनी आमचे अशिलांना दिली आहे.

वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा टाच, जप्ती, दान, गहाण, बोजा, बक्षीसपत्र, लिज, लिन, पोटगीहक्क, वालीवारस हक्क, मृत्युपत्र, कोर्ट केसेस, कुलमुखत्यारपत्र, खरेदीखत, साठेखत, गहाणखत इतर सावकारी देणेघेणे पतसंस्था बोजा, कोर्ट दावे इत्यादी काही असल्यास त्यांनी ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी कागदपत्रासह कळवावे. मुदतीत कोणाची ही हरकत न आल्यास आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत आमच्या अशिलावर व वरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही खरेदीपूर्व जाहिर नोटीस दिली ता. ११/०२/२०२६.

सही/-
**ॲड. अलका संतोष मोरे**
**बी.ए., एल.एल.बी., एलएल.एम.**
**(ॲडव्होकेट व नोटरी)**
**ऑफीस गाळा नं. ५,**
**दाक्षायणी टायपिंग सेंटर बाजुला,**
**जिल्हा व सत्र न्यायायल आवार,**
**सोलापूर मो.नं.९९२२७४९८९८**
**अशिल :- शिखरचंद किसनलाल करनावट**



# टी-२० विश्वचषकाचा थरार



## महत्त्वाचे

### मिचेल मार्श दुखापतग्रस्त; स्टीव्ह स्मिथला पाचारण



मिचेल मार्श

**कोलंबो** : ऑस्ट्रेलियाला आणखी एक दुखापतीचा धक्का बसला आहे. कर्णधार मिचेल मार्श बुधवारी आयर्लण्डविरुद्धच्या पहिल्या सामन्यात खेळू शकला नाही. या आठवड्याच्या सुरुवातीला सराव करताना त्याच्या मांडीला थेट दुखापत झाली होती. गत महिन्यात पाकिस्तानमध्ये झालेल्या पहिल्या टी-२० सामन्याप्रमाणे मार्शच्या अनुपस्थितीत ट्रॅव्हिस हेड आयर्लण्डविरुद्ध संघाचे नेतृत्व करत आहे. त्याच्या सहकारी सलामीवीराला विश्रांती आणि पुनर्वसनाची आवश्यकता आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये शेवटचा टी-२० सामना खेळलेला, परंतु ऑस्ट्रेलियाच्या कसोटी संघाचा मुख्य आधार राहिलेला राखीव खेळाडू स्टीव्ह स्मिथला श्रीलंकेच्या प्रवासासाठी बोलावण्यात आले आहे.

### वॉशिंग्टन सुंदर दिल्लीत खेळण्याची शक्यता कमी

**नवी दिल्ली** : अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर पुन्हा तंदुरुस्त झाला असला तरी तो नवी दिल्लीत होणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये नामिबियाविरुद्धच्या सामन्यात खेळण्याची शक्यता कमी आहे, असे मत भारताचे माजी फलंदाजी प्रशिक्षक संजय बांगर यांनी व्यक्त केले आहे. भारताने अमेरिकेवर २९ धावांनी विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली, परंतु विजय मिळवूनही फलंदाजी विभागाला काही चिंताग्रस्त क्षणांचा सामना करावा लागला. सुंदर पुन्हा संघात परतल्यामुळे अंतिम संघाच्या संभाव्य रचनेकडे लक्ष लागले आहे. दुखापतीतून सावरत असलेल्या ऑफ-स्पिन गोलंदाजी अष्टपैलू खेळाडूने सराव सत्रादरम्यान क्षेत्ररक्षण सरावात भाग घेतला आणि नंतर कुलदीप यादवसह तिलक वर्माला गोलंदाजी केली. संघ व्यवस्थापनाने त्याच्या सामन्याच्या तयारीचे मूल्यांकन केले तेव्हा तो मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांच्याशीही दीर्घ चर्चा करत असल्याचे दिसून आले. वॉशिंग्टन सुंदर संघात सहभागी होणार आहे ही चांगली बातमी आहे, कारण भारतीय व्यवस्थापन त्याच्याशी संयम बाळगत आहे आणि त्याच्या क्षमतेवर त्यांना खूप विश्वास आहे.

# सुपर ओव्हरमध्ये दक्षिण आफ्रिका विजयी

### चिवट झुंजीनंतर अफगाणिस्तानचा पराभव

**अहमदाबाद, ११ फेब्रुवारी**

नरेंद्र मोदी स्टेडियमवर बुधवारी दोन सुपर ओव्हरपर्यंत रंगलेल्या अटीतटीच्या टी-२० विश्वचषक सामन्यात दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानवर विजय नोंदविला. २६ धावंत ३ बळी टिपणारा दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज लुंगी नगिदी सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांच्यादरम्यान अतिशय चुरशीचा सामना खेळला गेला. उभय संघादरम्यानचा निर्धारित २० षटकांतील सामना बरोबरीत राहिला, त्यानंतर सामना निकाली लावण्यासाठी सुपर ओव्हर नियमाचा अवलंब करण्यात आला. मात्र सुपर ओव्हरमधील सामनाही बरोबरीत राहिला, परिणामी पुन्हा सुपर ओव्हर खेळविण्यात आला व या दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये दक्षिण आफ्रिकेने बाजी मारली.



फटकेबाजी करताना रेयान रिक्लेटन

निर्धारित २० षटकांच्या खेळात दक्षिण आफ्रिकेने ६ बाद १८७ धावा केल्या. प्रत्युत्तर देताना आफगणिस्तानला १९.४ षटकांत समसमान १८७ धावाच काढता आला. व सामना बरोबरीत राहिला.

#### निर्धारित षटकांत सामना बरोबरीत

निर्धारित २० षटकांच्या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. क्विंटन डी कॉक ( ५९) व रेयान रिक्लेटनच्या (६१) अर्धशतकी खेळीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने निर्धारित २० षटकांत ६ बाद १८७ धावा काढल्या. प्रत्युत्तर देताना अफगाणिस्तानचा संघही १९.४ षटकांत १८७ धावांवरच बाद झाला व सामना बरोबरीत राहिला.

अफगाणिस्तानकडून सलामीवीर रहमनुल्लाह गुरबाजने ४२ चेंडूंत ४ चौकार व ७ षट्कारांच्या मदतीने ८४ धावांची आकर्षक खेळी केली. अझमतुल्लाह ओमरझाई (२२), कर्णधार रशीद खान (२०), दर्विश रसूली १५) व नूर अहमद ( १५) दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांचा धैर्याने सामना करत जिंकण्याचा प्रयत्न केला, परंतु शर्थीच्या प्रयत्नानंतरही त्यांना विजयासाठी एक धाव अपुरी पडली व सामना बरोबरीत राहिला.

सामना निकाली लावण्यासाठी सुपर ओव्हर नियमाचा अवलंब करण्यात आला, मात्र पहिल्या सुपर ओव्हमध्ये अफगाणिस्तानने केलेल्या १७ धावांच्या प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेनेही १७ धावा काढून बरोबरीत साधली. त्यानंतर दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये ट्रिस्टन स्टब्स (नाबाद ७) व डेव्हिड मिलरच्या (नाबाद १६) खेळीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने बिनबाद २३ धावा केल्या, मात्र प्रत्युत्तरात अफगाणिस्तानला २ बाद १९ धावांच करता आल्या. अफगाणिस्तानचे मोहम्मद नबी शून्यावरच बाद झाला, रहमनुल्लाह गुरबाझने १८ तेवढी एकाकी झुंज दिली व अझमतुल्लाह ओमरझाई शून्यावर नाबाद राहिला. (वृत्तसंस्था)

# अभिषेक नामिबियाविरुद्ध खेळण्याची शक्यता कमी

### पोटाच्या संसर्गामुळे रुग्णालयात दाखल

**नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

पोटाच्या संसर्गामुळे नवी दिल्लीतील एका खाजगी रुग्णालयात दाखल झाल्यानंतर भारताचा डावखुरा सलामीवीर अभिषेक शर्मा २०२६ च्या पुरुष टी-२० विश्वचषकात नामिबियाविरुद्ध गुरुवारी होणाऱ्या सामन्यात त्याची खेळण्याची शक्यता कमी आहे.

२५ वर्षीय अभिषेक शर्मा मंगळवारी सायंकाळी अरुण जेटली स्टेडियमवरील सराव सत्राला उपस्थित राहू शकला नाही व तो वैद्यकीय निरीक्षणाखाली आहे. सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोइशेटे यांनी पत्रकार परिषदेत त्याला पोटात दुखत असल्याची पुष्टी केली.

पोटात संसर्ग झाल्यामुळे अभिषेक शर्माला सोमवारपासून नवी दिल्लीतील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांच्या अहवालानुसार गुरुवारी होणाऱ्या नामिबियाविरुद्धच्या सामन्यासाठी भारतीय संघ व्यवस्थापन त्याची उपलब्धता निश्चित करेल.

काही पुढील चाचण्याही झाल्या आहेत, त्यामुळे नामिबियाविरुद्धच्या सामन्यासाठी त्याच्या पूर्ण पुनर्प्राप्तीचा कालावधी व त्यानंतरच्या उपलब्धतेबद्दल ते काय सांगतील याची वाट पाहत आहेत, असे या घडामोडींचा मागोवा घेणाऱ्या एका सूत्राने सांगितले.

अभिषेक मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर अमेरिकेविरुद्धच्या पहिल्या गट अ सामन्यात तीव्र तापाने खेळला होता व त्याला शून्यावर बाद व्हावे लागले होते. नंतर, पोटात दुखत असल्यामुळे तो दुसऱ्या डावात क्षेत्ररक्षण करू शकला नाही. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारताने २९ धावांनी विजय मिळवला.

भारतीय संघ व्यवस्थापन त्याला परत पाठवण्यास नाखूष असेल, कारण गतविजेत्या संघाचा १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये पाकिस्तानविरुद्धचा सामना आहे आणि त्यानंतर १८ फेब्रुवारी रोजी अहमदाबादमध्ये नेदरलॅण्डविरुद्धचा सामना सुपर एट स्टेज सुरू होण्यापूर्वी होणार आहे.

अभिषेकची अनुपस्थिती संजू सॅमसनला फॉर्ममध्ये असलेल्या ईशान किशनसोबत खेळण्याची संधी देऊ शकते. फलंदाजीच्या क्रमात अव्वल स्थान. नुकत्याच झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या ४-१ ने घरच्या मैदानावर झालेल्या मालिकेत यष्टिरक्षक-फलंदाज सॅमसनला सलामीवीर म्हणून संघर्ष करावा लागला.

मंगळवारीच्या सराव सत्रात, सॅमसनने किशनसोबत बराच वेळ फलंदाजी केली. गुरुवारी नामिबियाविरुद्धच्या सामन्यासाठी मैदानात उतरण्यापूर्वी भारत बुधवारी सायंकाळी अरुण जेटली स्टेडियमवर आणखी एक सराव सत्र आयोजित करेल. (वृत्तसंस्था)





#### आजचे सामने

**श्रीलंका वि. ओमान**
**स्थल** : पल्लेकेले स्टेडियम, कॅण्डी
**वेळ** : सकाळी ११,०० वाजतापासून

**इटली वि. नेपाळ**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

**भारत वि. नामिबिया**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# श्रीलंकेला हसरंगाची अनुपस्थिती जाणवेल

**पल्लेकेले, ११ फेब्रुवारी**

गुरुवारी पल्लेकेले येथे होणाऱ्या टी-२० विश्वचषकातील ब गटाच्या सामन्यात ओमानविरुद्ध खेळताना श्रीलंकेला आपल्या फलंदाजीतील विसंगती, विशेषतः मधल्या षटकांमध्ये आणि जखमी वानिंदू हसरंगाच्या अनुपस्थितीत गोलंदाजी संयोजनात सुधारणा करावी लागेल. श्रीलंकेला हसरंगाची अनुपस्थिती जाणवेल असा अंदाज आहे.

आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यात श्रीलंकेचा सर्वात प्रभावशाली फिरकी गोलंदाज हसरंगाला दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर व्हावे लागले. त्यामुळे माजी विजेत्या श्रीलंका संघाला मोठा धक्का बसला.

इंग्लंडने घरच्या मैदानावर ०-३ असा पराभव पत्करल्यानंतर श्रीलंकेने आयसीसीच्या या स्पर्धेत निराशाजनक कामगिरी केली. तथापि, श्रीलंकेने आयर्लंडवर २० धावांनी विजय मिळवून आपल्या मोहिमेची सकारात्मक सुरुवात केली. हा विजय त्यांच्या फलंदाजांना फिरकीविरुद्धच्या संघर्षावर आळा घालू शकला नाही.



कर्णधार दासून शनाका





ओमानचा कर्णधार जतिंदर सिंग

आयर्लंडने फिरकी गोलंदाजी सुरू केल्यानंतर श्रीलंका संघाला सातव्या व १५ व्या षटकात एकही चौकार मारता आला नाही, त्याचा फायदा ओमान घेण्याचा प्रयत्न करेल. कामिंदू मेंडिसने डेथ ओव्हर्समध्ये १९ चेंडूत ४४ धावा करून श्रीलंकेला स्पर्धात्मक धावसंख्या गाठून दिली, तर कुसल मेंडिसने अर्धशतक झळकावून डावाला बळकटी दिली. सलामीवीर पथुम निस्सांका व कामिल मिश्राकडून अधिक अपेक्षा असतील. हसरंगाने आयर्लंडविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी केली, अस्वस्थता असूनही त्याने चार षटके टाकली व तीन महत्त्वाच्या बळी घेतल्या.

**ओमानचे आव्हान**

दुसरीकडे, ओमानला झिम्बाब्वेविरुद्ध धावांची कमतरता होती, त्यामुळे त्यांना आठ गड्यांनी पराभव पत्करावा लागला. टी-२० मालिकेत चौथ्यांदा खेळताना, ओमानला वेगवान गोलंदाजी आणि अतिरिक्त उसळीचा सामना करावा लागला. कोलंबोमध्ये त्यांचे पाचही अव्वल फलंदाज दुहेरी अंकी धावसंख्या गाठण्यात अपयशी ठरले.

२०१६ मध्ये ओमानने पदार्पणात आयर्लण्डला पराभवाचा धक्का दिला होता, त्यांना अशीच आश्चर्यजनक कामगिरी करायची असेल तर कर्णधार जतिंदर सिंग व त्याच्या संघाला उणीवा लवकर दूर कराव्या लागतील. सुफियान मेहमूदने मागील सामन्यात दोन बळी घेतले, तर शाह फैसलनेही चांगली गोलंदाजी केली. (वृत्तसंस्था)

### अभिषेक, चक्रवर्ती अव्वल स्थानावर कायम

**नवी दिल्ली** : भारताचा सलामीवीर अभिषेक शर्माने टी-२० फलंदाजांच्या यादीत आपले स्थान कायम राखले आहे, वरुण चक्रवर्तीने टी-२० गोलंदाजांच्या यादीत पाकिस्तानच्या अबरार अहमदपेक्षा थोडी आघाडी घेतली आहे, तर झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा बुधवारी जाहीर झालेल्या ताज्या आयसीसी क्रमवारीत अव्वल अष्टपैलू खेळाडू झाला आहे.

अभिषेकचे ९०९ गुण आहे व तो इंग्लंडचा फिल सॉल्ट (८२१), पाकिस्तानचा साहिबजादा फरहान (७६९), जोस बटलर (७६६) आणि पथुम निस्सांका (७५४) यांच्यापेक्षा पुढे आहे.

न्यूझीलंडचा टिम सेफर्ट (आठवा), श्रीलंकेचा कुसल मेंडिस (१२ वा), स्कॉटलंडचा जॉर्ज मुन्से (२३ वा), भारताचा ईशान किशन (२५ वा) आणि नेदरलॅण्ड्सचा मायकेल लेविट (२७ वा) हे इतर खेळाडू आहेत.

# ऑस्ट्रेलियाचा आयर्लण्डवर ६७ धावांनी विजय

**कोलंबो, ११ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत बुधवारी येथे खेळल्या गेलेल्या ब गटाच्या साखळी सामन्यात ऑस्ट्रेलियाने आयर्लण्डवर ६७ धावांनी दणदणीत विजय नोंदविला. १२ धावांत ४ बळी टिपणारा नॅथन एलिस सामनावीर ठरला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाने २० षटकांत ६ बाद १८२ धावा नोंदविल्या. प्रतिस्पर्धी आयर्लण्ड विजयासाठी धावांचा पाठलाग करताना १६.५ षटकांत ११५ धावांतच गारद झाला.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार व सलामीवीर ट्रॅव्हिस हेड दुसऱ्याच षटकांत सहा धावा काढून बाद झाला. मात्र त्यांतर जोश इंग्लिस (३७), कॅमेरून ग्रीन ( २१) व मॅट रेनशॉने (३७) छोट्या-छोट्या भागीदारी करत आपल्या संघाला दीडशे धावांच्या जवळपास आणले. ग्लेन मॅक्सवेलकडून खूप आशा होती, परंतु तो ९ घावा काढून बाद झाला. नंतर मार्कस स्टोइनिसने कूपर कोम्मोलीच्या साथीने संघाला सन्मानजनक धावसंख्या उभारून देण्यात मदत केली. स्टोइनिसने २९ चेंडूंत २ चौकार व एका षट्कारसह ४५ धावांचे योगदान दिले. मार्क अडायरने त्याला कॅलिट्झकडून झेलबाद केले. त्यामुळे स्टोइनिसचे अर्धशतक पाच धावांनी हुकले.



सामनावीर नॅथन एलिसचे ४ बळी

आयर्लण्डकडून मार्क अडायरने २ बळी, तर मॅथ्यू हमफ्रेज, जॉर्ज डॉकरेल व जॉर्ज टेक्टरने प्रत्येकी एक बळी टिपला.

आयर्लण्डला ऑस्ट्रेलियाने विजयासाठी ठेवलेले १८३ धावांचे लक्ष्य पेलवले नाही. काहीसा दडपणाखाली खेळणाऱ्या आयर्लण्डने आपले पहिले पाच खेळाडू ६.५ षटकांत ४३ धावांतच गमावले. लॉर्कन टकर (२४) व जॉर्ज डकरेलने (४१) तेवढी एकाकी झुंज देत संघाला विजय मिळवून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला, परंतु त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. ऑस्ट्रेलियाच्या नॅथन एलिस व ॲडम झॅम्पाने प्रत्येकी ४ बळी व मॅथ्यू कुहनेरमनने एक बळी घेत आयर्लण्डचा डाव आयर्लण्डचा १६.५ षटकांत ११५ धावांत संपविला.

**डॉकरेलचा विक्रम**

पुरुषांच्या टी-२० विश्वचषकांत डॉकरेलने आयर्लण्डसाठी सर्वाधिरक १० झेल पकडण्याचा विक्रम केला. त्याने मार्क अडायरच्या ९ झेलांचा विक्रम मोडीत काढला. तसेच डॉकरेलने लॉर्कन टकरसोबत आर्यण्डकरिता सहाव्या गड्यासाठी सर्वाधिक ४६ धावांची भागीदारी केली. त्यांनी टकर व गॅरेथ डेलानीचा ४३ धावांचा विक्रम मोडीत काढला. (वृत्तसंस्था)

# नेपाळला इटलीविरुद्ध विजयाची संधी

**मुंबई, ११ फेब्रुवारी**

कडक लढत देणारा पण पूर्ण ताकदीनिशी न खेळणारा नेपाळ गुरुवारी मुंबईत होणाऱ्या टी-२ विश्वचषकाच्या गट क सामन्यात स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या इटलीचा सामना करताना टी-२० विश्वचषकात विजयी कामगिरी करण्याचा प्रयत्न करेल.

१२ वर्षांपूर्वी स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या नेपाळने २०१४ च्या आवृत्तीत हाँगकाँग व अफगाणिस्तानला हरवून दोन विजय मिळवले होते, परंतु त्यानंतर नेपाळला विजयाची संधी मिळाली नाही.

टी-२० विश्वचषक खेळण्यात १० वर्षांचा फरक असूनही, नेपाळने मैदानावर दोन वेळा विश्वविजेत्या इंग्लंडशी बरोबरी केली. नेपाळकडे कुशल भुर्तेलसारखा अव्वल फळीतील आक्रमक फलंदाज आहे. दीपेंद्र सिंग ऐरी, कर्णधार रोहित पौडेल व आरिफ शेख यांसारख्या खेळाडूंमुळे मधली फळी मजबूत आहे. लोकेश बामने आपल्या दमदार फटकेबाजीमुळे इंग्लंडला धकी भरविली होती. त्याचा खेळ बघून जोफ्रा आर्चर व आदिल रशीद सारखे खेळाडू स्तब्ध झाले होते.



रोहित पौडेल



वेन मॅडसेन

**नेपाळच्या सुधारणांसाठी जागा**

नेपाळला काही चिंताजनक बाबींवर लक्ष केंद्रित करायचे आहे. इंग्लंडविरुद्धच्या आव्हानात्मक धावांचा पाठलाग करताना त्यांना मधल्या षटकांमध्ये निश्चितच पुरेसे चौकार मिळाले नाहीत आणि त्यांच्या धावण्याच्या विकेटमध्येही सुधारणा आवश्यक आहे. नेपाळने इंग्लंडच्या डावाच्या मोठ्या भागासाठी चेंडूने जास्त चुका केल्या नाहीत, परंतु डेथ ओव्हर्समध्ये खूप जास्त धावा दिल्या.

**इटलीचा दृष्टिकोन**

दुसरीकडे, इटलीला स्पर्धेच्या सुरुवातीच्या सामन्यात स्कॉटलंडविरुद्ध ७३ धावांनी पराभव पत्करावा लागला आणि पुन्हा नव्याने सुरुवात करायची असेल. खेळाच्या सुरुवातीला इटलीचा कर्णधार वेन मॅडसेनही खांद्यावरून खाली पडला होता आणि हॅरी मॅनेंटी संघाचे नेतृत्व करेल अशी शक्यता आहे. इटलीने तब्बल सात वेगवेगळ्या गोलंदाजी पर्यायांचा वापर केला परंतु स्पर्धेसाठी आदर्श नसलेल्या संघाला रोखण्यात ते अपयशी ठरले आणि २०८ धावांच्या पाठलागात त्यांचा प्रतिसाद आदर्श नव्हता. बेन मॅनेन्टीचे अर्धशतक आणि हॅरीचे काही मोठे फटके हे इटलीसाठी एकमेव उज्ज्वल ठिकाण होते, जे स्पर्धेतील त्यांच्या उर्वरित सामन्यांमध्ये सर्वांगीण सुधारणा करू इच्छितात. (वृत्तसंस्था)

# ऋतिका देशपांडेची अंतिम फेरीत धडक

**श्रीलंकेत ॲमकॉम कनिष्ठ गट टेनिस**

**कुरुनेगाला, ११ फेब्रुवारी**

नागपूरची युवा टेनिसपटू ऋतिका देशपांडे हिने श्रीलंकेतील कुरुनेगाला येथे आयोजित ॲमकॉम कनिष्ठ गट (१४ वर्षांखालील) टेनिस स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. ऋतिका ही सिन्सिअर टेनिस अकादमीची खेळाडू असून तिच्या कामगिरीमुळे अकादमीसाठी हा अभिमानाचा क्षण ठरत आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर अकादमीचे प्रतिनिधित्व करताना ऋतिकाने पहिल्याच फेरीत श्रीलंकेच्या रेहान्या परेरा हिला पराभूत करत दमदार सुरुवात केली. उत्कृष्ट संयम व कौशल्याचे प्रदर्शन करत तिने प्रभावी विजय मिळवला.





ऋतिका देशपांडे

उपांत्यपूर्व फेरीत ऋतिकाने श्रीलंकेच्या दुसऱ्या मानांकित खेळाडू आर. करुणा हिला ६-२, ७-६ (७-२) अशा सरळ सेटमध्ये पराभूत करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. तिने आपली विजयी घोडदौड कायम ठेवत श्रीलंकेच्या प्रतिस्पर्ध्यावर ६-३, ६-३ असा विजय मिळवून अंतिम फेरीत स्थान निश्चित केले.

सिन्सिअर टेनिस अकादमीकडून अंतिम सामन्यासाठी ऋतिकाला हार्दिक शुभेच्छा देण्यात येत असून, तिच्या उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय कामगिरीमुळे प्रशिक्षक, कुटुंबीय व क्रीडा क्षेत्राला अभिमान वाटत आहे.

सिन्सिअर टेनिस अकादमीतर्फे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये, डॉ. मुकेश वाघमारे, बालमंदिर संस्थेच्या संचालिका डॉ. रंजना परधी तसेच पर्यवेक्षिका श्रीमती भावना खरे यांचे सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

ऋतिकाने आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक सचिन पाटील, वैभव, चेतन व आयुष यांना दिले. (वृत्तसंस्था)

# आजीच्या संस्कारांतून विश्वचषकाच्या रंगमंचावर

### नामिबियाचा उदयोन्मुख वेगवान गोलंदाज मॅक्स हेंगो

**यश काशिकर**

**नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी**

ओशाकाटी येथे जन्मलेला आणि नामिबियाच्या ओहांगवेना प्रदेशातील ओशाली गावात आजीच्या कष्टाळू संस्कारांत वाढलेला हा तरुण आज टी-२० विश्वचषकाच्या भव्य रंगमंचावर उभा आहे. घरची आर्थिक परिस्थिती बेताची, साधनांची कमतरता आणि संघर्षमय बालपण... पण डोळ्यांत मोठी स्वप्नं. नामिबियाचा वेगवान गोलंदाज बेन शिकोंगो याच्याकडून प्रेरणा घेणारा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कॅगिसो रबाडा याला आदर्श मानणारा हेंगो आज स्वतः अनेक तरुणांचा आदर्श खेळाडू होत आहे.

रबाडाच्या गोलंदाजीच्या शैलीशी साधर्म्य असलेली त्याची शैली आणि जिद्द... यांच्या बळावर त्याने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

लहानपणी क्रिकेट केवळ एक अनोळखी खेळ होता, अशी माहिती नामिबियाचा उदयोन्मुख वेगवान गोलंदाज मॅक्स हेंगो याने दिली.

तिसरीत असताना नारा प्राथमिक शाळेत एके दिवशी प्रशिक्षक क्विंटन हाउसॅब वर्गात आले आणि इच्छुक खेळाडू शोधू लागले. उत्सुकतेपोटी हेंगो मित्रासोबत पुढे गेला. सुरुवातीला बॅट, बॉल, पिच- सगळंच नवीन. पण प्रशिक्षकाच्या संयमाने आणि प्रोत्साहनाने खेळाची गोडी लागली आणि इथूनच सुरू झाला एका स्वप्नाचा प्रवास.लवकरच क्रिकेट नामिबियाच्या डेव्हलपमेंट कार्यक्रमात निवड झाली आणि मागे वळून पाहिलं नाही. जुलै २०२५ मध्ये नामिबिया 'अ' संघाकडून पर्ल ऑफ आफ्रिका टी-२० मालिकेत चार सामन्यांत आठ बळी घेत संघाचा आघाडीचा गोलंदाज ठरलो. त्यानंतर अवघ्या १७ वर्षे २१७ दिवसांचा असताना त्याने टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पण करत नामिबियाचा सर्वात तरुण खेळाडू होण्याचा मान मिळवला. पदार्पणातच ३ षटकांत ३२ धावांत २ बळी अशी प्रभावी कामगिरी□मोठ्या रंगमंचावर स्वतःची छाप उमटवण्याची सुरुवात!





इतक्या लहान वयात विश्वचषकात खेळणे हा अनुभव खूपच खास आहे, असे हेंगो म्हणाला. ५० हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत खेळणं, दडपणाखाली स्वतःची क्षमता सिद्ध करणं..हेच शिकण्यासाठी मी इथे आलो आहे, असेतो म्हणाला.

भारतासारख्या बलाढ्य संघाविरुद्ध खेळताना दबाव आणि थोडी भीती नक्कीच असणार. ती पूर्णपणे काढून टाकता येत नाही. पण माझे सहकारी मला प्रेरणा देत आहेत. मी केवळ माझ्या कौशल्यावर लक्ष केंद्रित करणार आहे, असे तो म्हणाला.

#### भारताला १८० धावांपर्यंत रोखू

भारत आमच्याविरुद्ध २५०-३०० धावा करेल, असे मला वाटत नाही. जास्तीत जास्त १८० पर्यंत जाईल. आम्ही त्यांना रोखू, असा विश्वास त्याने व्यक्त केला. नेदरलॅण्डविरुद्धच्या पहिल्या सामन्यात नामिबियाला पराभव पत्करावा लागला.

एक झेल सुटला आणि सामना हातातून गेला. निराशा आहे, पण आम्ही १०० टक्के प्रयत्न केले, याचा अभिमानही आहे. आता पुढचे सामने जिंकण्याकडे लक्ष आहे, असे तो म्हणाला. नामिबियाने सल्लागार म्हणून भारताच्या २०११ विश्वचषक विजेते प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांची नियुक्ती केली आहे. कर्स्टन आम्हाला शिकवतात. त्यांच्यासोबत काम करताना खूप आनंद होतो, असे तो म्हणाला. गरीब घरातून, आजीच्या कष्टमय संगोपनातून, शाळेतील एका साध्या निमंत्रणातून मॅक्स हेंगोचा सुरू झालेला हा प्रवास आज विश्वचषकाच्या दारात उभा आहे.

## महत्वाचे...



### वळसंग जि.प. शाळेत आनंद मेळावा

**वळसंग, दि. ११ फेब्रुवारी-**
वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा येथे बाल आनंद बाजार व फूड फेस्टिवल या कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरणबसप्पा तिपरादी व शिवकुमार नागठाण तर उद्घाटक म्हणून गावातील ज्येष्ठ नागरिक व मल्लय्या स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास शाळेतील मुख्याध्यापक संजीवकुमार सुतार, लिंगराज गणेर, पार्वती तोळनुरे, नागम्मा हसरम नी,सिध्दाराम कोटगे, शिवय्या हिरेमठ, विश्वनाथ कटारे व शाळेतील स्वयंपाकी तथा मदतनीस यांनी परिश्रम घेतले.



### कासारवाडी जि.प. शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी जगताप

**बार्शी, दि. ११ फेब्रुवारी-**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथील शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सिद्धेश्वर जगताप तर उपाध्यक्षपदी सुधीर माने यांची एकमताने निवड करण्यात आली. बुधवार दि. ११ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथील शालेय व्यवस्थापन समितीचे सन २०२५-२६ ते २०२७-२८ या दोन वर्षासाठी पुनर्गठन करण्यासाठी विशेष सभा अध्यक्षा प्रीती कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. निवडीनंतर अध्यक्ष सिद्धेश्वर जगताप व उपाध्यक्ष सुधीर माने यांनी आपल्या शाळेची गुणवत्ता वाढ आणि भौतिक सुविधा पूर्ण करण्यासाठी योगदान देऊ, असे सांगितले. सभा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुधाकर बडे, वीणा कदम, अभयकुमार कसबे, बिनादेवी दरेकर, बाळासाहेब मुंढे, मनीषा भोसले, रेणुका मुंढे, श्रीमती द्वारका पिंपळे यांनी परिश्रम घेतले.




### सांगोला महाविद्यालयाच्या किरण राजमानेची खेलो इंडियासाठी निवड

**सांगोला, दि. ११ फेब्रुवारी-**
सांगोला महाविद्यालयाच्या किरण राजमाने हिची आंतर विद्यापीठ खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली. नुकत्याच सुभारती विद्यापीठ मेरठ येथे झालेल्या ऑल इंडिया युनिव्हर्सिटी १० मीटर रायफल शूटिंग स्पर्धेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून प्रतिनिधित्व करताना तिने पाचवे स्थान प्राप्त केले. या कामगिरीवर तिची संघाने खेलो इंडिया स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तिचा प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांनी सत्कार केला. तिला क्रीडा शिक्षक प्रा.जगदीश चेडे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार व प्रा.पी.सी. झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव ॲड. उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे यांनी अभिनंदन केले.

## निधन वृत्त...

### उत्तरेश्वर बेणे



**बार्शी, दि. ११ फेब्रुवारी-**
बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव उत्तरेश्वर भगवान बेणे (वय ८) यांचे आज पहाटे पाच वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. नागनाथ हायस्कूल घारीचे मुख्याध्यापक वैभव बेणे यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात दोन मुले व तीन मुली असा परिवार आहे.

### रामकिसन परदेशी



**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**
लष्कर विभागातील तेलाचे सुप्रसिद्ध व्यापारी प्रतीक ऑइल सेंटरचे मालक आणि व्यापारी बँकेचे माजी कॅशियर रामकिसन माणिकचंद परदेशी (वय ८७) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, भाऊ, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### किसन आदाटे



**सांगोला,दि.११ फेब्रुवारी -**
नाझरे (ता.सांगोला) येथील प्रसिद्ध उद्योजक किसन उर्फ बापू सोपान आदाटे (वय-६३) यांचे मंगळवार दि.१० फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, जावई, दोन बहिणी, तीन भाऊ असा मोठा परिवार आहे.

### चंद्रकांत पवार



**बार्शी, दि. ११ फेब्रुवारी-**
बार्शीतील राऊत चाळ येथील रहिवाशी व जवाहर तरुण गणेश मंडळाचे अध्यक्ष कै. चंद्रकांत (पट्टूमभाई) पवार (वय ५६) यांचे बुधवार दि. ११ फेब्रुवारी रोजी हृदय विकाराच्या निधन झाले. माजी आमदार राजेंद्र राऊत यांचे ते बालपणापासूनचे सहकारी व अत्यंत विश्वासू निकटवर्तीय होते. मंगळवार पेठ येथील मोक्षधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर हजारोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा, एक मुलगी, बहीण असा परिवार

## हळदी-कुंकू कार्यक्रमात

# चोरीला गेलेले आठ लाखांचे दागिने जप्त

### पंढरपूर पोलिसांची मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ फेब्रुवारी-**
तालुक्यातील गोपाळपूर येथील हळदी कुंकूच्या कार्यक्रमातील चोरीस गेलेले आठ लाख २५ हजारांचे दागिने पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करुन पंढरपूर तालुका पोलिसांनी मोठी कारवाई केली.

गोपाळपूर येथील रहिवासी असलेले आबासाहेब आसबे यांनी ३० जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार यांच्या पत्नीचे दागिने हळदी-कुंकूसाठी जात असताना सुमारे आठ लाख २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरी झाल्याबाबत पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात होता. सदर गुन्ह्याचे तपासामध्ये फिर्यादी यांच्याकडे सखोल तपास करून त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे फिर्यादी कडून घटनेची संपूर्ण माहिति घेऊन





पंढरपूर तालुका पोलिसांनी घटनेच्या दिवशी हळदी कुंकूच्या कार्यक्रमासाठी आलेल्या लोकांकडे विचारपूस करून त्यातून सखोल तपास करून मंगळवेढा येथील व्यवसायिकअविनाश वाघमारे राहणार मंगळवेढा याला ताब्यात घेऊन सखोल विचारपूस केली असता सुरुवातीला उडवा उडवीची उत्तर दिले नंतर अविनाश वाघमारे राहणार मंगळवेढा व गोपाळपूर येथील त्याचा मित्र यांच्याकडून चोरीस गेलेले सर्व दागिने एकूण आठ लाख २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने एकूण वजन ५५ ग्राम सोन्याचे दागिने काढून दिले ते पंचायत समक्ष जप्त करण्यात आले आहे

गुन्ह्यातील आठ लाख २५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून गुन्ह्यात चोरीस गेलेल्या सोन्याची शंभर टक्के रिकव्हरी केली आहे सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती विभावरी रेळेकर, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय तोंडले, एएसआय विजू गायकवाड, पोलीस हवालदार सचिन आटपाडकर, पोलीस हवालदार साळुंखे, बाजीराव काकडे,सागर गवळी मंगेश रोकडे, विजयकुमार आवटी, अभिमन्यू गरड चालक, पोलीस हवालदार हासन नदाफ, विलास घाडगे यांच्या पथकाने केली.

# दुहेरी हत्याकांड प्रकरणी सात महिन्यानंतर दोघांना अटक

### पंढरपुरातील प्रकरण; जोधपूरपर्यंत जाळे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**
पंढरपूर शहरातील दुहेरी हत्याकांडाचा सुमारे ७ महिन्यानंतर उलगडा करण्यात सोलापूर ग्रामीण पोलीसांना यश आले असून दोघांना अटक करण्यात आली आहे.

याबाबतची हकीकत अशी, १५ जुलै २०२५ रोजी रात्री ९.३० वा.चे पुर्वी पंढरपूर शहरातील कुंभार गल्ली येथे सुरेखा संजय जगताप (वय ४५), लखन संजय जगताप (वय २६ वर्षे, दोघे रा. शिंदे नाईक नगर, कुंभार गल्ली पंढरपूर) यांना कोणीतरी अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरून धारदार शस्त्राने डोकीत, अंगावर मारून गंभीर जखमी करून जिवे ठार मारले होते. त्याबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाणेत गुन्हा दाखल आहे. या गुन्हयाचा तपास सुमारे ७ महिन्यांपासून चालु होता. १८ जानेवारी २०२६ रोजी या गुन्हयाचा तपास सहायक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी स्वतःकडे घेवून स्थानिक गुन्हे शाखा व एसडीपीओ कार्यालयाकडील पथक यांच्या मदतीने गुन्हयातील निष्पन्न मोबाईलचे डमडाटा, सीडीआर, एसडीआर, लोकेशन याची माहीती घेतली. घटनेवेळी परिसरातील काही लोकांचे मोबाईल इनऍक्टिव्ह असल्याचे दिसून आलेने गुन्हयाच्या घटनेवेळी त्यांच्या हालचालीची पडताळणी केली. त्याच दरम्यान बातमीदाराकडून खात्रीशीर बातमी मिळाल्याने गुन्हयातील संशयीत विधीसंघर्षग्रस्त बालक व दोन्ही आरोपींनी अपराध केल्याबाबतचा पुरावा मिळाला. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील पथकास जोधपूर (राजस्थान) येथे पाठवून एका आरोपीस ताब्यात घेवून प्राथमिक चौकशी करता त्याने अपराधाची कबुली दिली. त्यानंतर दुसऱ्या आरोपीस ताब्यात घेवून त्याचेकडे चौकशी करता, त्याने सुरूवातीस उडवा उडवीची उत्तरे दिली. तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कौशल्यपुर्ण चौकशी करून आरोपींकडून माहीती प्राप्त करून घेवून ७ महीन्यापुर्वी घडलेल्या गंभीर गुन्हयाची उकल करण्यात यश मिळविले आहे.



गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपीतांनी चंद्रभागा नदीच्या पात्रात गुन्हयात वापरलेली हत्यारे व मयताचे घरातील टिव्ही फेकून दिल्याचे तपासा दरम्यान सांगितले. त्याप्रमाणे नदीपात्रात ज्या ठिकाणी आरोपीतांनी हत्यारे व टिव्ही टाकला त्याची आरोपीकडून माहीती घेवून शोध मोहीम राबविली असता, १० फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हयातील ५५ इंची टेलीव्हीजन संच फुटलेल्या स्थितीत व ११ फ ेब्रुवारी २०२६ रोजी धारदार तिक्ष्ण हत्यार मिळून आल्याने महत्वाचा पुरावा पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आला आहे. यातील दुसरा आरोपी याचे व मयत यांचेमध्ये जागेचा वाद होता व अनैतिक संबंधाचे एक कारण असलेचे तपासादरम्यान माहिती मिळत आहे.

ही कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, पंढरपूर उपविभाग पंढरपूर सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांचे म ार्गदर्शनाखाली पो निरीक्षक संजय जगताप स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाकडील पोसई अब्दुलहमीद शेख, सपोफौ शरद कदम, पोहेकॉ सुरज हेंबाडे व स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण कडील सपोनि विजय शिंदे, पो अंमलदार प्रकाश कारटकर, नारायण गोलेकर, मोहन मनसावले यांनी पार पाडली आहे.

### कुसमोड येथे आज संत बाळूमामा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

**पिलीव, दि. ११ फेब्रुवारी-**
माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील लक्ष्मीनगर येथे १२ फेब्रुवारी रोजी संत बाळुमामा मूर्ती प्राणप्रतिषठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १२ फेब्रुवारी रोजी सकाळी सत्यनारायण,



मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा, दुपारी गजीढोल कार्यक्रमआयोजन, सायंकाळी कीर्तन व भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी या सदरच्या कार्यक्रमास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन लक्ष्मीनगर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# समर्थांनी राम व राष्ट्रभक्तीतून समाज जागृती केली : हभप सहस्त्रबुध्दे



### दासनवमीनिमित्त देऋब्रा शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे झाले कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ फेब्रुवारी-**
समर्थ रामदासांनी गायत्री पुरःश्चरण व तेरा कोटी रामनामाच्या बळावर समाजाच्या जागृतीसाठी देशाटन केले. आराध्यदैवत श्रीरामाच्या कृपेने विविध भागात मठांच्या व मारूतीरायांच्या मंदिरांद्वारे राष्ट्रभक्तीसाठी युवकांना एकत्र केले. महिलांना कीर्तनाचा अधिकार दिला. श्रीरामाच्या भक्तीसह राष्ट्राच्या भक्तीचा डांगोरा पिटत स्वत्व विसरलेल्या तत्कालीन समाजाला जागृत करण्याचे काम समर्थ रामदासांनी केल्याचे प्रतिपादन ह.भ.प. रत्नप्रभा सहस्त्रबुध्दे यांनी केले.

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे दासनवमीनिमित्त बुधवारी दि.११ फेब्रुवारी रोजी दत्त चौकातील संस्थेच्या समर्थ सभागृहात ह.भ.प. सहस्त्रबुध्दे यांचे गुलालाचे कीर्तन झाले. कीर्तनाची सुरूवात त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, दत्तात्रय आराध्ये, कार्यवाह श्याम जोशी, कार्यकारिणी सदस्य शंकर कुलकर्णी, महिलाध्यक्षा हेमा चिंचोळकर, क्रिडा संघटक रविंद्र नाशिककर, ॲड. मंगला चिंचोळकर, मीरा धामणगांवकर, चारूशिला बेंबळकर, सुरेंद्र पतकी, श्रीपाद दिक्षित, मंगेश महाजन, चंद्रकांत कुरनुरकर आदींसह महिला व पुरूष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कार्यवाह श्याम जोशी यांचा सत्कार**
यावेळी स्व. दिगंबरबुवा कुलकर्णी ट्रस्टचा आदर्श पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे कार्यवाह श्याम जोशी यांचा संस्थेतर्फे शाल व बुके देऊन ह.भ.प. रत्नप्रभा सहस्त्रबुध्दे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

ह.भ.प. सहस्त्रबुध्दे यांनी 'राम गावा राम ध्यावा, राम जीवीचा विसावा' या अभंगावर निरूपण करताना समर्थ रामदासांच्या जीवनातील उपासनेचे विविध टप्पे सांगत त्यांनी केलेल्या कार्याचा परामर्श घेतला. समर्थांनी वेणास्वामी यांच्याद्वारे महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिल्याचे सांगून हभप सहस्त्रबुध्दे यांनी उध्दवस्वामी यांच्या चरित्राचे आख्यान सादर केले.

दुपारी बारा वाजता 'जय जय रघुवीर समर्थ' च्या गजरात समर्थांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर महाआरती होऊन सर्वांना महाप्रसाद देण्यात आला. यावेळी माजी व्यवस्थापक चंद्रकांत कुरनुरकर यांच्यावतीने संस्थेस एक हजार रूपयांची देणगी दिली. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.



### स्वातंत्र्ययोध्दे भास्करराव नायगांवकर यांचा शतक महोत्सवी वाढदिवसानिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ११ फेब्रवारी-**
धाराशीव येथील स्वातंत्र्ययोध्दे भास्करराव नायगांवकर यांचा शतकमहोत्सवी वाढदिवस नुकताच उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.

मराठवाडयातील तत्कालीन मुस्लीम राजवटीविरूध्द प्रखरतेने लढलेले सुवर्णकार समाजातील ते लढवय्ये आहेत. हैद्राबाद मुक्ती संग्राम ातील आघाडीच्या स्वातंत्र्य सैनिकात त्यांची गणना होते.मराठवाडा मुक्ती संग्रामावेळी त्यांना अटक झाली होती. त्यांनी तब्बल सहा महिने तुरुंगवासही भोगलेला आहे. ते एक उत्तम,व्यासंगी व अभ्यासू लेखकही आहेत.सागरातील निवडक रत्ने,एक जिज्ञासा व हा एक जन्म अशी तीन पुस्तके प्रकाशीत झाली आहेत. नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देवून शतकमहोत्सवी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. मंगळवेढयाचे आयुर्वेदाभ्यासक रत्नाकर वेदपाठक यांनी महाराष्ट्र सुवर्ण परिवार आणि मंगळवेढेकरांच्या वतीने भास्करराव नायगांवकर यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी संजय नायगांवकर, डॉ. शुभांगी पोतदार, सुनिता वेदपाठक व सुवर्णकार बांधव उपस्थित होते.

# नवविवाहितेच्या हत्येप्रकरणी आरोपी महिलेस जन्मठेप


### अंजनगाव उमाटे येथे तीन वर्षापूर्वी घडली होती घटना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.११ फेब्रुवारी-**
अंजनगाव उमाटे (ता. माढा) येथे दोन तीन वर्षापूर्वी घडलेल्या नवविवाहीत महिलेच्या हत्येप्रकरणी मुख्य आरोपी तिची जाऊ गीता पाडूळे हिस खून व पुरावा नष्ट केल्याच्या प्रकरणात दोषी ठरवून अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश पी. डी. सुभेदार यांनी जन्मठेप व ५०००/- रुपये दंड, सदर दंड न भरल्यास ६ महिने कारावास तसेच ३ वर्ष शिक्षा व २०००/- रुपये दंड, सदर दंड न भरल्यास एक महिने कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

माढा तालुक्यातील मौजे अंजनगाव उमाटे येथे फिर्यादी सिद्धेश्वर जाधव यांची मुलगी उज्वला हिचे लग्न किरण लक्ष्मण पाडुळे यांच्याशी दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजी झाले होते. तिच्या घरी नवरा, दीर, सासू, सासरे, जाऊ असे राहण्यास होते. उज्वला ही माहेरी जाताना तिने तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व कानातील सोन्याच्या रिंगा कपाटात ठेवल्या होत्या. परत आल्यानंतर तिने पाहिले असता सोन्याचे दागिने मिळून आले नाहीत. तिने तिची जाऊ गीता शंकर पाडुळे हिस विचारपूस केली असता तिने तिच्याशी भांडण केले. चोरीचा आळ घेतल्याबद्दल गीता हिच्या मनात उज्वला हिचे बाबत राग होता. दि. २ फेब्रुवारी २०२३ रोजी घरात केवळ मयत उज्वला व आरोपी गीता या दोघीच असताना. याचा फायदा घेऊन आरोपीने मयताचा गळा आवळून खून केला व पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने घरातच मयतास पेटवून दिले. तसेच आत्महत्या केल्याचा बनाव रचून किचनच्या दरवाज्यातून बाहेर येऊन घराच्या मुख्य दखाजाला बाहेरुन कुलूप लावले व किचनच्या दरवाज्यातून घरात जाऊन किचनमधील चाकू घेऊन स्वतःच्या अंगावर वार केले व अज्ञात आरोपीने खून केला असे दाखवण्याचा प्रयत्न केला. तसेच घटनेच्या वेळेस आरोपीही शेतात काम करत होती, असेही दाखवण्याचा प्रयत्न केला.



आरोपीविरुद्ध मयताचे वडील यांनी माढा पोलीस ठाणेत गुन्हा दाखल केला.



पुढील तपास तत्कालीन सहा. पोलीस निरीक्षक शाम बुवा यांनी करुन आरोपीविरुद्ध सबळ पुरावा गोळा करुन न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सदर प्रकरण हे परिस्थितीजन्य पुराव्यावर अवलंबून होते. यामध्ये कोणीही नेत्र साक्षीदार उपलब्ध नव्हते. सरकार पक्षाच्यावतीने एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. त्यांच्याकडून परिस्थितीजन्य पुरावा रेकॉर्डवर घेण्यात आला. यामध्ये फिर्यादी, घटनास्थळ पंच, आरोपीकडून जप्त करण्यात आलेला चाकू व घराची चावी यावरील पंच, आरोपीची वैद्यकीय तपासणी केलेले डॉक्टर यांनी आरोपीच्या शरीरावरील जखम ांबाबत दिलेला अहवाल, मोबाईल वरील झालेल्या संभाषणाबाबत तपासण्यात आलेले नोडल ऑफिसर यांचे सर्वांचे कोर्टासमोरील जबाब हे परिस्थितीजन्य पुराव्यास पूरक असलेबाबत सरकारी वकील दिनेश देशमुख यांनी सुसंगत असा परिस्थितीजन्य पुरावा युक्तीवादा दरम्यान कोर्टासमोर मांडला. तसेच उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे दाखले दिले. या संपूर्ण बाबीचा अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश पी. डी. सुभेदार यांनी अवलोकन करुन आरोपीस खून व पुरावा नष्ट केल्याच्या प्रकरणात दोषी ठरवून जन्मठेप व ५०००/- रुपये दंड, सदर दंड नभरल्यास ६ महिने कारावास, भादंवि. कलम २०१ अन्वये ३ वर्ष शिक्षा व २०००/- रुपये दंड, सदर दंड न भरल्यास एक महिने कारावास अशी शिक्षा सुनावली.सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक शाम बुवा व दुय्यम अधिकारी पोलीस उपनिरीक्षक महमद शेख यांनी केला आहे. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील दिनेश देशमुख यांनी काम पाहिले. फिर्यादीकडून ॲड. धनंजय माने यांनी काम पाहिले. तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार अमृत खेडकर व महिला पोलीस अमलदार रीना शेख यांनी साक्षीदारांना योग्य मार्गदर्शन करुन वेळोवेळी कोर्टात हजर ठेवले.

सदर केसमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर, पर्यवेक्षण अधिकारी माढ्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# तक्रार प्रलंबित प्रकरण; ५८ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

नागरिकांनी नोंदवलेल्या अधिसूचित सेवा वेळेत न निकाली काढणाऱ्या आणि तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अखेर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.



महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेने एकूण ५८ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंड ठोठावला असून ९ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्याचे आदेश उपायुक्त लोकरे यांनी दिले आहेत. महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभाग, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, बांधकाम परवाना , विविध झोन कार्यालय, आरोग्य विभाग तसेच इतर संबंधित विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विविध सेवा विहित कालावधीत न दिल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणात नागरिकांच्या तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार विविध विभागातील ५८ कर्मचाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे. प्रलंबित अर्जांची संख्या १५० आहे. या कर्मचाऱ्यांना एकूण ९ हजार ४०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. हा दंड त्यांच्या फेब्रुवारी २०२६ पेड इन मार्चच्या वेतनातून वसूल केला जाणार आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून कामकाजातील निष्काळजीपणामुळे लोकसेवेवर परिणाम होत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्यास कारवाई अटळ असल्याचा कडक इशारा महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिला आहे.

## महत्वाचे...



### व्हॅलेंटाईन स्कूलच्या सृष्टी गिरेला रौप्य, मनोज कांबळेला ब्राँझ पदक

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

येथील व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या सृष्टी गिरे हिने रौप्य तर मनोज कांबळे याने ब्राँझ पदक पटकाविले. गोवा येथे पेड्डम स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मापुसा येथे झालेल्या १०व्या आंतराराष्ट्रीय कराटे स्पर्धेत मनोजने ब्राँझची कामगिरी केली. तसेच एस जी पी डी ए पार्किंग लॉट स्केटिंग रिंक मडगाव दक्षिण गोवा आयोजित आंतरराष्ट्रीय ओपन रोलर स्केटिंग स्पर्धेत व राज्यस्तरीय मार्शल आर्ट प्रशिक्षण कार्यशाळेत सृष्टी हिला रौप्य पदकाने सन्मानित करण्यात आले. त्यांना क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व मोनिका जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा, सुप्रिया बोम्मा तसेच संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे यांनी अभिनंदन केले.



### मेहता शाळेत देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

कै. वि.मो मेहता माध्यमिक शाळेमध्ये ५ फेब्रुवारी हा दिवस शि. प्र. मंडळी या मातृ संस्थेचा १३८ वा वर्धापन दिन म्हणून अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने एक फेब्रुवारी रोजी प्रशालेने देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत सोलापूर शहरातील विविध शाळांनी सहभाग नोंदवला होता. परीक्षक म्हणून आणि अनिल लोंढे व अपर्णा धर्माधिकारी उपस्थित होते. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ ५ फेब्रुवारी वर्धापन दिनाच्या दिवशी करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हरीभाई देवकरण प्रशाला व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती दीपा फाटक उपस्थित होत्या तसेच शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने व संस्थापकांच्या प्रतिमा पूजनाने झाली.यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये यश प्राप्त केले होते त्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तसेच देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेचा बक्षीस समारंभ देखील पार पडला.प्रथम क्रमांक हरिभाई देवकरण प्रशाला, द्वितीय एस आर चंडक प्रशाला, तृतीय नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशाला या प्रमाणे विजयी संघाला सन्मान चिन्ह आणि सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन प्रीती कुलकर्णी यांनी केले तर प्रास्ताविक व सत्कार प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी केले.




### डॉ. क्रांतिवीर महिंद्रकर यांना सुवर्णपदक

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

उत्तराखंडमधील ऋषिकेश येथील श्री स्वामीनारायण आश्रम येथे आयोजित आंतरराष्ट्रीय योग आणि समग्र आरोग्य परिषद हे परिषद राष्ट्रीय समग्र आरोग्य संस्था आणि श्रीस्वामीनारायण आश्रम, ऋषिकेश यांनी आयोजित केली होती. यात सोलापूरचे योग निसर्गोपचार व संमोहन तज्ञ डॉ. क्रांतीवीर शिवराम महिंद्रकर व चंदा क्रांतीवीर महिंद्रकर यांनी सहभाग नोंदविला. उपाध्यक्ष योग स्कूल व्हिएतनाम संस्थापक योग, व्हिएतनाम डॉ. विनोद कश्यप चेअरमन राष्ट्रीय समग्र आरोग्य संस्था या अधिवेशनात डॉ. क्रांतीवीर महिंद्रकर यांना यांच्या हस्ते गोल्ड मेडल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जीएलजी योगा स्कूल, व्हिएतनाम आणि एसकेएम योगा यांच्या संयुक्त विद्यमाने भरविण्यात आले होते.

# हिंदीच्या पेपरला ४६३ विद्यार्थ्यांची दांडी

● शिक्षणाधिकारी सचिन जगताप; १० हजार ३५६ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी परीक्षा सुरू झाली असून, ती कॉपीमुक्त करण्यासाठी कडक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. दरम्यान, आज हिंदी विषयाचा दुसरा पेपर १० हजार ३५६ विद्यार्थ्यांनी दिला असून, या काळात कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याची माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सचिन जगताप यांनी दिली. दरम्यान, या परीक्षेला ४६३ विद्यार्थ्यांनी दांडी मारली होती.

सोलापूर जिल्हा प्रशासनाने संवेदनशील केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित केले असून, परीक्षा शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कॉपी मुक्त अभियानांतर्गत परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील काही परीक्षा केंद्र संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आले असून, तिथे विशेष देखरेख ठेवली जात आहे. आज दुसऱ्या दिवशी हिंदी विषयासाठी



१० हजार ८१९ विद्यार्थी बसणार होते मात्र यातील १० हजार ३५६ इतक्याच विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे. तर ४६३ विद्यार्थी गैरहजर राहिले आहेत. सर्वत्र सीसी टीव्ही कार्यान्वित असल्याने कोणत्याही केंद्रांवर अनुचित प्रकार घडला नाही. दरम्यान, भरारी पथकांनीही वेगवेगळ्या परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या असून, प्रत्येक परीक्षा केंद्रांवर बैठे पथक तैनात करण्यात आले आहे.

बाहेरून कॉपी पुरवठा होऊ नये म्हणून जिल्हा प्रशासनाने मोठी दक्षता घेतल्याचे दिसून आले. माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी गतवर्षी जिल्ह्यात कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान यशस्वी करण्यासाठी परीक्षकाच्या मोबाईल वरून परीक्षाचे ऑनलाइन लाईव्ह केले होते. या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाल्यानंतर आता सर्वच परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. परीक्षा काळात या कॅमेऱ्याद्वारे लाईव्ह चित्रण जिल्हा परिषद कार्यवानिमित्त करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षाला जोडण्यात आल्यामुळे सर्वच परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.

# सोनाली कडते यांना जि.प. अध्यक्ष करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर,दि.११ फेब्रुवारी-**

आमदार सुभाष देशमुख व श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनिष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मंद्रूप जिल्हा परिषद गटाच्या निवडणुकीत जिल्ह्यात सर्वाधिक मताधिक्यानी विजयी झालेल्या सोनाली परसप्पा कडते यांना जिल्हा परिषद अध्यक्ष करण्याची मागणी भाजपाचे जिल्हा चिटणिस यतीन शहा यांनी केली आहे.



आमदार सुभाष देशमुख यांच्यावरील निष्ठेमुळे सोनाली कडते यांना दोन वेळा दक्षिण सोलापूर पंचायत समितीची सभापती होण्याची संधी मिळाली. यावेळी त्यांनी तालुक्यात विविध विकासकामांसाठी कोट्यावधी निधी उपलब्ध करून दिला. तसेच त्यांचे पती परसप्पा कडते यांनी संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष म्हणून काम करताना दक्षिण तालुक्यातील शेकडो वृध्द व निराधरांना अनुदानाचा लाभ मिळवून दिला. त्यांच्यामुळे दक्षिणमधील सर्वाधिक वृध्दांना संजय निराधार योजनेचा लाभ मिळाले. मंद्रूप जिल्हा परिषद गटाच्या निवडणूकीत प्रस्थापित व सत्ताधार्यांच्या विरोधात मतदारांनी त्यांना नऊ हजार मताधिक्यांनी निवडून दिले.

त्यामुळे सोनाली कडते यांना जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा करण्याची मागणी भाजपाचे जिल्हा चिटणिस यतीन शहा यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे.

# विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी लोकमंगलची ‘लोट्स’ योजना

● चालू वर्षी २५ विद्यार्थ्यांना ४.८४ लाखांची शिष्यवृत्ती
● आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते धनादेश वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

गरीब, गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने लोकमंगल फाउंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या ‘लोटस’ शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत यंदाच्या शिष्यवृत्ती वितरण सोहळा उत्साहात पार पडला. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी २५ विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन एकूण ४ लाख ८४ हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. या विद्यार्थ्यांना धनादेशांचे वितरण आमदार सुभाष देशमुख आणि बाजार समितीचे संचालक मनीष देशमुख यांच्या हस्ते तसेच लोटस कोअर कमिटीच्या वतीने वर्षभरात करण्यात आले.



शिक्षण हीच प्रगतीची गुरुकिल्ली मानून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी २०१५ साली आमदार देशमुख यांच्या संकल्पनेतून ‘लोटस’ योजनेची सुरुवात करण्यात आली. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, हा या योजनेमागील प्रमुख हेतू आहे. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर मार्गदर्शन, प्रेरणा आणि प्रोत्साहनही दिले जाते. गेल्या ११ वर्षांत (२०१५ ते २०२६) या योजनेद्वारे एकूण २२२ हून अधिक विद्यार्थ्यांना दत्तक घेण्यात आले असून, आजपर्यंत सुमारे ८७ लाख ६३ हजार १०२ रुपयांची शिष्यवृत्ती वितरित करण्यात आली आहे. या मदतीमुळे अनेक विद्यार्थ्यांनी डॉक्टर, अभियंता, चार्टर्ड अकाउंटंट यांसारख्या क्षेत्रात उच्च शिक्षण घेऊन आपले करिअर घडविले आहे. यावेळी आमदार सुभाष देशमुख म्हणाले, उच्च शिक्षणाची संधी मिळाली तर ग्रामीण व सर्वसामान्य कुटुंबातील मुलेही मोठी स्वप्ने पूर्ण करू शकतात. विद्यार्थ्यांच्या प्रगतीतूनच समाजाचा विकास होतो.

लोकमंगल फाउंडेशन विद्यार्थ्यांच्या क्षमतेला दिशा देण्यासाठी आणि त्यांच्या भविष्यासाठी भक्कम पायाभरणी करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. कार्यक्रमास लोकमंगल फाउंडेशनचे सदस्य, पदाधिकारी, विद्यार्थ्यांचे पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांनी व पालकांनी फाउंडेशनबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# शहर विकासाच्या प्रश्नांवर आ. देवेंद्र कोठे यांची आग्रही भूमिका

## विविध विकासकामांसाठी केली निधीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

शहर विकासाच्या प्रश्नांवर आमदार देवेंद्र कोठे यांनी बुधवारी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आग्रही भूमिका मांडत विविध मागण्या सादर केल्या. शासकीय रुग्णालयातील रस्ते, प्राणी संग्रहालयाच्या आराखड्याची अंमलबजावणी, उद्याने, विद्युत तारा भूमिगत करण्यासह भुईकोट किल्ला सुशोभीकरणासाठी निधीची मागणी करत आ. कोठे यांनी सोलापूर शहराच्या प्रलंबित विकासकामांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, छत्रपती श्री शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयातील रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना स्ट्रेचरवरून नेताना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे शासकीय रुग्णालयातील रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा. धर्मवीर संभाजी महाराज तलाव आणि स्मृती वन या दोन्ही ठिकाणांचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यासाठी ४० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यातील निधी टप्प्याटप्प्याने वितरित केला तर या दोन्ही ठिकाणचे सुशोभीकरण चांगल्या पद्धतीने करता येईल. महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाच्या नूतनीकरणासाठी आणि सुशोभिकरणारासाठी शासनाकडून २१ कोटी रुपयांचा आराखडा तयार आहे यातील सात कोटी रुपयांची कामे सध्या सुरू आहेत उर्वरित कामही लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर प्रयत्न व्हावेत, असेही आमदार देवेंद्र कोठे यांनी यावेळी सांगितले.




यावेळी म्हणाले. शहराच्या विकास आराखड्यात सुचवण्यात आलेल्या डीपी रस्त्यांना जिल्हा नियोजन समिती किंवा राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. सोलापूर शहरातील महानगरपालिकेच्या शाळा आणि हद्दवाढ भागात असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक आहे या दुरुस्तीकरता देखील निधी मिळावा अशी मागणी केली. शहरातील झोपडपट्टी तर तसेच गलिच्छ वस्ती सुधारणा भागात वीज पुरवठा करणाऱ्या तारा अनेक ठिकाणी घरांना चिटकून आहेत. या तारांना स्पर्श झाल्यामुळे आजवर अनेकांचे दुर्दैवी मृत्यूदेखील झाले आहेत. हे टाळण्यासाठी या भागातील वीज पुरवठा करणाऱ्या तारा भूमिगत अथवा बंच केबल टाकून सुरक्षित कराव्यात. शहरातील भुईकोट किल्ला सुशोभित करून नागरिकांना पाहण्यासाठी खुला करावा, असेही ते म्हणाले. श्री गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळ मार्गावरील वीज पुरवठा करणाऱ्या सर्व तारा भूमिगत करून वीजपुरवठा करावा, अशी मागणीही आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी केली. आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूर शहराच्या विकासासाठी केलेल्या आग्रही मागण्यांवर शासनस्तरावर सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याप्रसंगी दिले.

# प्रभाग २२च्या सर्वांगीण विकासासाठी आपली सहकार्याची भूमिका : पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

प्रभाग क्रमांक २२ चे नगरसेवक किसन जाधव यांच्या रेल्वे लाईन सोनामाता प्रशाला समोरील संपर्क कार्यालयाचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी आ. देवेंद्र कोठे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय जनसंघाचे सहसंस्थापक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

दरम्यान ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं ढोल ताशाच्या निनादात फटाक्यांच्या आतिषबाजी करत पालकमंत्री जयकुमार गोरे यांना भला मोठा हार घालून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यामुळे अवघा परिसर भाजपमय झाला होता. तर



जय श्रीराम जय जय श्रीराम चा नारा घूमल्याने अवघा परिसर भगवामय झाला होता. प्रभाग २२ च्या सर्वांगीण विकासासाठी किसन जाधव व नागेश आण्णा गायकवाड यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी आणून भरीव कामे केल्याचे गौरवोद्गार पालकमंत्री गोरे यांनी काढले.

पुढील काळातही विकासकामांसाठी संपूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली आमदार देवेंद्र कोठे यांनी किसन जाधव यांचे कार्य लोकाभिमुख व प्रभावी नेतृत्वाचे उदाहरण असल्याचे सांगत, सोलापूर शहर मध्य विधानसभेत ‘इच्छा भगवंताची’ परिवाराने बजावलेल्या किंगमेकर भूमिकेचा विशेष उल्लेख केला. लक्ष्मण मामा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सक्षम नेतृत्व घडल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी नगरसेवक किसन भाऊ जाधव, माजी नगरसेवक नागेश आण्णा गायकवाड, नगरसेविका चैताली शिवराज गायकवाड, दत्तात्रय मामा नडगिरी, प्रभाग क्रमांक २३ चे नगरसेवक राजशेखर मल्लिकार्जुन पाटील, प्रभाग क्रमांक १६ चे नगरसेविका कल्पना संतोष कदम, अंबादास जाधव, अमोल गायकवाड, विनोद भाऊजी गायकवाड, अँड. किरण गायकवाड, चेतन नागेश अण्णा गायकवाड, उमेश जाधव, शरद शिंदे, निलेश कांबळे,संतोष गायकवाड, अजिंक्य जाधव, कार्तिक जाधव, माऊली जरग, शहाजन शेख, शिवा पाटणकर, तेजस गायकवाड, उत्कर्ष गायकवाड, प्रथमेश पवार, माणिक कांबळे, फिरोज पठाण, वसंत कांबळे, महादेव राठोड, हूलगप्पा शासम, अजिंक्य शिंदे, सचिन राऊत, ऋषी येवले, दिनेश आवटी, नागेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात किसन जाधव यांनी पालकमंत्री गोरे व आमदार कोठे यांचे स्वागत करून पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद व सहकार्य अपेक्षित असल्याचे मनोगत व्यक्त केले.

# ‘सेवाकर्मी प्लस’मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेचीही सर्वोत्कृष्ट कामगिरी

## मुख्यमंत्र्यांकडून सीईओ कुलदीप जंगम यांचा लवकरच सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

१५० दिवसांच्या सेवाकर्मी प्लस कार्यक्रमात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सोलापूर, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, सातारा, हिंगोली, ठाणे आणि जळगाव जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि त्यांच्या चमूंचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे. दरम्यान, या जिल्हा परिषदांच्या सीईओंचे मुख्यमंत्री फडणवीस हेही सर्व विजेत्यांचा लवकरच राज्य शासनातर्फे गौरव करण्यात येणार आहे.

विकसित महाराष्ट्र २०४७ कडे वाटचाल करताना पारदर्शक, गतिमान आणि उत्तरदायी सुशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रगतीचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने १५० दिवसांचा सेवाकर्मी प्लस कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे मूल्यमापन करताना संबंधित आस्थापनाचा आकृतिबंध, सेवाप्रवेश नियम, ज्येष्ठता सूची, पदोन्नती स्थिती, सरळसेवा भरती स्थिती, बिंदूनामावली, अनुकंपा भरती, ळत्रऋजढ नोंदणी व प्रशिक्षण आणि कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक अद्ययावत करणे अशा ९ घटकांचा समावेश होता.या ९ उद्दिष्टांवर सर्वोत्तम कामगिरी



करणाऱ्या आयोग, प्राधिकरण, मंडळ, महामंडळ, सार्वजनिक उपक्रम, विद्यापीठ, स्वायत्त संस्था, महानगरपालिका, नगर परिषद यांचे गुणांकन दि. २६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आले आहे. निवडणूक आचारसंहितेमुळे प्रलंबित ठेवलेला जिल्हा परिषद कार्यालयांचा निकाल आज जाहीर करण्यात येत आहे. सर्व विजेत्यांचा लवकरच राज्य शासनातर्फे गौरव करण्यात येईल.

**जिल्हा परिषदांची वैशिष्ट्ये**

ई-गव्हर्नन्स आणि सेवा बजावताना सोलापूर आणि पुणे जिल्हा परिषदांनी सेवाकर्मी प्लस कार्यक्रमात व प्रशासकीय सुधारणांमध्ये अव्वल स्थान मिळवले आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणेने आपत्कालीन परिस्थितीत तत्पर कामगिरी बजावली. राज्यात गुणवत्तापूर्ण शिक्षण उपक्रमांना चालना देण्यासाठी जिल्हा परिषदांचे प्रयत्न केल्याचे दिसून आल्याने जिल्हा परिषदेचाही यामध्ये समावेश झाला आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवरात्रीनिमित्त महिलांचा सामूहीक दुग्धाभिषेकाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** लातुर येथील गावभागातील संतशिवयोगी झिंगणप्पा स्वामींची संजीवणी दक्षिणमुखी भव्य शिवपिंडीवर चौदाघर मठ महीला भजनी मंडळ,गल्लीतील भावीक महीलांन कडुन सामोहीक दुग्धाभिषेकाचे आयोजन १४ फेब्रुवारी शनिवारी रात्री ११:३० वा टाळ,मृदंग, झेंडे घेऊन भजन करत, डोक्यावर कळशी घेऊन भव्य मिरवणुक काढुन चौदाघर मठापासुन श्री झिंगणप्पा मठापर्यत मिरवणुक काढुन रात्री १२:०१मी दुग्धाभिषेक प्रारंभ होईल.

यात राचट्टेगल्ली, सराफ लाईन, झिंगणप्पा गल्ली आदी भागातुन महीला,भगीणी सहभाग घेणार आहेत यात जवळपास१००लीटर दुधाचा अभिषेक करण्याचा माणस आहे. यावेळी गावभागातील युवकही मोठ्याप्रमाणात सहभागी होणार आहेत. सर्वमहीलांनी लहाण कळशी घेऊन,भजनी महीलांनी टाळमृदंगा सोबत रात्री ११वा.चौदाघर मठासमोर हजर रहावे असे आवहान श्री चौदाघर मठ महीला व युवक भजनी मंडळांनी आव्हाण केल आहे.



## विविध वृत्त...

### लातुरात कामगारांचा आज मोर्चा

**लातूर :** केंद्र सरकारने कामगारांचे २९ कायदे रद्द केले. जाचक चार कायदे लागू केले. ते रद्द करावेत, यांसह विविध मागण्यांसाठी जनरल कामगार संघटनेच्या वतीने गुरुवारी (दि. १२) सकाळी ११.३० वा. अण्णाभाऊ साठे चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात येणार आहे. सहभागी होण्याचे आवाहन राजकुमार होळीकर, सुरेश काटे, शिवाजी भंडारे आदींनी केले आहे.

### जनगणना करा; ओबीसीची मागणी

**लातूर :** केंद्र सरकारने २०२६ च्या राष्ट्रीय जनगणनेबाबत राजपत्र जारी केले आहे, मात्र त्यात ओबीसी प्रवर्गासाठी स्वतंत्र रकाना नसल्याने समाजात असंतोष आहे. या पार्श्र्वभूमीवर, राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. जनगणनेत जातीनिहाय उल्लेख न केल्यास तीव्र जनआंदोलन करण्याचा इशारा यावेळी ओबीसी नेत्यांनी दिला. तसेच तेलंगणा राज्यातील बेलापूर (जि. सांगारेड्डी) येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची समाजकंटकांनी विटंबना केल्याचा निषेध करण्यात आला. याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेलंगणा सरकारकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विटंबना करणाऱ्यांवर कडक कारवाई करा

**लातूर :** तेलंगणा राज्यातील तेलापूर गावात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली आहे. त्याचा निषेध लातुरात ओबीसी चळवळीच्या वतीने नोंदविण्यात आला. दरम्यान, या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ओबीसी चळवळीतील ज्येष्ठ नेते अजित निंबाळकर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी भारत काळे, रंगनाथ घोडके, रमाकांत मुद्दे, दगडू पडिले, जालिंदर सुरवसे, बाळासाहेब फासे, लक्ष्मण दावनकर, अशोक क्षीरसागर, अनिकेत घोडके, ज्ञानेश्र्वर सुरवसे आदींची उपस्थिती होती. यावेळी निंबाळकर म्हणाले, शासनाने कठोर भूमिका घ्यायला हवी.

### सराईत गुन्हेगाराची केली हर्सूल कारागृहात रवानगी

**लातूर :** सार्वजनिक शांतता, कायदा व सुव्यवस्था बाधित करणाऱ्या गुन्हेगारांविरोधात लातूर पोलिसांनी कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वारंवार गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी सराईत गुन्हेगार शाम सुरेश पवार (वय २५, रा. वरवंटी, ता. जि. लातूर) याच्याविरुद्ध महाराष्ट्र झोपडपट्टी दादा प्रतिबंधक (एमपीडीए) कायद्यान्वये कारवाई करण्यात आली असून, त्याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. त्याची छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती कारागृह, हर्सूल रोड येथे रवानगी केली आहे.

लातुरात एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत दहशत निर्माण करणाऱ्या या आरोपीविरुद्ध जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्ताव तयार करण्यात आला होता. दरम्यान, या प्रस्तावाचे गांभीर्य लक्षात घेत जिल्हाधिकारी वर्षा एका वर्षासाठी केले स्थानबद्ध : 'एमपीडीए' अंतर्गत कारवाई 'एमआयडीसी'चा प्रस्ताव; कारवाईचे असे आहे स्वरूप सराईत असलेला गुन्हेगार शाम सुरेश पवार याच्याविरोधात एमपीडीए कायदा कलम ३ (१) व ३ (२) नुसार एका वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. त्याची छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती कारागृह, हर्मूल रोड येथे रवानगी केली.

### अध्यक्षपदी डॉ. गोपाळराव पाटील, बी.बी. ठोंबरे यांची सचिवपदी निवड

**लातूर :** राज्यातील नामांकित शिक्षण संस्था असा लौकिक असणाऱ्या शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांची तर उद्योजक बी. बी. ठोंबरे यांची सचिवपदी निवड झाली आहे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची बैठक सोमवारी राजर्षी शाहू महाविद्यालयातील संस्था कार्यालयात झाली.

यावेळी उपाध्यक्षपदी डॉ. अजय जाधव तर सहसचिवपदी डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी तर उद्धवराव पाटील यांची निवड करण्यात आली. तत्पूर्वी ८ फेब्रुवारी रोजी संस्थेची रीतसर मतदानाद्वारे निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये १५ जणांची कार्यकारी मंडळावर झाली असून, त्यात डॉ. गोपाळराव पाटील, बी.बी. संस्थेचा लौकिक वृद्धिंगत होईल पदाधिकारी निवडीनंतर संस्थेचे माजी सचिव प्राचार्य अनिरूद्ध जाधव यांनी पदभार नूतन सचिव बी.बी. ठोंबरे यांच्याकडे सुपूर्द करून नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाचे स्वागत केले.

याप्रसंगी अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील व सचिव बी.बी. ठोंबरे यांनी भावना व्यक्त करताना विद्यार्थी हित, शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखत शिक्षक, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणारी धोरणे कायम राहतील. संस्थेचा लौकिक वृद्धिंगत होईल, असा विश्र्वास व्यक्त केला. ठोंबरे, डॉ. अजय जाधव, डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, उद्धवराव पाटील, प्राचार्य रावसाहेब कावळे, सच्चिदानंद पाटील, शिवाजीराव पाटील, विजयाताई पाटील, शुभांगी सूर्यवंशी-काळे, धर्मराज हल्लाळे, शिवाजी भोसले, अमर देशमुख, प्रकाश देशमुख, शामराव पाटील यांचा समावेश आहे.

# ३५७.९२ कोटींच्या कामांना प्रशासकीय मंजुरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक बुधवारी संपन्न झाली. या बैठकीत ३५७. ९२ कोटींच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली.



नविन कामांसाठी व दायित्वातील अपर्ण कामे पूर्ण झाल्याने त्यांची देयके अदा करणेसाठी असा एकूण रु.१९२. ५८ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला असून रु.१६८.०३ कोटी निधी खर्च झालेला आहे. अनुसुचित जाती घटक कार्यक्रमासाठी रु.१२.५ कोटी नियतव्यय मंजूर असून रु.११८. १७ कोटीच्या कामांना प्रशासकिय मंजुरी देण्यात आलेली आहे. या कामांपोटी एकूण रु.७२.४९ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला असून रु.६९. ५० कोटी निधी खर्च झालेला आहे. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनासाठी रु.३. २३ कोटी नियतव्यय मंजुर असून रु. २.९९ कोटीच्या कामांना प्रशासकिय मंजुरी देण्यात आलेली आहे. या कामांपोटी एकुण रु.१. ९४ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला असून रु. १. २८ कोटी निधी खर्च झालेला आहे. अशाप्रकारे जिल्ह्यातील सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने चालू आर्थिक वर्षातील झालेल्या खर्चास जिल्हा नियोजन समितीने सर्वानुमते मान्यता दिली. तसेच जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत बचतीद्वारे रु.१८.६९ कोटी शिल्लक निधीतून पुनर्विनियोजनाद्वारे प्रामुखाने मुलींसाठी शौचालय, शेतकरी डी.पी. व स्मशानभूमीसाठी निधी वळती करण्यास सभागृहाने मान्यता दिली.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ करिता शासनाकडून रु.३८३.३१ कोटीची किमान नियतव्यय मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. प्रारुप आराखडा तयार करताना विविध योजनांचा राखीव निधी, जिल्हा विकास आराखड्यासाठी २५% निधीची तरतूद तसेच नाविन्यपुर्ण योजना व इतर नियोजन ५% वगळता उर्वरीत निधीपैकी किमान २/३ नियतव्यय गाभा क्षेत्रासाठी तर कमाल १/३ नियतव्यय बिगर गाभा क्षेत्रासाठी ठेवण्यात आलेला आहे. अनुसुचित जाती घटक कार्यक्रम करिता रु.१२५.०० कोटी व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेसाठी रु.३.२३ कोटी ची किमान नियतव्यय मर्यादा निश्र्चित करण्यात आलेली आहे. यास अनुसरुन जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत अंमलबजावणी यंत्रणांकडून रु.१७६०.०६ कोटीची मागणी करण्यात आलेली असून कमाल नियतव्यय मर्यादा रु.३८३.३१ कोटी च्या मयदित आराखडा तयार करण्यात आलेला आहे. लातूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले रस्ते, अंगणवाडी, शाळा इ. च्या अनुषंगाने तसेच जिल्ह्यास आवश्यक असलेल्या ग्रामविकास, वने, पशुसंवर्धन, ऊर्जा विकास, वैद्यकिय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य, लघु पाटबंधारे, सामान्य शिक्षण, नगर विकास पर्यटन/यात्रास्थळ इ. प्रमुख क्षेत्रांकरिता शासन स्तरावर रु.२१६.६९ कोटीची वाढीव मागणी राज्यस्तरीय बैठकीत करण्यात येणार आहे. यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

## ऊर्जा संवर्धनात उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** ऊर्जा संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना ऊर्जा मंत्रालयाचा 'ऊर्जा संवर्धन पुरस्कार २०२४-२५' जाहीर झाला आहे. जिल्ह्यात वीज बचतीबाबत जनजागृती करणे, शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर वाढवणे आणि नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवण्यात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या या प्रयत्नांची दखल घेऊन ऊर्जा मंत्रालयाने हा पुरस्कार जाहीर केला आहे. या सन्मानामुळे लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.



लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने ऊर्जा बचतीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली असून, शाश्वत ऊर्जा वापर, सौर ऊर्जेचा अवलंब आणि कार्यक्षम व्यवस्थापन यावर भर दिला. या कामगिरीसाठी कार्यालयाला ऊर्जा संवर्धन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हे प्रशासकीय पातळीवर हरित ऊर्जेचे अनुकरणीय उदाहरण ठरले आहे. एनर्जी ऑडिट २०२२-२३ मध्ये दिलेल्या सर्व सूचनांची जिल्हाधिकारी कार्यालयात अंमलबजावणी करण्यात आली. कार्यक्षम उपकरणांचा वापर, १०० किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्र कल्प, पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा साधनांचा समन्वयित, यथोचित आणि काळजीपूर्वक वापर यामुळे दरवर्षी ५५ हजार युनिट्स वीज बचत होत आहे. याशिवाय जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांना ऊर्जा बचतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी 'ऊर्जादूत' संकल्पना राबवण्यात आली.

राज्यात उद्योग, अभियांत्रिकी, रसायने, औषधे व अन्न प्रक्रिया, मेटल व स्टील, कागद निर्मिती, तेल व रसायने, वस्त्रोद्योग, थर्मल पॉवर, बांधकाम व्यवसाय, स्थापत्य, शासकीय इमारती आणि सर्वसाधारण क्षेत्रांमध्ये ऊर्जा संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था व व्यक्तींना गेल्या १८ वर्षांपासून महाऊर्जा (ऊर्जा मंत्रालय) द्वारे ऊर्जा संवर्धन पुरस्कार देण्यात येत आहेत. त्यानुसार 'ऊर्जा संवर्धन आणि व्यवस्थापन उत्कृष्टता-१८' अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले असून, यामध्ये लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना 'ऊर्जा संवर्धन पुरस्कार २०२४-२५' जाहीर झाला आहे.

राज्य पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल महाऊर्जा पुणे येथील महाव्यवस्थापक समीर घोडके, लातूर विभागीय महाव्यवस्थापक आनंद कुलकर्णी, ऊर्जा ऑडिटर केदार खमितकर आदींनी अभिनंदन व्यक्त केले आहे.

### सौर ऊर्जेद्वारे वीज निर्मितीमध्येही लातूर जिल्हा अग्रेसर

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत लातूर जिल्ह्यात ६५ प्रकल्प कार्यान्वित झाले असून, त्याद्वारे ३२३ मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती होत आहे. तसेच, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना अंतर्गत घराच्या छतावर सौर पॅनेल लावून वीज निर्मिती करून वीजबिल शून्य करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्ह्यातील ११ हजार १२३ लाभार्थ्यांनी घराच्या छतावर सौर पॅनेल बसवले असून, त्याद्वारे ४३.२३ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. यामुळे जिल्ह्यात अपारंपरिक ऊर्जेच्या (नवीकरणीय ऊर्जेच्या) वापराला मोठी चालना मिळाली आहे. वीज निर्मितीमध्ये अग्रेसर असलेल्या लातूर जिल्ह्याला आता ऊर्जा संवर्धनासाठी पुरस्कार जाहीर झाला आहे.

#### गेल्या तीन वर्षात जिल्ह्याला मिळालेले महत्वाचे पुरस्कार

लातूर जिल्ह्याला गेल्या सुमारे तीन वर्षांत मिळालेला हा आठवा राष्ट्रीय तथा राज्य स्तरावरील पुरस्कार ठरला आहे. यामध्ये राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार, लोकसत्ता आणि गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिकल अँड इकॉनॉमिक्सकडून सलग दोन वर्षे प्रथम क्रमांकाचा जिल्हा निर्देशांक पुरस्कार, सशस्त्र सेना ध्वज निधी संकलनामध्ये उत्कृष्ट कामिगीरीबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार, दिव्यांग मुलांसाठी राबविलेल्या उपक्रमाबाबत स्कॉच अवार्ड, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी पुरस्कार, उद्योग क्षेत्रातील कामगिरीबद्दल 'निर्यात पुरस्कार २०२५', मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत सलग दोन वर्षे पुरस्कार आदी पुरस्कारांचा समावेश आहे.

## रत्नागिरीला ग्रंथालय संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे हिरक महोत्सवी,कोकण विभाग ग्रंथालय संघाचे २७ वे आणि रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे ४९ वे अधिवेशन दि.२१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ आणि स्व.आम. कुसुमताई अभ्यंकर ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी समर्थ मंगल कार्यालय,साळवी स्टॉप, रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आले आहे.



सदर संयुक्त अधिवेशनाच्या निमित्ताने दि.२१फेब्रुवारी रोजी सकाळी नवलाई देवी मंदीर ते अधिवेशन स्थळ दरम्यान ग्रंथदिंडी निघणार आहे. त्यानंतर १० वाजता राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशनाचे उद्घाटन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी महसूल व गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. स्वागताध्यक्ष उद्योजक दीपकशेठ गद्रे असून, साहित्यिक कृष्णाजी कुलकर्णी व ग्रंथसखा विश्वस्त श्याम जोशी हे मार्गदर्शन होणार आहे.यावेळी राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, कोकण विभागाचे सहा.ग्रंथालय संचालक प्रशांत पाटील,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, प्रमुख कार्यवाह सोपानराव पवार, कार्योपाध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले, कोषाध्यक्ष भिमराव पाटील, कोकण विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष दिलीप कोरे,स्थायी समिती सचिव सुनील कुबल, ग्रंथालय कर्मचारी प्रतिनिधी ग्रंथमित्र नंदू बनसोड यांची मंचावर उपस्थिती लाभणार आहे. या सत्राचे प्रास्ताविक रवींद्रकुमार तथा भाई कालेकर हे करणार असून, सूत्रसंचालन अंजली बर्वे व श्रीकांत पाटील हे करतील.

लातूर जिल्ह्यातील ग्रंथालय चालक,ग्रंथालय कर्मचारी व ग्रंथप्रेमींनी या तिहेरी अधिवेशनाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून ग्रंथालय चळवळी वृध्दींगत करावे असे आवाहन राज्य ग्रंथालय संघाचे राज्या कार्योपाध्यक्ष राम मेकले, लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे,कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर, जिल्हा उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, सहकार्यवाह काशिनाथ बोडके यासह सर्व संचालकांनी केले आहे.

## हृदयविकाराने मृत्यूच्या प्रमाणात वाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** मराठवाड्यातील व राज्याच्या विविध जिल्ह्यातील श्र्वसन विकास तज्ञांची विभागीय परिषद दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी येथे पार पडली. विद्यमान परिस्थितीत विविध आजारांवर चर्चा करताना गेल्या काही वर्षांत हृदयविकाराने मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाल्याची चिंता तज्ञांनी या परिषदेत व्यक्त केली. यावरील उपाययोजनांवरही चर्चा करण्यात आली. या परिषदेत दमा, दुर्धर दमा, एलर्जी, टीबी, हृदयविकार, फुप्फुसाचा कॅन्सर, आयलडी, टीबी अशा जटील व गंभीर आजारावर चर्चा झाली.

या परिषदेचे उद्घाटन आयएमए महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी व अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. कुलकर्णी यांनी अशा प्रकारची परिषद आयोजित केल्याबद्दल संयोजकांचे कौतुक करताना काळानुसार वैद्यकीय क्षेत्रातील बदल व उपचार पद्धती यावर चर्चा करण्यासाठी आशा परिषदा वेळोवेळी झाल्या पाहिजेत, असे मत व्यक्त केले. प्रशासनाने डॉक्टर प्रोटेक्शन एक्टची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे, असेही ते म्हणाले. अधिष्ठाता डॉ. धपाटे यांनी श्वसनविकार व हृदय विकार या मुळे मृत्यूचे प्रमाण वाढत असल्याचे सांगत अद्यावत तंत्रज्ञानाद्वारे लवकर व योग्य उपचार मिळण्यास मदत होते व त्यातून मृत्यू प्रमाण कमी करता येते, असे सांगितले.

या परिषदेत ४०० डॉक्टरांनी सहभाग नोंदवला. या परिषदेत डॉ. रमेश भराटे, डॉ. नागार्जुन मातारू, विपुल गर्ग यांच्यासह प्रमुख डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. वेंटीलेटर, ब्रॉकोस्कोपी, थोराकॉस्कोपी, पीएफटी, एफओटी, डीलसीओ, स्ट्रेस टेस्ट, इक्मो इत्यादी नवीन तंत्रज्ञानाद्वारे डॉक्टरांना यावेळी प्रशिक्षण देण्यात आले. ही परिषद आयोजित केल्याबद्दल डॉ. रमेश भराटे यांचे कौतुक करण्यात आले. परिषद यशस्वी करण्यासाठी डॉ. अशोक गानू, डॉ. राजेश पाटील, डॉ. तोष्णीवाल, डॉ. कानडे, डॉ. चौधरी, डॉ. शीतल पाटील यांनी परिश्रम घेतले.

# गांधी पर्याय नसून शाश्वत उपचार : किशोर बेळेकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** पैशाच्या आधारे चालणाऱ्या जगात मानवी मूल्यांची होत चाललेली झीज अधोरेखित करणारा प्रभावी मूक व्यंगचित्रपट 'गांधी टॉक्स' हा केवळ महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानापुरता मर्यादित न राहता, आजच्या समाजात 'गांधी' या नावाचा नेमका अर्थ काय आहे, असा विचार मांडतो, असे दिग्दर्शक किशोर पांडुरंग बेळेकर यांनी लातूर येथे माध्यमांशी संवाद साधताना सांगितले.

अभिजात फिल्म सोसायटी, लातूर यांच्यावतीने 'गांधी टॉक्स' चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. चित्रपटाची संकल्पना स्पष्ट करताना बेळेकर म्हणाले की 'गांधी' हा शब्द दोन भिन्न अर्थांनी वापरला जातो-एक म्हणजे सत्य आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक, तर दुसरा आधुनिक जीवनातील पैसा आणि सत्तेच्या वर्चस्वाचे रूपक. मूकता, प्रतीकात्मकता आणि दृश्यप्रधान कथनशैलीच्या माध्यमातून भौतिकतावादाने मानवी भावना व मूल्ये कशी झाकोळली आहेत, हे या चित्रपटात प्रभावी सामाजिक व्यंगातून मांडले आहे, भारतात पहिला चित्रपट जो बनवला गेला राजा हरिश्चंद्र तो एक मूकपट होता आणि तो एका मराठी माणसाने अर्थात दादासाहेब फाळकेंनी बनवला आणि तेव्हापासून चित्रपट निर्मितीची सुरुवात झाली,



या गोष्टीला १०० वर्षे पूर्ण झाली, १०० वर्षांनंतर ही गोष्ट अभिमानाने साजरी करताना बनवण्यात येणारा चित्रपटही मूकपट असावा आणि ही भावना मनात ठेऊन हा चित्रपट विना संवादच असावा अस मी ठरवलं आणि मी त्यावर काम केल, योगायोगाने मी पण मराठीच आहे.

'पुष्पक' नंतर जवळपास ४० वर्षांनंतर प्रदर्शित झालेला हा मूक चित्रपट असून, त्याच्या संकल्पना आणि कथेसाठी जवळपास २५ वर्षे परिश्रम घेतल्याचे बेळेकर यांनी सांगितले. संवादांशिवाय केवळ दृश्यरचना, पार्श्वसंगीत आणि कलाकारांच्या अभिनयाच्या आधारे भावना, संघर्ष आणि विचार व्यक्त करणे हे मोठे सर्जनशील आव्हान असल्याचे त्यांनी नमूद केले.

या चित्रपटाचे संगीत ए. आर. रहमान यांनी दिले असून, मूक चित्रपटाला भावनिक आवाज देण्याचे श्रेय त्यांनी रहमान यांना दिले. मूक चित्रपटात संगीतच संवादाचे काम करते. ते प्रेक्षकांना कथानकातून मार्गदर्शन करते आणि प्रत्येक भावनेला अधिक प्रभावी बनवते, असे ते म्हणाले.


सध्या चित्रपटगृहांत प्रदर्शित होत असलेला 'गांधी टॉक्स' लवकरच मराठी आवृत्तीतही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अनुभवी कलाकारांच्या प्रभावी अभिनयावर आधारित हा चित्रपट चेहऱ्यावरील भाव, देहबोली आणि पडद्यावरील उपस्थितीच्या माध्यमातून कथा सांगत प्रेक्षकांना अंतर्मुख होण्यास प्रवृत्त करतो, या चित्रपटात साऊथचा सुपरस्टार विजय सेतुपती, अरविंद स्वामी, बॉलिवूड अभिनेत्री आदिती राव हैदरी, मराठीतील सुप्रसिद्ध अभिनेते सिद्धार्थ जाधव, महेश मांजरेकर, ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी, प्रियदर्शनी इंदलकर, वनिता खरात आदी दिग्गज कलाकारांच्या भूमिका असून हा चित्रपट मराठीसह ५ भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात आला आहे.

या पत्रकार परिषदेला अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, अभिनेते सचिन दानाई, डॉ. स्वप्नील देशमुख, आदित्य कुलकर्णी, अभिषेक बुचके, प्रथमेश जाधव, श्रीनिवास कुलकर्णी, प्रा.डॉ. विश्वास शेंबेकर, डॉ दुर्गा शर्मा, शिवशंकर पटवारी यांच्यासह कला व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

### अनोळखी मयताची ओळख पटवण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** लातूर शहरातील गंज गोलाई परिसरात एका ६० वर्षीय अनोळखी इसम बेवारस स्थितीमध्ये आढळून आला होता. उपचारासाठी त्याला लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तो मृत झाला. इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. सदरील इसमाविषयी कोणास काही माहिती असणाऱ्यांनी लातूरच्या गांधी चौक पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



सदर अनोळखी इसम उपचार चालू असताना मयत झाला. या मयताचे वय अंदाजे ६० वर्षे असून उसानंही १६७ सेमी. आहे. अंगाने सडपातळ असलेल्या या इसमाच्या अंगावर निळ्या रंगाचा शर्ट, भुरकट रंगाची पँट , कपाळावर जुन्या जखमेची व्रण आणि डावा हात कोपऱ्यातून कापलेला आहे. अशा वर्णनाचा इसम हरवल्याची तक्रार असल्यास अथवा त्याबाबत काही माहित असल्यास गांधी चौक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड , पोउपनि. एच. जी. सोनकांबळे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### पक्ष विरोधी काम केल्याने मुज्जमिल पटवेकर यांचे राष्ट्रवादीतून निलंबन

**चाकूर** : चाकूर तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष मुज्जमिल पटवेकर यांनी नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षविरोधी काम केल्यामुळे त्यांचे पक्षातून तात्काळ निलंबन करण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विरोधात मुज्जमिल पटवेकर यांनी काम केले असल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षश्रेष्ठीकडे दाखल केल्या होत्या. या तक्रारीची दखल घेऊन, सविस्तर चौकशी केली असता पटवेकर यांनी पक्षविरोधी काम केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे दि.११ फेब्रुवारी रोजी प्रसिद्धी पत्रक काढून त्यांचे चाकूर तालुका कार्याध्यक्ष पदावरून व पक्षातून निलंबन करण्यात आल्याचे पत्र राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेश बिरादार यांनी प्रसिद्ध केले आहे..

### दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या मुलींनी IEDSSA G-2 झोन कॅरम स्पर्धेत पटकावला द्वितीय क्रमांक

**लातूर/ :** IEDSSA महाराष्ट्र राज्यांतर्गत G-2 विभागीय कॅरम मुली स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. ग्रामीण टेक्निकल अँड म्यॅनेजमेंट कॅम्पस, नांदेड येथे दि. ०७ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या या स्पर्धेत डी.फार्मसी प्रथम व द्वितीय वर्षांच्या विद्यार्थिनी कु. भक्ती कुमठे, कु. समीक्षा कलशेट्टी, कु. ज्योती जगताप, कु. गायत्री शिंदे व कु. आशा नंदगावे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या यशाचे श्रेय क्रीडा शिक्षक श्री. ऋषी मस्के यांच्या मार्गदर्शनाला आहे.या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. ललितभाई शहा, रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच इतर मान्यवर पदाधिकाऱ्यांनी विजयी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्गानेही त्यांचा गौरव करून अभिनंदन व्यक्त केले.

### तीन तोळ्यांचे गंठण पळविले; उदगीर पोलीसांत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**उदगीर** : शहरातील मलकापूर येथील फिर्यादी महिला नांदेड रोडवरील बसवेश्वर कॉलनीत असलेल्या मंदिरात दर्शनासाठी गेली होती. तेव्हा एक अनोळखी व्यक्ती फिर्यादी जवळ येऊन बोलून विश्वासघात करून ३१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण घेऊन सोबतच्या व्यक्तीच्या दुचाकीवरून पळून गेला. या प्रकरणी उदगीर ग्रामीण पोलिसात सोमवारी (दि. ९) अनोळखी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत फिर्यादी लिलावती चंद्रकांत कोडे (रा. समर्थनगर नळेगाव रोड मलकापुर ता. उदगीर) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, फिर्यादी या शहरातील नांदेड रोडवरील बसवेश्वर कॉलनीतील श्री संत शिरोमणी मन्मथस्वामी मंदिरात गेल्या होत्या. तेव्हा तिथे एक अनोळखी व्यक्ती मंदिरामध्ये येऊन आजीच्या आत्म्यास शांती लागण्यासाठी मंदिरात पैसे दान करायचे आहेत असे म्हणून फिर्यादी महिलेला विश्वासात घेतला. फिर्यादी महिलेला बोलत फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याचे गंठण फसवणूक करून घेऊन सोबतच्या व्यक्तीच्या दुचाकीवर बसून तेथून निघून गेला. यावरून उदगीर ग्रामीण पोलिसात अनोळखी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल आहे..

### मन्मथ स्वामी विद्यालयात निरोप समारंभ

**शिरूर अनंतपाळ** : शिरूर अनंतपाळ येथील श्री मन्मथ स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांना नुकताच निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजकुमार माकणीकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यालयाचे प्रा. देवदत्त मुंढे, कुमार बंडे, राजकुमार चाकोते, बब्बुवान लादे, शिवहर खंडापुरे आदी उपस्थित होते. यावेळी परमेश्वर लिद्दड, भालेराव ममता, मयुरी लाळे, महेराबी पठाण, दुर्गादेवी कदम, जयेश शिंदे आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक सोमनाथ कांबळे यांनी केले तर सूत्रसंचालन सहशिक्षक सुरेंद्र स्वामी यांनी केले. यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक रामानंद स्वामी, श्रीशैल मठपती, बालिका किल्लारीकर, अकबर सुगावकर आदींनी प्रयत्न केले.

### किनगावात अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता

**किनगाव** : श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांच्या जयंतीनिमित्त किनगाव येथील महादेव मंदिरात आयोजित अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळ्याची शनिवारी संगनबसव शिवाचार्य महाराज यांच्या कीर्तनाने सांगता झाली. किनगाव येथे २४ ते ३१ जानेवारीदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. सप्ताहात शिभप आरतीताई बोरीकर, राजराजेश्र्वर स्वामी जांब गव्हाणकर, स्वातीताई तनशेटे, दयानंद महाराज देवर्जनकर, कैलास महाराज जांबकर, लक्ष्मण महाराज विभुते, सरस्वतीताई स्वामी, काशीनाथ शिवाचार्य महाराज यांचे कीर्तन झाले. सप्ताहात आचार्य गुरुराज स्वामी अहमदपूरकर यांचे आशीर्वचन झाले. यशस्वीतेसाठी वीरशैव लिंगायत समाज, ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. नीळकंठेश्वर बावगे यांच्या वतीने महाप्रसाद वितरण करण्यात आला.



# किल्लारीच्या निळकंठेश्वराने गाठला १२.५% साखर उतारा

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ११ फेब्रुवारी :** अनेक वर्षांच्या खंडानंतर पुन्हा नव्याने उभारण्यात आलेल्या किल्लारीच्या निळकंठेश्वर साखर कारखान्यातील आधुनिक यंत्रसामुग्रीला तांत्रीक नियोजनाची जोड घालून वापर करीत २ लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप केले व परिसरातील शेतकऱ्यांच्या ऊसाचे वेळेत गाळप करुन दिलासा दिला. याचबरोबर या हंगामात १२.५ साखर उताऱ्याला गवसणी घातली आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

बंद पडून भंगार अवस्थेत असलेला साखर कारखाना सुरु करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न करीत अनेक



अडचणींना मात करुन हा कारखाना पुन्हा कार्यान्वित करण्यात आला.अनेक वर्षापासून बंद अवस्थेत असलेला कारखाना सुरू करण्यासाठी आर्थिक, तांत्रिक तसेच प्रशासकीय अडथळे होते. मात्र केंद्र व राज्य सरकारच्या भरीव सहकार्यामुळे व मिळालेल्या पाठबळामुळे कारखान्याने नव्या दमाने वाटचाल सुरू केली. यंदाच्या गळीत हंगामात तीन लाख मेट्रिक टन गाळपाचे उदिष्ठ ठेवून यंत्रणा राबविण्यात येत आहे.आणि या वर्षी निळकंठेश्वर टप्पा पूर्ण करेल, असा विश्वास व्यवस्थापन मंडळाने व्यक्त केला आहे.

या हंगामात कारखान्याने १२.५ टक्के सरासरी साखर उतारा साध्य केला असून मिळालेले यश तांत्रिक नियोजन, आधुनिक यंत्रसामग्रीचा योग्य वापर, अनुभवी कर्मचारी वर्ग आणि शेतकऱ्यांच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे. ऊस तोडणी, वाहतूक आणि गाळप या सर्व प्रक्रिया काटेकोर नियोजनाने राबविण्यात आल्याने कोणताही अडथळा न येता गाळप वेळेत पूर्ण करण्यात आले.

या वर्षीच्या हंगामात कारखान्याने प्रति टन २७०० रुपये दराने पहिला हप्ता थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला आहे. वेळेवर मिळालेल्या या देयकामुळे अनेक ऊस उत्पादकांची आर्थिक कोंडी सुटली असून, कारखान्याच्या पारदर्शक व विश्वासार्ह कारभाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### आगामी काळात कार्यक्षमता वाढविण्यावर भर

आगामी काळात साखर उत्पादनासोबतच उपपदार्थ निर्मिती, आर्थिक शिस्त आणि कार्यक्षमता वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. सभासद शेतकऱ्यांचा विश्वास जपत कारखान्याची प्रगती अधिक वेगाने साधण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.



## जॅक मॉनो यांच्या संशोधनामुळे आण्विक जीवशास्त्र, जनुकशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकीय संशोधनाच्या क्षेत्रात क्रांतिकारक प्रगती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** दयानंद विज्ञान महाविद्यालयात सुप्रसिद्ध फ्रेंच आण्विक जीवशास्त्रज्ञ व जैवरसायनशास्त्रज्ञ जॅक मॉनोड यांच्या ११६ व्या जयंतीनिमित्त लुमिनार्या व्याख्यानमाला अंतर्गत विशेष सेमिनाराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात विभाग प्रमुख प्रा. अवंती बिडकर यांच्या हस्ते जॅक मॉनो यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यानंतर बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान प्रथम वर्षातील विद्यार्थि श्रीशैल्यम रावणगावे याने जॅक मॉनो यांच्या जीवनकार्यावर आधारित सविस्तर सादरीकरण केले.

सादरीकरणात जॅक मॉनो यांनी फ्राँस्वा जेकब यांच्यासह विकसित केलेल्या ऑपेरॉन संकल्पनेद्वारे जनुक अभिव्यक्तीचे नियमन कसे होते, हे प्रथमच स्पष्ट केल्याचे नमूद करण्यात आले. विशेषतः डीएनएआरएनएप्रथिन यांच्या



परस्परसंबंधांवर आधारित जनुक नियमन या संकल्पनेने आण्विक जीवशास्त्राला नवी दिशा दिली.

जॅक मॉनो यांच्या संशोधनामुळे जिवाणूंमध्ये एंझाइम निर्मिती, जैवरासायनिक अनुकूलन आणि कोशिकीय नियंत्रण प्रणाली यांचा शास्त्रीय आधार स्पष्ट झाला. त्यांच्या या मूलभूत संशोधनासाठी १९६५ साली त्यांना फ्राँस्वा जेकब आणि अँद्रे ल्वॉफ यांच्यासह नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जॅक मॉनो यांच्या संशोधनामुळे आण्विक जीवशास्त्र, जनुकशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकीय संशोधनाच्या क्षेत्रात क्रांतिकारक प्रगती झाली. त्यांच्या लिखाणातून वैज्ञानिक विचारसरणी, तर्कशुद्धता, शिस्त आणि संशोधनातील नैतिकता यांचे महत्त्व अधोरेखित होते.

या सेमिनारमुळे विद्यार्थ्यांमध्ये आण्विक जीवशास्त्र, जनुक नियमन, संशोधनवृत्ती व वैज्ञानिक विचारशक्ती विकसित होण्यास निश्चितच चालना मिळाली.

याप्रसंगी प्रा. डॉ. फिरदौस बिरादार, प्रा. ऋतुजा डिग्रसकर आणि प्रा. श्वेता मदने तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व पदवीपदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ११ फेब्रुवारी :** शहरातील रिंगरोड लगत असलेल्या शेतातील चिंचेच्या झाडाला एका व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. मलकापूर भागातील क्रांतीनगर येथील रहिवासी असलेले मयत सकाळी येथील बायपास रिंगरोडच्या मोहसीन अफजलखान पठाण (वय ३९) याने सोनवणे यांचे शेतामध्ये चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अमीर अफजल पठाण यांनी उदगीर ग्रामीण पोलिसात दिलेल्या माहितीवरून अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार तुडमे करीत आहेत.

## सरस्वती महाविद्यालयात संगीत अभ्यास मंडळाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील संगीत विभागाच्या वतीने संगीत अभ्यास मंडळाचे उद्घाटन भोपाळ येथील सुप्रसिद्ध ध्रुपद गायक उस्ताद अफजल हुसैन साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालमणी डॉ.राम बोरगावकर, उद्घाटक भोपाळ येथील सुप्रसिद्ध ध्रुपद गायक उस्ताद अफजल हुसैन साहेब, प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध मृदंग वादक श्री. गोपाळ जाधव, प्रभारी प्राचार्य डॉ पांडुरंग गोरे,संगीत विभाग प्रमुख प्रा.अमोल जाधव उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगीत विभाग प्रमुख प्रा.अमोल जाधव यांनी केले. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून भोपाळ येथील सुप्रसिद्ध ध्रुपद गायक उस्ताद अफजल हुसैन साहेब यांच्या शुभहस्ते संगीत अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात संगीत विभागातील सर्व सदस्यांना शुभेच्छा देऊन वर्षभरातील संगीत विभागातील कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये अभ्यास मंडळाचा सहभाग व त्याचे कार्य यावर विस्तृत असे भाष्य केले.


या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ. राम बोरगावकर म्हणाले की , महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक आणि सार्वभौमिक दृष्टिकोन निर्माण करण्याचे कार्य अभ्यास मंडळाच्या माध्यमातून व्हावे, विद्यार्थ्यांमध्ये बहुआयामी नेतृत्व गुण तयार व्हावे तसेच अभ्यास मंडळाच्या माध्यमातून वेगवेगळ्या संगीत स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात असे मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीमंत दोरवे यांनी केले तर उपस्थितांचे आभार संगीत विभागातील प्रा.अमोल जाधव यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंधोरी जी.प.पराजित उमेदवाराने केला विजयी प्रतिनिधी चा सत्कार | आदर्श सुसंस्कृत परंपरेचा राखला सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ११ फेब्रुवारी :** अहमदपूर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक चे निकाल जाहिर झाले ग्रामीण भागातील मिनी मंत्रालयाची हि निवडणूक चुरशीत झाली जय_पराजयाने अनेक आनंद व दुःख व्यक्त करत असताना जिल्हा परिषद गट अंधोरी (ता. अहमदपूर ) येथील पराजित शिवसेना उमेदवार श्री सचिन शिवाजीराव भिकाने यांनी त्यांच्या संतांची भूमी असलेल्या ढाळेगाव चा व आपल्या माता _पित्याच्या आदर्शाचा सन्मान करत निवडणुकीनंतर लोकशाही मूल्य जपणारे व ईतरांना प्रेरणादायी ठरावे काम केले. त्यांचे प्रतिस्पर्धी महायुतीचे विजयी उमेदवार श्री प्रफुलचंद्र गुंडरे यांचा घरी जात त्यांची सदिच्छा भेट घेऊन शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून सत्कार केला व पुढील वाटचालीस



शुभेच्छा दिल्या.

या विषयी त्यांचे वडील व ओबीसी जेस्ट नेते श्री शिवाजीराव भिकाने जे प्रधानमंत्री मोदींना राजकीय आदर्श मानतात त्यांनी सांगितले जय-पराजय स्वीकारून परस्पर सन्मान राखने आवश्यक आहे राजकारण तर चालत राहते. सचिन भिकाने स्वाभिमानाने लढला जनतेने दिलेला कौल मान्य करत त्याचे हे काम हा अंधोरी सर्कलसाठीच नव्हे तर सर्वा साठीप्रेरणादायी ठराव. या प्रसंगी सतीश तुपकर, व्यंकट हळकर, बापूराव सारोळे, राजूभाऊ कांडणगिरे, व्यंकट कुंटे, गोपाळराव कांबळे, विश्वंभर माने, दत्ताभाऊ राचमाळे, धनंजय राचमाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या संदर्भात अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिल्हा शाखा लातूरच्या वतीने प्रतिक्रिया देताना जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील व लातूरच्या सर्व पदाधिकारी, सदस्यांच्या वतीने सचिन भिकाणे यांच्या आदर्शवत भूमिकेबद्दल अभिनंदन करण्यात आले.

# शिक्षक व शिक्षण महर्षी कर्मयोगी दीपस्तंभ : डी.बी.लोहारे गुरुजी

शिक्षण महर्षी, दलित मित्र, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक, शिस्तप्रिय प्रशासक, उत्तम शेतकरी, आदर्श संस्थाचालक असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले अहमदपूर पॅटर्नचे जनक डी.बी. लोहारे गुरुजी यांचा आज ९२ वा वाढदिवस.

डी.बी.लोहारे गुरुजी यांचा जन्म १२ फेब्रुवारी १९३४ साली अहमदपुर तालुक्यातील मुळकी उमरगा या गावी झाला. अगदी लहानपणीच वडिलांचे छत्र हरवले, ग्रामीण भागात शिक्षणाची काहीच सोय नव्हती. आई स्वतः निरक्षर पण, आपल्या मुलानी खूप शिकावं ही प्रचंड इच्छाशक्ती होती म्हणून पाचवी च्या पुढील शिक्षणासाठी अंधोरी, अहमदपुर, अंबाजोगाई, नांदेड या ठिकाणी पाहुण्यांच्या मदतीने वसतिगृहात राहून शिक्षण पूर्ण केले. विद्यार्थी जीवनातच स्वातंत्र सेनानी गोविंद भाई श्राफ, स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे यांची भाषणे ऐकून त्यांच्या विचाराचा प्रभाव गुरुजीवर पडला, आपण शिकलो पण आपल्या गावातील, परिसरातील मुलांना शिक्षणाची सोय नाही ही व्यथा मनाला खात होती. याच प्रेरणेतून नांदेड येथे नोकरीला असतानाच वयाच्या २८ व्या वर्षी स्वामी रामानंद तीर्थ यांना विनंती करून १९६२ साली आपल्या मूळ गावी मुळकी उमरगा येथे पहिली शाळा काढून ज्ञानगंगेचे तोरण बांधले. पुढे अध्यात्मिक गुरु राष्ट्रसंत वसुंधरा रत्न डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज, माजी आमदार कै. महालिंगाप्पा सांगवीकर,कै. शिवराज आप्पा चवंडा, डॉ. मनोहरराव रेड्डी, अँड.कृष्णराव देशमुख यांच्या सहकार्याने कुमठा, रोकडा सावरगाव, अहमदपूर, धनेगाव, कबन सांगवी, धामणगाव,येस्तार, मुरढव अशा ग्रामीण भागात शाळा व सोबतच विद्यार्थ्यांना निवास व उत्तम भोजनाची व्यवस्था व्हावी यासाठी वस्तीगगृह काढून शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांना मोफत शिक्षणाची दारे खुली केली.



चांगल्या विचारांचे, चांगल्या व्यक्तीचे व चांगल्या वातावरणाचे सानिध्य मिळाले की जीवनात स्वतःहून काहीतरी प्रचंड ओढ, त्यासाठीची प्रबळ इच्छाशक्ती, स्वतःमधील आत्मविश्र्वास दाखवण्याचा जोश व नकारात्मक भाव संपवून सकारात्मक विचार करण्याची जिद्द लहानपणापासूनच गुरुजींच्या मध्ये होती. यामुळे मनात कुठलाही न्यनगंड न बाळगता सामर्थ्यानिशी, न थांबता न थकता कार्य करण्याची सवय याच काळात लागली.

थोर तपस्वी, त्यागी राष्ट्रसंत परमपूज्य डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराजांचे प्रबळ असे अध्यात्मिक अधिष्ठान संस्थेला लाभले. ईश्र्वरावर अठळ श्रद्धा ठेवून, मानवता धर्माची पूजा केली. आपल्याजवळ असेल ते दुसऱ्याला द्यावे दुसऱ्यांचे अश्रू थांबवावे त्याला हसवावे, सुखवावे हे साधे तत्वज्ञान स्वीकार करून गुरुजींनी कार्य केले. याच कार्यकर्तत्वातुन अहमदपूर पॅटर्न निर्माण झाला.

गुरुजीनी शाळेतील वस्तीगृहातील विद्यार्थ्यासाठी व संपूर्ण संस्थेतील शिक्षकासाठी योगासने, योगा शिबिर, खादी गणवेश, संस्काराचे शिक्षण, सूचना पेटी, आदर्श पाठ, संस्था अंतर्गत तपासणी, माता-पिता आधार योजना, मान्यवरांच्या भेटी, मुल्यशिक्षणाची धडे, व्यसनमुक्ती कार्यक्रम, असे अनेक उपक्रम स्वतः शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक म्हणून राबवले. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव गुरुजींच्या विचारातून व कार्य पद्धतीतून दिसून येतो. आधी केले मग सांगितले. या उक्तीप्रमाणे गेली ६५ वर्षापासून स्वतः खादी वापरतात व सर्वांना खादी वापरण्यास सांगतात. गांधीजींच्या खेड्याकडे चला या संदेशात प्रमाणे गुरुजींचे लक्ष नेहमी खेड्यातील शाळा व विद्यार्थी यांच्याकडे असते.

संस्था ही कुटुंब समजून कुटुंब प्रमुखाची जबाबदारी गुरुजी पार पाडत आहेत प्रत्येक कर्मचारी हा माझ्या कुटुंबाचा अंश आहे. असे समजून सर्वासाठी समानतेची वागणूक ते देत असतात. गुरुजींच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत ,- १९८९ राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार- १९९५ राज्य शासनाचा दलित मित्र पुरस्कार- २००२ टागोर शिक्षण संस्थेला आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार- २०१२ एम.आय. टी. चा शिक्षण रत्न पुरस्कार- २०१५ जन्मगावी मुळकी भूषण पुरस्कार- २०१८ साली वसंतराव काळे प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार.. राष्ट्रभाषा सभा पुणे, भारत स्काऊट गाईड, खादी ग्रामोद्योग मंडळ नांदेड, मराठवाडा जनता विकास परिषद, सिद्धेश्र्वर सहकारी बँक, लातूर रोटरी क्लब अहमदपूर या कमिटी वर कार्यरत आहेत. साप्ताहिक सेवाभाव चे संपादक म्हणून काम पाहिलेले आहेत.

गुरुजींनी आपल्या आयुष्यात नेहमी मानवतावादाची भूमिका चोख बजावली आहे जगत कल्याणाची प्रार्थना करत *जयजगत्* हा भाव मनात जोपासला आहे. संताचा विचार व सत्तसंघामुळे माणसाचे आयुष्य फुलत जाते. त्याप्रमाणे महान विभूती च्या सानिध्यात लोहारे गुरुजींचे पर्यायाने संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांचे आयुष्य फुलत जात आहे.

गुरुजींच्या अर्धांगिनी सौ. पुष्पाताई या मितभाषी असून गुरुजींना त्यांची खंबीर साथ आहे. सरांच्या प्रत्येक शैक्षणिक व सामाजिक कार्याला त्यांची खंबीर साथ आहे. गुरुजींच्या प्रकृतीची काळजी घेणे, त्यांचा आहार, दिनचर्या यांची काळजी घेणे व शैक्षणिक कार्यात कुठलीच तक्रार न करता गुरुजींच्या खांद्याला खांदा लावून साथ देणे हीसुद्धा गुरुजींच्या जीवनाचा महत्त्वपूर्ण भाग आहे.

आज गुरुजींच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त गुरुजींना उदंड व निरोगी आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना

**-शिवाजी सूर्यवंशी**
**यशवंत विद्यालय अहमदपूर**

## शेतकऱ्यांसाठी सुवर्णकाळ नाही तर विषकाळ आहे : खा.रजनीताई पाटील



केज दि ९(प्रतिनिधी) : अन्नदाता शेतकरी कायम उपेक्षित राहिला आहे. सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी देशात शेतकऱ्यांसाठी सुवर्णकाळ नाही तर विष काळ आहे.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतनाचा विषय आहे. कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतनाचा विषय आहे. ओला दुष्काळ, अतिवृष्टी नापिकी या दुष्टचक्रात शेतकरी अडकला आहे. यामुळे मुलांचे शिक्षण,मुलींचे लग्न यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. बँकांचे कर्ज फेडणे यामुळे तो हातबल होत आहे. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आत्महत्येला कवटाळावे लागत आहे. ही चिंताजनक बाब आहे. कोट्यवधी रुपयांचे कर्ज बुडून उद्योजक देश सोडून पळून जातात पण शेतकऱ्यांचा मात्र बँका छळ करताहेत शेतकऱ्यांना तात्काळ भरीव मदत करावी अशा शब्दात खा.रजनीताई पाटील यांनी राज्यसभेत सरकारवर निशाणा साधला.

## वेठबिगारी निर्मुलन क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्याबद्दल बीड चे कामगार अधिकारी कोणाळे सन्मानित



बीड पृतिनिधी : महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण मुंबई आणि आंतरराष्ट्रीय न्याय अभियान. Ljm यांच्या संयुक्त विद्यमाने दि 8 रोजी छत्रपती संभाजी नगर येथे एक परीषद आयोजित करण्यात आली होती या परीषदेत राज्यांमधून वेठबिगार निर्मूलन क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या तिन कामगार अधिकारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला त्या मध्ये बीड येथील सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोणाळे यांचा सत्कार पुष्पगुच्छ प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच धाराशिव येथील सरकारी कामगार अधिकारी तात्याराव कराड व परभणीचे सरकारी कामगार अधिकारी संदीप हार मळकर यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या कार्यक्रमांचे अध्यक्ष मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश रविंद्रजी घुगे होते कोणाळे यांचें सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे .

## हरवलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध : बीड शहर पोलिसांची तत्पर कामगिरी

बीड : बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील एका अल्पवयीन मुलीचा तिच्या क्लासेसमधून निघून गेल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या घटनेची गंभीर दखल घेत बीड शहर पोलिसांनी तात्काळ शोध मोहीम राबवली. पोलिसांनी केलेल्या जलद व प्रभावी तपासामुळे सदर अल्पवयीन मुलीचा सुरक्षित शोध घेण्यात आला असून, तिला सुखरूपपणे तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तपासादरम्यान असे निदर्शनास आले की, काही अल्पवयीन मुली सोशल मीडियाच्या माध्यमातून अनोळखी व्यक्तींशी संपर्कात येत असून, याच माध्यमातून फूस लावून पळवून नेण्याचे प्रकार घडण्याची शक्यता आहे.

**पोलिसांचे आवाहन :** पालकांनी आपल्या मुली कोणाच्या संपर्कात आहेत याकडे लक्ष द्यावे, मुलींशी संवाद ठेवून त्यांना विश्वासात घ्यावे, संशयास्पद चॅटिंग अथवा वर्तन आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, शाळा, कॉलेज व क्लासेसच्या संचालकांनी व शिक्षकांनीही सतर्क राहावे, वेळीच माहिती दिल्यास संभाव्य अनुचित घटना टाळता येतात तसेच प्रतिबंधात्मक पोलिस कारवाई करणे शक्य होते.गैरवर्तन करणाऱ्या व समाजविघातक प्रवृत्तीच्या मुलांवर पोलीस कारवाई सुरू असून, या कामात पालक, शिक्षक व समाजाची सजगता अत्यंत आवश्यक आहे.

## गुरुवार दि. 12 फेब्रुवारी रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक

बीड, दि. 11 : गुरुवार दि. 12 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क,क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक तथा बीड जिल्हयाच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीव्दारे बैठकीचे आयोजन केले आहे. संबधित अधिका-यांनी वेळेवर या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव विवेक जॉन्सन यांनी केले आहे. यानंतर लगेचच 1.45 वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्याची सन 2026-2027 नियोजन आराखडा बैठक होणार आहे.

## महिलांच्या खुल्या गीत गायन कराओके स्पर्धेचे बीडमध्ये आयोजन

बीड : बीड शहरातील कलाकार ग्रुप यांच्या वतीने महिलांसाठी खुल्या गीत गायन कराओके स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दिनांक 14 फेब्रुवारी 2026 रोजी बाबासाहेब आंबेडकर भवन, हॉल, नगर रोड, बीड येथे दुपारी 12.00 ते सायं. 5.00 या वेळेत संपन्न होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक रोख पारितोषिके व सन्मानचिन्हे देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक: रु. 5000/- व सन्मानचिन्ह (आर्यन ट्रेडर्सचे प्रो. प्रा. अमोल बागलाने यांच्या वतीने),द्वितीय पारितोषिक: रु. 3000/- व सन्मानचिन्ह (रोख, अथर उर्फ बब्बु यांच्या वतीने), तृतीय पारितोषिक: रु. 2000/- व सन्मानचिन्ह (श्री. बबनराव वडमारे यांच्या वतीने) उत्तेजनार्थ पारितोषिके: प्रत्येकी रु. 1000/- व सन्मानचिन्ह (एकूण 3 पारितोषिके) आहेत.





कडा येथील अमोल जैन विद्या प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेच्या शतक महोत्सवा निमित्त जैन साधु प्रबुद्ध विचारक प.पू.श्री आदर्शऋषीजी महाराज यांचे कडा येथे आगमन झाले होते त्यांचे स्वागत भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख केले व आशीर्वाद घेतले

# सर्वांगीण विकासात जबाबदारीने काम करू - नगराध्यक्षा गिताभाभी पवार

### गेवराई नगर परिषदेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या उत्साहात पार पडली

गेवराई दि. 10 : वार्ताहर : गेवराई नगर परिषदेची पहिली सर्व साधारण सभा मंगळवार ता. 10 रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेत एकुण 28 विषयावर चर्चा झाली. दरम्यान, गेवराई शहराच्या सर्वांगीण विकासात आपण सर्वजण सामुहिकपणे योगदान देऊ, असे प्रतिपादन नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गिताभाभी बाळराजे पवार यांनी केले आहे. नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी सभेतील विषयावर सविस्तर चर्चा केली.

यावेळी स्व. एकनाथराव लाड यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून, श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नपचे बांधकाम सभापती तथा गटनेते ॲड. राजेंद्र राक्षसभूवनकर यांनी शोक प्रस्ताव मांडला.

मंगळवार ता. 10 फेब्रुवारी रोजी दु. एक वाजता गेवराई नगर परिषदेची पहिली सर्व साधारण सभा पार पडली. व्यासपीठावर नवनिर्वाचित अध्यक्षा गिताभाभी पवार , गटनेते राजेंद्र राक्षसभूवनकर, उपनगराध्यक्ष रेवतीताई घुंबार्डे, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांची उपस्थिती होती.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते शेख खाजाभाई यांनी सभागृहात मांडलेल्या विषयावर चर्चा करून बैठकीत सहभाग घेतला. गेवराई शहरातील विविध विकासात्मक विषयावर चर्चा करण्यात आली असून, अत्यावश्यक ठिकाणी इंधन विहिर, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर कामे करण्याची कार्यवाही, साहित्य खरेदी संदर्भात आवश्यक ती मंजुरी देण्यात आली आहे.दरम्यान, नगर परिषदेच्या माध्यमातून शहरात विकास करून, एक जबाबदारी पार पाडण्यासाठी सर्व साधारण बैठकीची गरज असते. अशा बैठकीत नवे, जूने विषय महत्त्वाचे असतात. नगरसेवक, नगरसेविका, उपाध्यक्ष, गटनेते, मुख्याधिकारी आणि नगराध्यक्षा म्हणून माझ्यावर जी जबाबदारी सोपविण्यात येईल, त्या दृष्टीकोनातून काम करू आणि शहराच्या सर्वांगीण विकासात योगदान देऊ, असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ. पवार यांनी यावेळी बोलताना केले आहे. नपचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी प्रास्ताविक करून, पहिल्या सर्व साधारण सभेसाठी उपस्थित सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे स्वागत केले. आभार, सभागृहाचे गटनेते ॲड. राजेंद्र राक्षसभुवनकर यांनी मानले. सर्व साधारण बैठक पार पडल्यानंतर नवनिर्वाचित सभापती, उप सभापतींचा सत्कार समारंभ पार पडला. बैठकीस सर्व नगरसेवक, कर्मचारीवर्गाची उपस्थिती होती.

## इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे




युसूफवडगांव/प्रतिनिधी:- केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात साजरे करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती वैद्यकीय अधिकारी डॉ केवश सारूक,श्री.नागरगोजे साहेब गटविकास अधिकारी केज,प्राचार्य हनुमंत सौदागर,उमाकांत भुसारी,डॉ.शिवाजी मस्के,श्री. राजाभाऊ खरबड,तर प्रमुख उपस्थिती म्हणुन सरपंच सुरेश नांदे,सरपंच,श्री.युवराज ढोबळे, सरपंच अंगद इंगळे,सरपंच विश्वास शिनगारे,सरपंच रूस्तूम चौधरी,श्री. राजाभाऊ यादव,श्री.अरूण राऊत संचालक कृ.उ.बा.स.केज युवानेते किरण सातपुते,उपसरपंच,श्री.गणेश नांदे,सरपंच श्री.प्रविण पवार तसेच ग्रा.प.सदस्य श्री.आशोक चापण, काशीनाथ खरबड,प्रविण वैरागे, दादा निकम, विजयकुमार राऊत, सिद्धेश्वर डोंगरे हे उपस्थिती होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीचे व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी गणेश वंदना करून कार्यक्रमाची सुरुवात केले. यानंतर चिमुकल्यांनी 'देवा मला शाळेत जायचं हाय' व 'मेरा वाला डान्स' All is well ओम शांती ओम 'हवा हवा ए हवा,चिंताता चिता,न सांगताच आज हे कळे मला'चाकर शिवबाच होणार"गाडी घुंगराची'बायकोने उपवास केला अशा उपहासात्मक गाण्यावर नृत्य सादर केले तर काही विद्यार्थ्यांनी 'बुर्गुंडा होईल' हे भारूड सादर करून लोककलेतून समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बापुसाहेब भुसारी,विकास जाधव,महादेव सौंदणे,रमेश सौंदणे,लक्ष्मण दोडके,शिवराज स्वामी,शिवदास खरबड,ओम खरबड,पंकज माने,रत्नलिंग लोखंडे,संदिप जोशी,आनिल निकम,बाळासाहेब सपकाळ आदिंनी प्रयत्न केले.

## राष्ट्रनिर्माणासाठी बहुमूल्य योगदान देणारे स्व पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त माजलगाव भाजपाच्या वतीने अभिवादन



माजलगांव भारतीय जनता पार्टीच्या वतीने "समर्पण दिन" निमित्त व स्व. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले. या प्रसंगी पंडित दीनदयालजी उपाध्याय यांच्या आठवणीला उजळा देत व त्यांनी केलेल्या कार्याची मांडणी करताना भाजपा शहर सरचिटणीस पवन मोगरेकर म्हणाले अखंड मानवतावादाची विचारसरणी आणि अंत्योदयाची संकल्पना मांडणारे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अविरतपणे समर्पण भावनेने केलेल्या कार्याची माहिती आपल्या मनोगतातून सांगितली. ते याप्रसंगी म्हणाले एकात्म मानव दर्शन या संकल्पनेतून त्यांनी समाज ,राष्ट्र आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारा विचार देशासमोर मांडला. राजकारण हे सत्तेसाठी नसून सेवेचे माध्यम असावे , समाजातील शेवटच्या घटका चा विकास हाच खरा विकास आहे हा त्यांचा मूलमंत्र होता, त्यांचे विचार साधे जीवन आणि प्रखर राष्ट्रनिष्ठा आजही आपल्या सर्वांना प्रेरणा देतात .

या कार्यक्रमाला भाजपाचे ज्येष्ठ नेते

ज्ञानेश्वर मेंडके , कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा सभापती श्री नितीन नाईकनवरे मा नगराध्यक्ष दीपक मुंडे , भाजप नेते प्रताप रांजवण , माजलगाव शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी, भाजप पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके , अभय होके पाटील, श्री शरदराव कचरे , भाजपा सरचिटणीस कैलास खुरपे,भाजपा उपाध्यक्ष बाळासाहेब क्षिररसागर , भाजपा उपाध्यक्ष श्री कल्याण शेप , भाजपा चिटणीस विनोद लड्डा, भाजपा उपाध्यक्ष रामेश्वर चव्हाण , भाजपा विस्तारक रमेश शेंडगे, भाजपा चिटणीस श्री संतोष जाधव , भाजपा शहर चिटणीस श्री सुभाष कांबळे , शहरचिटणीस श्री मनोज कोरडे, भाजपा सरचिटणीस पवनजी मोगरेकर, नारायणराव मेंडके , युवा नेते श्री संतोषराव सोळंके ,रवी गायकवाड,, ओंकार गिरी गोविंद जांगिड , श्री बबलू राऊत ,किशोर विभुते यांच्यासह शक्ती प्रमुख बूथ प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## बीड पोलीस भरतीदरम्यान २६ वर्षीय उमेदवाराचा दुर्दैवी मृत्यू

### १६०० मीटर धाव पूर्ण केल्यानंतर प्रकृती खालावली



बीड: बीड जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई पदांच्या भरती प्रक्रियेला आजपासून सुरुवात झाली असतानाच, एका उमेदवाराचा प्रशिक्षणादरम्यान मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. परळी तालुक्यातील मांडखेल येथील २६ वर्षीय दिपक भास्कर वाव्हळे या तरुणाला १६०० मीटर धावण्याची चाचणी पूर्ण केल्यानंतर अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

नेमका घटनाक्रम: पोलीस मुख्यालयातील मैदानावर आज एकूण ८०० उमेदवारांपैकी ६१८ उमेदवार हजर झाले होते. या प्रक्रियेदरम्यान दुपारी १२:५५ वाजता दिपक वाव्हळे यांनी १६०० मीटर धावण्याची चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली. धाव पूर्ण झाल्यावर ते विश्रांती घेऊन फिनिशिंग पॉईंटजवळील मेडिकल रूमकडे चालत जात असताना त्यांना त्रास जाणवू लागला. तिथे उपस्थित असलेल्या वैद्यकीय पथकाने त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले, मात्र त्यांची नाडी (Pulse) कमी लागत असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले.

त्यानंतर तत्काळ रुग्णवाहिका बोलावून दुपारी १:१४ वाजता त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या सर्व घटनेचे चित्रीकरण मैदानावर लावलेल्या सीसीटीव्ही (CCTV) कॅमेऱ्यांमध्ये कैद झाले आहे.

प्रशासनाकडून स्पष्टीकरण आणि आवाहन: या घटनेबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत दिपक वाव्हळे यांच्या मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून भरतीसाठी येणाऱ्या इतर उमेदवारांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. "मैदानी चाचणीसाठी येणाऱ्या उमेदवारांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, पुरेसा आहार घ्यावा आणि शरीरात पाण्याचे प्रमाण कमी होणार नाही (Hydration) याची दक्षता घ्यावी," असे आवाहन त्यांनी केले आहे. ही एक दुर्दैवी घटना वगळता आजची उर्वरित भरती प्रक्रिया शांततेत पार पडली.

## राजर्षी शाहू कन्या विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थिनींचा निरोप समारंभ

बीड (प्रतिनिधी):श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ, बीड संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय आणि राजमाता इंग्लिश स्कूल, तेलगाव रोड यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता दहावीतील विद्यार्थिनींचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके होते. तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. डी. कदम, मुख्याध्यापक आर. टी. राऊत आणि प्राचार्या श्रीमती आर. डी. लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दहावीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागत गीताने करण्यात आली. दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना अध्यक्ष प्रा. जे. पी. शेळके यांनी सांगितले की, "तुम्ही उद्याच्या युवा पिढीचे भविष्य आहात. दहावीची परीक्षा ही तुमच्या आयुष्यातील पहिली महत्त्वाची पायरी आहे. येथून पुढील शैक्षणिक प्रवास यशस्वीपणे पार पाडा," असा विश्वास व्यक्त करून त्यांनी विद्यार्थिनींना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.


विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. डी. कदम यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले की, "आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मन लावून अभ्यास करा व आत्मविश्वासाने परीक्षा द्या," असे आवाहन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख एस. सी. जगताप व के. बी. सोंडगे यांनी विद्यार्थिनींना परीक्षेसंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी वेळेचे योग्य नियोजन, नियमित अभ्यास व आत्मविश्वास या त्रिसूत्रीच्या आधारे परीक्षा दिल्यास निश्चित यश मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच विद्यार्थिनींनी सकारात्मक विचार ठेवून निर्धाराने पुढील शैक्षणिक वाटचाल करावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनुष्का जाधव हिने केले, तर आभार प्रदर्शन कु. शुभांगी कोरडे हिने केले.

### कला दर्पण महोत्सवाच्या माध्यमातून डॉ.इंगोले यांनी डॉक्टरांना सशक्त सांस्कृतिक मंच दिला - राज्याध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी

# आनंदी राहण्यासाठी अंगामध्ये कला असणे आवश्यक - डॉ.राजेश इंगोले

### अंबाजोगाईत कला दर्पण महोत्सव जल्लोषात साजरा, डॉ.राजेश इंगोले हे अष्टपैलू व्यक्तिमत्व - राजकिशोर मोदी



तभा वृत्तसेवा

अंबाजोगाई : इंडियन मेडिकल असोसिएशनच्या कला दर्पण २०२५-२६ मधील राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धांचे पारितोषिक वितरण कार्यक्रम अंबाजोगाई येथील परिचय हॉल येथे नुकताच संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले हे होते. तर उद्घाटक म्हणून अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांची उपस्थिती होती. यावेळी या संस्कृतिक मंचावर इंडियन मेडिकल असोसिएशनचे भूतपूर्व अध्यक्ष डॉ.रवींद्र कुटे, अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, स्वारातीचे अधिष्ठाता डॉ.अरविंद बगाटे, नेतृत्व विभागाचे प्रमुख ज्ञानोबा दराडे, समितीच्या उपाध्यक्ष डॉ.पल्लवी दोडके, महाराष्ट्राच्या सहसचिव गितांजली शर्मा, स्थानिक शाखेचे उपाध्यक्ष डॉ.विजय लाड, सचिव डॉ.उद्धव शिंदे, कोषाध्यक्ष डॉ.बळीराम मुंडे, महिला विभाग अध्यक्ष डॉ.मनीषा राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ.रामकृष्ण लोंढे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या स्वागत समारंभाने झाली. आपल्या उद्घाटकीय भाषणात बोलताना राजकिशोर मोदी यांनी इंडियन मेडिकल असोसिएशनचा हा कला दर्पण कला महोत्सव अंबाजोगाई येथे होत आहे. या गोष्टीचा अत्यंत आनंद आहे. त्याबद्दल संघटनेचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांचे मी आभार व्यक्त करतो. आयएमएच्या कला दर्पण महोत्सवामुळे महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून पुस्तकांचे गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या आमच्या अंबाजोगाई मध्ये सर्व डॉक्टर्स कलाकार मंडळी आली. त्यांचा हा राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ सोहळा येथे आयोजित करणाऱ्या सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्ष असणारे आमचे सहकारी डॉ.राजेश इंगोले यांनी हा योग घडवून आणला त्याबद्दल त्यांचेही मी आभार व्यक्त करतो. डॉक्टर हा सुद्धा एक माणूस असतो. त्यालाही त्याचे जीवन असते. त्याच्या मध्येही एक कलाकार लपलेला असतो. परंतु, या धकाधकीच्या जीवनामध्ये आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळत असताना त्याला नाईलाजाने आपल्या सुप्त गुणांना दाबून ठेवावे लागते. याचं कारण म्हणजे डॉक्टरांसाठी असा वेगळा सांस्कृतिक कला महोत्सव नव्हता. परंतु, डॉ.राजेश इंगोले यांनी दूरदृष्टीपणाने गेल्या तीन वर्षांपासून सातत्यपूर्ण रितीने इंडियन मेडिकल असोसिएशनचा कला दर्पण हा सशक्त सांस्कृतिक कला मंच महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्संना उपलब्ध करून दिला आणि त्याचे फळ म्हणून आज एवढ्या प्रचंड संख्येने महाराष्ट्रातील डॉक्टर्स मंडळी आपल्या विविध कला येथे सादर करीत आहेत. आणि आपल्या जीवनाचा आनंद घेत आहेत. मला वाटतं एखाद्या कार्यक्रमाचे यश हे त्या माणसाने केलेल्या मेहनतीचे फळ असतं आणि डॉ.इंगोले हे त्यांना मिळालेल्या प्रत्येक पदाचा उपयोग संपूर्ण ताकदीने करतात. याचा अनुभव अंबाजोगाईकरांनी ते शिक्षण सभापती असताना घेतलेला आहे.

परंतु, महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्संनी आता अनुभव घेतलेला आहे. अत्यंत प्रभावी आणि नियोजनबद्धरित्या हा कार्यक्रम त्यांनी अंबाजोगाई येथे घडवून आणला व डॉक्टरांच्या सुप्त गुणांना हे सशक्त सांस्कृतिक कला मंच उपलब्ध करून दिले आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक महाराष्ट्रभरातील डॉक्टर बांधव करीत आहेत आणि अंबाजोगाई चे नांव महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात पोहचविण्याचे काम डॉ.इंगोले यांनी केले आहे व ते आमचे सहकारी आहेत. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे असे गौरवोद्गार राजकिशोर मोदी यांनी यावेळी काढले.

माजी अध्यक्ष डॉ.रवींद्र कुंटे यांनी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांच्यातील अष्टपैलू व्यक्तिमत्व पाहून माझ्या काळात सर्वप्रथम मी त्यांना सांस्कृतिक समितीचा राज्याध्यक्ष म्हणून नियुक्ती दिली. त्याच वर्षी त्यांनी चिपळूण येथे अत्यंत दर्जेदार व बहारदार असा सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणला त्याच वेळी आम्हाला कळलं की, या पदासाठी आम्ही योग्य व्यक्ती योग्य वेळी निवडला आहे आणि आज आपण त्याचे फलित पाहत आहोत. की, महाराष्ट्र मधून डॉक्टर्स या इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक स्पर्धांची वाट पाहत आहेत आणि प्रचंड संख्येने यामध्ये सहभागी होत आहेत मला वाटतं एखादा माणूस एखाद्या पदाला वलय कसं प्राप्त करून देतो व त्या पदाचा उपयोग त्या संघटनेत काम करीत असणाऱ्या माणसांसाठी कसा करून देतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले हे आहेत.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नूतनच्या बुलबुल पथकाचा जिल्हास्तरीय मेळाव्यात यश

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.११ फेब्रुवारी -**

भारत स्काउट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालय, तसेच नरेंद्र आर्य हायस्कूल, अपसिंगा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय कब-बुलबुल, स्काऊट-गाईड मेळाव्यामध्ये नूतन प्राथमिक विद्यामंदिर, धाराशिवच्या बुलबुल पथकाने यश संपादन केले.

या मेळाव्यातील चारही स्पर्धा विभागांमध्ये शाळेच्या विद्यार्थिनींनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाने व शिस्तबद्ध सहभागाने उपस्थित मान्यवरांची मने जिंकली व शाळेचा नावलौकिक उंचावला.



या यशामागे मार्गदर्शिका उमरकर यांचे कुशल मार्गदर्शन, सातत्यपूर्ण प्रयत्न व परिश्रम मोलाचे ठरले. विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### नगरपरिषद शाळेत बजाज गोड लोनतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

**तुळजापूर, दि.११ फेब्रुवारी -**

येथील बजाज गोल्ड लोन नळदुर्ग रोड च्या वतीने नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ तुळजापूर येथे इयत्ता २ तील सर्व विद्यार्थ्यांना २५ स्कूल बॅग वाटप करण्यात आले .यावेळी बजाज गोल्ड लोन फायनानचे बी.एम. अरविंद पवार व आर.एम. अनुप नाईकवाडी आर. एम. अंबिका कुंचपकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक गणेश रोचकरी, महेंद्र पाटील, महेंद्र कावरे, केरण लोहारे, विद्यादेवी स्वामी, उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल बजाज गोल्ड लोन फायनान्सचे कौतुक होत आहे. या पुढील काळातही आपण गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वेळोवेळी सहकार्य करू अशी भावना आरएम अनुप नाईकवाडी यांनी व्यक्त केले.

### कृषीतज्ञ पद्मश्री डॉ. दादा लाड यांच्या शेतकरी अभ्यास वर्गाचे आयोजन

**धाराशिव, दि.११ फेब्रुवारी -**


भारतीय किसान संघ धाराशिवतर्फे शेतकरी बांधवांसाठी उत्पादन वाढ व नवनवीन कृषी तंत्रज्ञानाची माहिती होन्यासाठी एक दिवसीय अभ्यासवर्गाचे १३ फेब्रुवारी रोजी स्वयंवर मंगल कार्यालय, बार्शी नाका धाराशिव येथे आयोजन करण्यात आले आहे. या अभ्यासकर्गात प्रामुख्याने, धाराशिव जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती व हवामान लक्षात घेता गहू, ज्वारी व सोयाबीन या पिकांची उत्पादनवाढ दुप्पट कशी करता येईल याबाबत मार्गदर्शन व चर्चा होणार आहे. या अभ्यास वर्गाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषीतज्ञ पद्यश्री डॉ. दादा लाड उपस्थित राहणार आहेत. या सोबतच प्रा. अरुण गुट्टे, डॉ. प्रवीण पतंगे, ॲड. रावसाहेब शहाणे पाटील आदी शेतीतज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तरी या शेतकरी अभ्यास वर्गाचा सर्वानी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष नितीन घुले यांनी केले आहे.



### धाराशिव येथे जागतिक युनानी दिवस उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.११ फेब्रुवारी -**

जागतिक युनानी दिवस जिल्हा रुग्णालय, धाराशिव येथे उत्साहात साजरा करण्यात आला. हकीम अजमल खान यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. यावेळी आयुष विभागातील युनानीतज्ञ डॉ. अबरार अहमद-देशमुख यांनी हकीम अजमल खान यांच्या कार्याचा आढावा घेत युनानी वैद्यकशास्त्राचे महत्त्व स्पष्ट केले. युनानी उपचारपद्धती ही ग्रीक, अरबी व भारतीय संस्कृतींच्या संगमातून विकसित झालेली प्राचीन वैद्यकीय प्रणाली असून शरीरातील रक्त, कफ, पित्त व काळा पित्त या द्रव्यांचा समतोल राखणे हे तिचे मुख्य तत्त्व असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रम डॉ. धनंजय चाकूरकर, जिल्हा शल्यचिकित्सक व डॉ. तानाजी लाकाळ, अति. जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी विविध तज्ञ डॉक्टर, अधिकारी, कर्मचारी व रुग्ण नातेवाईक उपस्थित होते. जिल्ह्यातील नागरिकांनी कोणत्याही आजाराबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा रुग्णालयातील आयुष विभागाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.




### सुरक्षित इंटरनेट दिनानिमित्त धाराशिव येथे जनजागृती कार्यक्रम

**धाराशिव, दि.११ फेब्रुवारी -**

जगभरात साजरा होणाऱ्या सुरक्षित इंटरनेट दिन २०२६ निमित्त धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी अंकित सिंह यांनी इंटरनेटचा सुरक्षित व जबाबदार वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते. मार्गदर्शन करताना सिंह यांनी इंटरनेटची संकल्पना, त्याचा विविध क्षेत्रांतील वापर आणि डिजिटल पेमेंटसाठी इंटरनेटचा उपयोग कसा केला जातो याबाबत माहिती दिली. इंटरनेटचा अतिवापर केल्यास होणारे दुष्परिणाम व त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम याबाबतही त्यांनी उपस्थितांना जागरूक केले.

# तुळजापूर तीर्थक्षेत्री बस स्टॅन्ड परीसरात खुलेआम देहविक्री

**महिला नगरसेविकेचा आंदोलनाचा इशारा... महिलांना, कॉलेजच्या विद्यार्थिनी व भाविक भक्तांना आक्षेपार्ह भाषेचा वापर...**





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ फेब्रुवारी -**

साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या तुळजापूर या तीर्थक्षेत्री गोपाळ नगर परिसरात खुलेआम अवैध देहविक्री सुरू असून या प्रकारामुळे परिसरातील महिलांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

नगरसेविका प्रियंका विजय गंगणे यांनी गोपाळ नगर परिसरातील महिलांच्या वतीने पोलीस अधीक्षक, धाराशिव तसेच तुळजापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, नवीन बसस्थानकाजवळील गोपाळ नगर या नागरी वस्तीत काही ठिकाणी अवैध कुंटणखाने सुरू असून तेथे मोठ्या प्रमाणात देहविक्रीचा व्यवसाय चालतो.

तुळजापूर येथे दररोज हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी येत असतात. अशा पवित्र नगरीत नागरी वस्तीत अशा प्रकारचा बेकायदेशीर व्यवसाय सुरू असणे ही अत्यंत गंभीर व लाजिरवाणी बाब असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधित ठिकाणी संशयित हालचाली सुरू असून रस्त्याने ये-जा करणाऱ्या महिला, महाविद्यालयीन विद्यार्थिनी व भाविक महिलांना काही पुरुषांकडून आक्षेपार्ह भाषेत बोलणे, अश्लील टिप्पणी करणे असे प्रकार घडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित ठिकाणांची तात्काळ चौकशी करून अवैध देहविक्रीवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित लॉज व आस्थापनांना सक्त ताकीद द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देऊनही कारवाई न झाल्यास गोपाळ नगर परिसरातील महिला तुळजापूर पोलीस स्टेशनवर लोकशाही मार्गाने निषेध मोर्चा काढून तीव्र आंदोलन करतील, असा इशारा नगरसेविका प्रियंका गंगणे यांनी दिला आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलिस प्रशासन काय कारवाई करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### पोलीस प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी...

तुळजापूर येथील गोपाळ नगर परिसरासह इतर ठिकाणी पण सुरू असल्याचा आरोप करण्यात आलेल्या अवैध देहविक्री प्रकरणी पोलीस प्रशासनाने तात्काळ आणि ठोस कारवाई करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक महिलांकडून करण्यात येत आहे. शहरातील विविध संबंधित ठिकाणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसावा यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

## नळदुर्गमध्ये घनकचरा व्यवस्थापन ठप्प; टेंडर रद्द करून नव्या निविदेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ फेब्रुवारी -**



शहरात गेल्या दोन महिन्यांपासून घनकचरा निर्मूलनाचे काम व्यवस्थित होत नसल्याचा आरोप करत संबंधित टेंडरधारक कंपनीचे टेंडर तात्काळ रद्द करून नवीन निविदा काढावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या गटनेत्यांसह चार नगरसेवकांनी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शहरातील गटारी घाणीने तुंबल्या असून अनेक भागात सफाई कामगार नियमित जात नाहीत. शास्त्री चौक, हत्ती गल्ली, जयभवानी चौक, ब्राम्हण गल्ली, सावरकर चौक, धर्मवीर संभाजी चौक, बेडगे गल्ली, पांचपीर चौक, पोलिस ठाणे परिसर, कुरेशी गल्ली, चावडी चौक, इंदिरानगर, व्यासनगर, रहीम नगर, रामलीला नगर, अध्यापक विद्यालय परिसर, व्यंकटेश नगर व ठाकरे नगर या भागांत घाणीचे साम्राज्य पसरले असून सर्वत्र दुर्गंधी पसरल्याची तक्रार करण्यात आली आहे.

तसेच जंतुनाशक फवारणी केली जात नसल्याने शहरात विविध साथीचे आजार पसरत असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

घनकचरा व्यवस्थापनाचे टेंडर घेतलेल्या कंपनीकडून प्रभागनिहाय आवश्यक कामगार न लावता केवळ २५ महिला कामगार, ७ चालक व ५ गाड्यांवरच काम सुरू असल्याचे निवेदनात म्हटले आहे. नगरपालिकेकडून जादा मजूर दाखवून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

ज्या भागातून तक्रारी येतात, तेथे तात्पुरते दोन-तीन मजूर पाठवून केवळ दिखावूपणे काम केले जात असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

सदर कंपनीकडून नगरपालिकेची व जनतेची फसवणूक होत असून भ्रष्टाचार केल्याचा आरोप करत तात्काळ टेंडर रद्द करून नवीन निविदा काढावी, अन्यथा जनहितासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन छेडावे लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनावर काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे, उपगटनेते आकाश कुलकर्णी, नगरसेवक सुधीर पोतदार व नगरसेविका कमल गायकवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### ताकविकी येथे जागतिक युनानी दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ फेब्रुवारी -**

शासकीय युनानी दवाखाना ताकविकी जि. धाराशिव येथे बुधवार, दि.११ फेब्रुवारी रोजी जागतिक युनानी दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून युनानी विशेषज्ञ तथा महाराष्ट्र युनानी मेडिकल संघटनेचे अध्यक्ष डॉ. शकील अहमद खान, अण्णा तरंगे, रियाज पठाण, असेफ पठाण, कुमार बायस उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच छाया तरंगे, उपसरपंच अहेमद पठाण उपस्थित होते.

यात एकूण २३० लोकांची तपासणी करण्यात आली.

## 'अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्स्पो २०२६'च्या लोगोचे धाराशिवमध्ये अनावरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत परळी वैजनाथ (जि. बीड) येथे आयोजित करण्यात येणाऱ्या ऐतिहासिक 'अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्स्पो २०२६' या प्रदर्शनाच्या लोगोचे अनावरण आज धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याधरण कडवकर, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) डॉ. धनंजय महाजन तसेच पशुधन विकास अधिकारी डॉ. वैभव पाटील उपस्थित होते. लोगो अनावरणानंतर बोलताना जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की, पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परळी वैजनाथ येथे होणारे हे महाप्रदर्शन देशातील जातीवंत पशुधन व आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम ठरणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकरी व पशुपालकांना दुग्धव्यवसायातील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान एका छताखाली पाहण्याची संधी मिळणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालक, तरुण उद्योजक व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने प्रदर्शनास भेट देऊन आपले ज्ञान व उत्पन्न वाढवावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रदर्शनाबाबत अधिक माहिती देताना जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) डॉ. धनंजय महाजन यांनी सांगितले की, या महा एक्स्पोमध्ये राज्यातील तसेच राज्याबाहेरील जातीवंत गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या तसेच विविध पक्षी प्रजातींचे दर्शन घडणार आहे. यासोबतच आधुनिक डेअरी फार्मिंग, चारा व्यवस्थापन, प्रक्रिया उद्योगांचे भव्य स्टॉल्स, पशुधन आरोग्य, लसीकरण व वैज्ञानिक संगोपन यावर तज्ज्ञ पशुवैद्यकांची विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.

लोगो अनावरणानंतर संपूर्ण जिल्ह्यात या प्रदर्शनाची व्यापक प्रसिद्धी मोहीम राबविण्यात येणार असून, सर्व पशुवैद्यकीय संस्था, पंचायत समित्या व सार्वजनिक ठिकाणी बॅनर व पोस्टर्सद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून घरपोच माहिती देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



### खेड गावच्या अंकिता शिंदेची कृषी उपसंचालक (वर्ग-१) पदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ फेब्रुवारी -**

धाराशिव तालुक्यातील खेड गावची कन्या अंकिता भारत शिंदे हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात आलेल्या परीक्षेतून कृषी उपसंचालक (वर्ग-१) पदी निवड झाल्याबद्दल येडशी येथील उद्योजक तानाजी जाधव व मित्र परिवाराच्या वतीने तिचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

अंकिता शिंदे हिचे प्राथमिक शिक्षण खेड गावातच झाले असून उच्च माध्यमिक शिक्षण तिने धाराशिव येथे पूर्ण केले. त्यानंतर पदवीत्तर शिक्षण परभणी व राहुरी (जि. अहिल्यानगर) येथे यशस्वीरित्या पूर्ण करत तिने स्पर्धा परीक्षेची तयारी केली. ग्रामीण भागातून येऊन कठोर परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले आहे.

## गणेश नगरमधील प्रलंबित विकासकामांना सुरुवात

### आ. राणादादांचे मानले नागरिकांनी आभार...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ फेब्रुवारी -**



शहरातील गणेश नगर परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विकासकामांना अखेर सुरुवात झाली असून परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या कामांसाठी सातत्याने पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे गणेश नगरवासीयांनी आभार मानले आहेत.

गणेश नगरमधील रस्ते अनेक दिवसांपासून अत्यंत खराब अवस्थेत होते. विशेषतः पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. खड्डेमय रस्ते, पाण्याचे साचलेले डबके आणि वाहतुकीतील अडथळे यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत होत होते. या सर्व समस्या लक्षात घेऊन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी संबंधित विभागांना तातडीने सूचना देत विकासकामांसाठी मंजुरी मिळवून दिली. त्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.

सध्या सुरू असलेल्या कामांमुळे परिसराचा कायापालट होणार असून नागरिकांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. गणेश नगरमधील रहिवाशांनी आमदारांचे विशेष आभार मानत भविष्यातही अशाच प्रकारे विकासकामांना गती मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

*** धाराशिव, दि.११ फेब्रुवारी-**
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (टप्पा २) अंतर्गत ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांच्या स्तरावरून दि.१३ रोजी वेबिनारचे आयोजन केले आहे.

## महेंद्र धुरगुडे यांच्या विजयाची हॅट्रिक; १६९९ मतांनी दणदणीत विजय

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ फेब्रुवारी -**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांनी जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये ऐतिहासिक कामगिरी करत विजयाची हॅट्रिक साधली आहे. वेगवेगळ्या जिल्हा परिषद गटांतून निवडणूक लढवून तिसऱ्यांदा विजय मिळवणारे ते जिल्ह्यातील मोजक्या नेत्यांपैकी एक ठरले आहेत.



यापूर्वी तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा व नंदगाव जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवत विजयी झाल्यानंतर आता धाराशीव तालुक्यातील बेंबळी जिल्हा परिषद गटातून त्यांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

या विजयामुळे जिल्ह्यातील राजकारणात महेंद्र धुरगुडे यांचे वजन अधिक वाढले आहे.

बेंबळी जि.प. गटात झालेल्या चुरशीच्या लढतीत महेंद्र धुरगुडे यांनी एकूण ५०७४ मते मिळवली.

त्यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्याचा १६९९ मतांनी पराभव करत स्पष्ट बहुमताने विजय संपादन केला. प्रचाराच्या काळात विकासकामे, स्थानिक प्रश्नांची जाण आणि कार्यकर्त्यांचा मजबूत पाठिंबा हे विजयाचे प्रमुख कारण ठरले.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. विजय जाहीर होताच समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष केला. अनेक पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी महेंद्र धुरगुडे यांचे अभिनंदन केले.

जिल्हा परिषद धाराशिव

## व्यंकटेश महाजन महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न

**'रिसेंट ट्रेंड्स इन ग्रीन ऑरगॅनिक सिंथेसिस' विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ फेब्रुवारी -**



येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात रसायनशास्त्र विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. परिषदेचे उद्घाटन मौलाना आझाद महाविद्यालय, संभाजीनगरचे प्राचार्य प्रा.डॉ. मझहर फारुकी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर प्रा. डॉ. गजानन राशिनकर, प्रा.डॉ. बापूराव शिंगटे, प्रा.डॉ. आरिफ पठाण, प्रा.डॉ. हंसराज जोशी, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी तसेच विभागप्रमुख प्रा.डॉ. मकरंद चौधरी उपस्थित होते. व्यंकटेश महाजन महाविद्यालय व एनेटिकल केमिस्ट्री टीचर्स रिसर्च असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान यांच्या आर्थिक सहयोगातून Recent Trends in Green Organic Synthesis या विषयावर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या परिषदेत प्रा.डॉ. गजानन राशिनकर, प्रा.डॉ. बापूराव शिंगटे, प्रा.डॉ. आरिफ पठाण, प्रा.डॉ. हंसराज जोशी, प्रा.डॉ. एम.के. पाटील, प्रा.डॉ. मकरंद कुलकर्णी, प्रा.डॉ. विकास कडू, प्रा.डॉ.डी.एम. शिरसाट व प्रा.डॉ.के. शिवकुमार यांनी साधन व्यक्ती म्हणून सहभाग नोंदवत विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

ग्रीन ऑरगॅनिक सिंथेसिसमधील आधुनिक प्रवाह, पर्यावरणपूरक संशोधन पद्धती व औद्योगिक उपयोग यावर सखोल चर्चा झाली.

परिषदेला प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते. ही परिषद यशस्वी करण्यासाठी प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ. मकरंद चौधरी, प्रा.डॉ. नितीन तुपसमिंदर, प्रा.डॉ. शिवाजी खडके, प्रा. प्रदीप जोशी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.